७८५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२०६

# शब्दांच्या दुनियेत

[ललित निबंध]

शान्ता ज. शेळके

REFBK-0010257



# शब्दांच्या दुनियेत

— शान्ता ज. शेळके

# शब्दांच्या दुनियेत

[ ललित निबंध ]

निबंध

शान्ता ज. शेळके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत.
अनुक्रम ३६१६२ वि: निबंध
क्रमांक १२०६ नों: दि: ५/२/६०

REFBK-0010257

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२५७

************************

किंमत तीन रुपये, पन्नास नये पैसे

: प्र का श क :–
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार, पुणें २

☆

डिसेंबर १९५९
( C )
शान्ता ज. शेळके

☆

–: मु द्र क :–
ना. अ. मेहेंदळे
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें, २

डॉ. वसन्त अवसरे

व

डॉ. सौ. काशीबाई अवसरे

या दंपतीस

स्नेहादरपूर्वक अर्पण—

— शान्ता.

अनुक्रम २६१६२ वि: निबंध
क्रमांक १२०६ नों: दि: ६/२/६०

# थोडें आधीं

गेल्या दहाबारा वर्षांत वेळोंवेळीं मी जे ललित निबंध लिहिले त्यांतील काहींचें हें संकलन आहे.

मी ज्यावेळीं हे निबंध लिहिले त्यावेळीं त्यांना नेमकें कोणतें वाङमयीन स्वरूप प्राप्त होत आहे याची मलाहि नीटशी कल्पना नव्हती. आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' साप्ताहिकांत सहसंपादिका म्हणून मी काम करीत असतांना पुष्कळदां एक पानभर मजकुराची निकडीची आवश्यकता असे. या आवश्यकतेमधूनच या संग्रहांतले कांहीं निबंध लिहिले गेले. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी 'अनुराधा' मासिकांत 'जीवनाचे झरे' नांवाचें एक सदर मी लिहीत असें. 'वूमन्स ओन' या इंग्रजी साप्ताहिकांत बीव्हर्ली निकोल्स हा लेखक 'माय वर्ल्ड' नांवाच्या सदरांत एक पानाचा मजकूर लिहितो. त्याचें हें स्फुटलेखन मला आवडतें. 'जीवनाचे झरे' लिहीत असतांना मी कांहीं अंशीं बीव्हर्ली निकोल्सचें हें सदर डोळ्यांपुढें ठेविलें होतें. या 'जीवनाचे झरे' सदरांतलेहि कांहीं निबंध मी या ठिकाणीं अन्तर्भूत केले आहेत.

तथापि मजकुराची निवड किंवा विशिष्ट तऱ्हेच्या लेखनप्रकाराचें अनुकरण येवढाच या निबंधांच्या मुळाशीं असलेला हेतु नाहीं. कित्येकदां एकादीच तरल कल्पना मनांत रुंजी घालीत भिरभिरूं लागते. एकादा विचार मेन्दूला सारखा पोखरीत राहतो. एकाद्या अनुभवानें मन गुंग होऊन जातें. एकाद्या क्षणीं मनःस्थिति अशी हलकी व उल्लसित होते कीं पावलें जणूं अलगत जमिनीवरून सुटतात. या साऱ्यांना शब्दरूप द्यावेंसें वाटतें. तसें केल्याखेरीज मनाला बरेंच वाटत नाहीं. या पुस्तकांतले कित्येक निबंध अशा अपरिहार्यतेंतूनहि लिहिले गेले आहेत.

यांतल्या वेगवेगळ्या निबंधांबद्दल माझ्या अनेक मित्रमैत्रिणींनीं त्या त्या वेळीं कुतूहल व्यक्त केलें, आस्था दाखविली, म्हणूनच ते आज पुस्तकरूपानें वाचकांपुढें ठेवण्याचें धाडस मी करीत आहें. वाचकांना हें पुस्तक आवडेल अशी मी आशा करतें.

दि. १-१२-५९<br>
दादर, मुंबई

शान्ता ज. शेळके

१०२५८

# १ : : शब्दांच्या दुनियेंत

कुणाला फुलांचें वेड असतें. कुणाला संगीताचें. कुणाला चित्रांचें. कुणाला सुन्दर चेहेरे बघण्याचें वेड असतें. माझ्या ओळखीची एक सुगृहिणी आहे तिला वेगवेगळ्या खाद्यपदार्थांच्या कृति ( Resipe ) जमविण्याचेंच वेड आहे. तसें मला शब्दांचें वेड आहें. शब्दसृष्टीवर माझें विलक्षण प्रेम आहे. निरनिराळे शब्द गोळा करण्याचा आणि आपलें शब्दभांडार समृद्ध करण्याचा बाळपणापासूनचा माझा छंद आहे. त्या छन्दाची तीव्रता अजूनहि कमी झालेली नाहीं.

माझ्या ओळखीचे एक जेष्ठ साहित्यिक आहेत. शब्दांच्या या अनावर नादाबद्दल ते नेहमीं माझी थट्टा करतात. एकदां ते मला म्हणाले, 'तूं अजून रसिकतेच्या प्राथमिक अवस्थेंतच घोटाळत आहेस. शब्दांच्या बाह्य सौंदर्याचाच तुला येवढा मोह पडतो कीं त्याच्या पाठीमागें असलेल्या आशया-पर्यंत तूं पोहचूंच शकत नाहींस. लहान मुलांना गांवाबाहेरच्या टेकडीवर फिरायला नेलं म्हणजे तीं तिथें रंगीबेरंगी चमकदार खडे गोळा करीत बसतात. तुझं हें शब्दाचं वेड त्याच तऱ्हेचं आहे.' त्या साहित्यिकांचे मज-विषयींचे हे उद्‍गार कांहीं खोटे नाहींत. शब्दांच्या बाह्य सौंदर्याचा मला फार मोह पडतो. त्या मोहांत गुरफटल्यामुळें शब्दांच्या पाठीमागें असलेल्या आशयापर्यंत मी कदाचित् जाऊन पोहोंचतहि नसेन. त्या गोष्टीचें मला

वाईट वाटत नाही. शब्दाच्या आशयापर्यंत जाण्याची मला तितकीशी घाईहि नाहीं. आज तरी मी नुसत्या शब्दांवरच संपूर्णपणें लुब्ध आहें.

शब्दांचें हें वेड मला कसें लागलें असावें तें आतां सांगतां येत नाहीं. तथापि मला आठवतें तेव्हांपासून मी नानातऱ्हेचे शब्द वेंचतेंच आहें. मला आवडणारे सारेच शब्द सुन्दर, लुसलुशित किंवा कोंवळे असतात असें मात्र नाहीं. आपल्या या मानवी सृष्टींत जेवढें वैचित्र्य आहे तेवढीच विविधता शब्द सृष्टींतहि आहे. शब्दांचे किती प्रकार किती जाती, किती तोंडवळे असतात. कांहीं कुरुप असतात. कांहीं डौलदार असतात. कांहीं वेंधळे असतात. कांहीं शब्द लाडिवाळपणें तुमच्या गळचांत हात टाकून खदखदां हंसतात तर कांहीं दूर अन्तरावर राहून तेथून तिरसटपणानें तुमच्याकडे टवकारून पाहतात. कांहीं शब्द नानाविध रंगांनीं झळझळणारे असतात, कांहीं सुगन्धानें घमघमत असतात, तर कांहीं आपल्या नादाचे नूपुर घालून त्यांच्या रुणझुणाटानें तुमचें मन रिझवितात. कांहीं शब्द हिऱ्यासारखे तेजस्वी असताच. कांहीं शब्द प्राजक्ताच्या फुलासारखे सुकुमार व हळवे असतात. कांहीं शब्द बालका सारखे अव्याज असतात. कांहीं शब्द प्रणयिनी-सारखे मुग्ध असतात. कांहीं शब्द आषाढमेघांप्रमाणें मन पर्युत्सुक करतात. कांहीं संध्याकाळच्या सांवल्यांप्रमाणें मनाला गूढ अबोध हुरहूर लावतात. कांहीं शब्दांतून पौर्णिमेच्या चांदण्याची शीतलता निथळत असते. तर कांहीं शब्दांत चैत्रवैशाखांतील ऐन दुपारच्या उन्हाचा चटका भरलेला असतो. खरोखर शब्दसृष्टीच्या वैचित्र्याला आणि विविधतेला अन्त नाहीं.

कवींना ‘ शब्दसृष्टीचे ईश्वर ’ अशी पदवी रामदासांनीं दिली आहे. पण जुन्या कवींत असे शब्दसृष्टीचे ईश्वर मला दोनच आढळेल. एक ज्ञानेश्वर आणि दुसरे मुक्तेश्वर. ज्ञानेश्वरांचें शब्दांवरील प्रभुत्व तर असा-मान्य आहेच, पण त्याहीपेक्षां हव्या त्या जागीं हवा तोच शब्द अचूकतेनें आणि योजकतेनें वापरण्याचें कौशल्य केवळ वर्णनातीत आहे. ‘ कोवळीक ’ हा सुंदर शब्द ज्ञानेश्वरी वाचण्याच्या आधींही माझ्या कानांवरून गेला होता. पण त्या वेळीं त्या शब्दाचें सौंदर्य अन् माधुर्य मला मुळींच जाणवलें नव्हतें. तथापि ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय वाचतांना——

तेवीचि आइका आणिक एक। येथून शब्दश्री सच्छास्त्रिक
आणि महाबोधी कोंवळीक। दुणावली ॥

ही ओवी माझ्या नजरेस पडली मात्र 'कोवळीक' शब्दाशीं माझा जणू नव्यानेंच परिचय झाला आणि माझ्या मनांत कांहीं विलक्षण कोमल संवेदना जागृत झाल्या. 'कोवळीक' हाच शब्द आणखी एके ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं किती सुंदर रीतीनें वापरला आहे पहा. सहाव्या अध्यायांत योगाभ्यास करणारा पुरुष आपल्या योगसामर्थ्यानें किती तेजस्वी दिसूं लागतो याचें वर्णन करतांना ज्ञानेश्वर म्हणतात—

तो कनक चंपकाचा कळा। कीं अमृताचा पुतळा।
ना ना सासिंतला मळा। कोवळिकेचा।

योगसाधना करणारा पुरुष सोनचाफ्याचा कळा, किंवा अमृताचा पुतळा अथवा नाजुकपणाचा बहर आलेला असा मळाच जणूं दिसतो! पूर्व परिचित शब्दांतहि नवी जादू भरण्याचें ज्ञानेश्वरांचें चातुर्य त्यांची ज्ञानेश्वरी वाचतांना वरचेवर प्रत्ययास येतें. अकराव्या अध्यायांत विश्वरूपदर्शनाचे प्रसंगीं श्रीकृष्णांनीं अनेक रूपें धारण केलीं त्या रूपांचें नानाविध रंग वर्णन करतांना ज्ञानेश्वरांच्या शब्दसागराला जणूं भरती आली आहे असें वाटतें.

एके सावियाची चुळुकीं। जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं
एके अरुणोदयासारखीं। कुंकुमवर्णें
एके शुद्धस्फटिक सोज्वळें। एके इन्द्रनीळ सुनीळें
एके अंजनवर्णें सकाळें। रक्तवर्णें एके
एके लसत्कांचनसम पिवळीं। एके नवजलद श्यामळीं
एके चांपेगौरी केवळी। हरिते एके
एके तप्तताम्र तांबडीं। एके श्वेतचंद्र चोखडीं
ऐसीं नानावर्णें रुपडीं। देखे माझीं

हें वर्णन वाचलें कीं ज्ञानेश्वरांच्या अद्‌भुत शब्दप्रभुत्वाचा आणि त्यांच्या असामान्य रंगदृष्टीचाही— मनाला हेवा वाटल्याखेरीज राहत नाहीं. ज्ञानेश्वरींत कितीतरी शब्द असे आहेत कीं त्यावर प्रथमदर्शनींच माझें प्रेम जडलें आहे. अळुमाळ, खेव (क्षेमालिंगन), दिठी (दृष्टि), मोटक

( थोडेसें ), राणीव ( राजेपण ), निडळ ( कपाळ ) हे शब्द पहावेत. अर्थ न कळतां सुद्धां या शब्दांविषयीं मनाला आकर्षण वाटेल कीं नाहीं ?

ज्ञानेश्वरांप्रमाणेंच मुक्तेश्वरांचेंहि शब्दभांडार विपुल व समृद्ध आहे. साध्या शब्दांतून अतीव मनोरम चित्र डोळ्यांपुढें उभें करावें तर तें मुक्तेश्वरानींच.

शेष वेंचता अठरा घटिका । पूर्व दिशेनें क्षाळिलें मुखा
कुंकुम रेखिलें त्या तिलका । अरुणोदय बोलिजे ।।

ही ओवी वाचली कीं स्नान आटोपून धूतवस्त्रें परिधान करून कपाळावर कुंकवाचा टिळा रेखीत असलेली एक सुंदर, सात्विक, शुचिर्भूत ब्राह्मण स्त्री माझ्या डोळ्यापुढें उभी राहते आणि पहाटेचे थंड उत्तेजक वारे अंगाला स्पर्श करून जात आहेत असा मला स्पष्टपणें भास होतो.

मुक्तेश्वरांची शब्दसंहति सुंदर असतेच पण त्या शब्दांचीं ते ज्या विशिष्ट रीतीनें गुंफण करतात ती रीत अधिकच सुंदर व परिणामकारक असते.

अभाग्य भाग्याचीं आभाळें । येती जाती आपुल्या काळें ।
परी निश्चयाच्या ध्रुवे अचळें । चळत्व सर्वथा न पाहिजे ।।

सुखदुःखांचे मेघ प्रसंगानुसार येतात व जातात. पण आपला निश्चयरूपी ध्रुवतारा मात्र सदैव अचल असला पाहिजे असा या ओवीचा अर्थ आहे. पण तो अर्थ व्यक्त करण्यासाठीं मुक्तेश्वरानें शब्दांची जी रचना केली आहे ती किती डौलदार आहे ! कित्येकदां मुक्तेश्वर अगदीं स्वतःचेच असे नवे शब्द बनवितो आणि ते बेधडक वापरतो. मुष्टियुद्ध करतांना एकमेकांचे केस पकडून ते ओढण्याची कांहीं मल्लांची पद्धति असते. या प्रकारासाठीं 'झोटंघरणी' हा सकृद्दर्शनी विचित्र दिसणारा पण अत्यंत समर्पक शब्द मुक्तेश्वरानें बनविला आहे. शंकराला उद्देशून 'जाश्वनीळ' हा शब्द त्यानें वापरला आहे. तो शब्द अन्यत्र कुठेंहि निदान मी तरी पाहिलेला नाहीं. त्या शब्दाची व्युत्पत्तीही मला माहीत नाहीं. पण तो शब्द मला आवडतो.

शब्दांच्या भोंवतीं अर्थाचें विशिष्ट वलय असतें. कित्येकदां त्याच्याशीं आपल्या कांहीं गोड वा कडू स्मृति निगडित असतात. कित्येकदां त्यांच्या नादसौंदर्यानेंच आपण विमोहित होतों. पण कित्येकदां यांपैकीं कांहीहि कारण नसतांनासुद्धां विशिष्ट शब्द आपल्याला प्रिय होऊन बसतात. कांहीं व्यक्तींच्या

विषयीं जसें अकारणच प्रेम आपल्या मनांत निर्माण होतें तसाच्र कांहीं शब्दांवरही आपला विनाकरणच लोभ जडतो. आणि मग वाटूं लागतें कालिदासानें वर्णन केलेलें ' जननान्तर सौहार्द ' हेंच असावें. कुतूहल, रुपडें, मोहर, लावण्य, झळाळी, पुनव हे व असें कितीतरी शब्द मला फार प्रिय आहेत. पण ते मला कां आणि केव्हां आवडूं लागले हें कांहीं मला सांगतां यावयाचें नाहीं. कांहीं ग्रामीण शब्द अगदीं बाळपणापासून मी माझ्या घरांत वापरले जातांना ऐकलें आहेत. आणि बाळपणाचे संस्कार मोठेपणींसुद्धां मनावर दृढमूल होऊन राहतात. म्हणून ते शब्द अजूनहि मी विसरलें नाहीं. लई, अरुवार, निगुति, समाधान, गोरीमालण, हे सारे शब्द माझें बालमित्र आहेत, त्यांचा सहवास अजूनहि मला प्रिय वाटतो.

शब्दांच्या केवळ नादसौंदर्यावर लुब्ध होणें ही खरोखर रसिकतेची अगदीं पहिली पायरी असेल, पण मी अद्यापहि त्या पायरीवरच घोटाळत आहें. मला आवडणाऱ्या कित्येक कवितापंक्ती केवळ या नादसौंदर्यामुळेंच मला प्रिय होऊन बसल्या आहेत. जयदेवाच्या गीतगोविंदांतील ' धीरसमीरे यमुनातीरे वसति वने वनमाली । गोपीपीनपयोधर मर्दनचंचलकरयुगशाली ' या किंवा ' ललितलवंगलतापरिशिलन कोमलमलयसमीरे ' या किंवा ' रतिसुखसारे गतमभिसारे मदनमनोहर वेषम् । न कुरु नितम्बिनिगमनविलंबनमनुसर तें हृदयेशं ' या ओळींचा अर्थ आतां मला समजतो. पण जेव्हां हा अर्थ मला कळत नव्हता तेव्हांहि या ओळी गुणगुणण्यांत मला मौज वाटत असे. आणि तीच मौज मोरोपंतांची—

बहु सत्य बहु प्रिय बहु हित मित बहु दुराप बहु रुचिर ।
शुचिरम्यक्षीरधिजाननचन्द्रचकोर बोलला सुचिर ॥

ही आर्या किंवा माधनानुज कवींच्या—

इतकें बोलुन थकलीं सुकलीं मुकलीं स्वकीय तेजातें
जाईचीं दिव्यफुलें असलीं फेंकील कोण हो हातें ?

या पंक्ती म्हणतांनाहि माझ्या अनुभवास येतें.

संस्कृत व मराठी भाषेशीं माझा जेवढा परिचय आहे तेवढा अर्थातच हिंदी व इंग्रजी भाषेशीं नाहीं. हिंदी भाषेविषयीं तर मी अद्यापहि पराकाष्ठेची अनभिज्ञ आहें. हिंदीची एकही परीक्षा मी अजून दिलेली नाहीं.

हिंदींतलें साहित्य मीं वाचलेलें नाहीं पण तरीसुद्धां अधुनमधून कानावर पड-णाऱ्या हिंदी शब्दांपैकीं एकादा शब्द मला इतका कांहीं आवडतो कीं त्याचा खुशाल वापर करावा असें वाटूं लागतें. 'शायद' 'वरना' 'चापलूसी' या हिंदी शब्दांचे खरेखुरे अर्थ काय आहेत कुणाला ठाऊक, पण कधीं कधीं मनांत येतें, केव्हांतरी हे शब्द बोलण्यांत ऐटीनें वापरावेत अन् ऐकणाराला आपलें हिंदी भाषेचें ज्ञान (!) दाखवून थक्क करावें. अर्थात् हे शब्द मी वापरल्यावर ऐकणारा मनुष्य थक्क होईलही, पण जरा निराळ्या अर्थानें!

उर्दू आणि फ्रेंच भाषाहि मला मुळींच येत नाहींत, तथापि या दोन्ही भाषांविषयीं मला विलक्षण कुतूहल आहे. इंग्रजी भाषेंत बरेच फ्रेंच शब्द आहेत, त्यापैकीं Rendezvous (संकेतस्थळ), Superb (उत्कृष्ट), Petite (लहान चणीचा) हे फ्रेंच शब्द मला फार आवडतात. फ्रेंचमध्यें ट, ड, ठ, असें कठोर उच्चार मुळींच नसतात असें म्हणतात. त्यामुळें ती भाषा संस्कृत भाषेसारखीच 'मधूरकोमलान्तपदावली' नें युक्त असावी अशी माझी कल्पना आहे. उर्दू भाषेचें माझें ज्ञान अज्ञानांतच जमा होण्या-सारखें आहे. पण उर्दू भाषेंतले कांहीं 'शेर' मी ऐकलेले आहेत आणि त्यावरून उर्दूत आषुक माषुक, दिल, कातिल, चमन, बुलबुल, शमा, पर-वाना, मजहब, इष्क अशा सुंदर मुंदर आणि केवळ प्रेमभावनेशीं आणि विरहयातनेशीं संबंद्ध असलेल्या शब्दाचाच खूप भरणा असावा अशी माझी समजूत झाली आहे. म्हणून पुष्कळदां माझ्या मनांत येतें, उर्दू आणि फ्रेंच या दोन्ही भाषा आपण शिकून घ्याव्यांत अन् त्यांतील अपरिचित्, गूढ. अद्‌भुत, रहस्यमय असें शब्दभांडार मनसोक्त लुटावें.

अमेरिकन लोकांची भाषा त्यांच्या संस्कृतीप्रमाणेंच प्रतिदिन तयार होत आहे, आणि तितकीच आधिभौतिक, उथळ, कुरुप व कर्कश आहे. रोजची बोलीभाषा ते खुशाल पुस्तकांतून, नियतकालिकांतून वापरतात. त्यामुळें त्यांचे पुष्कळसे शब्द चांगल्या इंग्रजी जाणणाऱ्या माणसालाहि कळणें मुष्किल होऊन बसतें मोटारीला मोटार म्हणण्याऐवजीं ते लोक 'रोडस्टर' म्हणतात, राहण्याजेवण्याची सोय असलेल्या हॉटेलला 'मॉटेल' म्हणतात. त्याचप्रमाणें 'नॅचरल' बद्दल केवळ 'नॅच' म्हणणें, 'ब्यूटिफुल' ऐवजीं 'ब्यूट' म्हणणें, 'टेरिफिक' ऐवजीं 'टेरिफ' म्हणणें अशी शब्दांची कापा-

कापीहि ते लोक खुशाल करतात. कां कुणास ठाऊक, पण शब्दांशीं अशी अवास्तव लगट करणें, त्यांचें तुकडे पाडणें किंवा त्यांच्या वापरांत हवें तें स्वातंत्र्य घेणें मला मुळींच आवडत नाहीं. अन् 'अमेरिकन इंग्रजी'चा मला भारी तिटकारा येतो. अमेरिकन लोकांचा एक शब्द मात्र मला अगदीं मनापासून आवडला व तो म्हणजे नॉस्टल्जिया (Nostalgia) या शब्दाचा मराठींत बरोबर अर्थ सांगणें अवघड आहे. पण त्याची जराशी कल्पना देता येईल. बालपणीं ज्या गांवीं किंवा ज्या ठिकाणीं आपलीं बरींच वर्षे गेलीं तें ठिकाण बऱ्याच कालावधीनंतर आपल्या जर नजरेस पडलें तर आपल्या मनांत ज्या अनेक कटुमधुर भावना दाटून येतील, थोडा आनंद, थोडी हुरहुर, थोडी खिन्नता यांच्या मिश्रणानें होणारी जी एक विचित्र मन:स्थिति आपण अनुभवूं तिला Nostalgic fellig} असें म्हणतां येईल. हा शब्द अस्सल इंग्रजी आहे कीं ही खास अमेरिकन पैदास आहे तें कांहीं मला माहीत नाहीं. पण हा शब्द मला अतिशय आवडतो येवढें मात्र खरें.

माझें शब्दाविषयींचें प्रेम असें सर्वस्पर्शी असलें तरी स्वत:च्या लेखनासाठीं शब्द निवडतांना मात्र माझी मनोवृत्ति फार सनातनी बनते. इतरांनीं शब्दांसंबंधीं केलेलें नवनवीन प्रयोग मला आवडतात. पण स्वत: तसा प्रयोग करून पाहण्याचा मात्र मला धीर होत नाहीं. मी जे शब्द वापरतें ते परंपरेनें चालत आलेले, प्रतिष्ठित, घरंदाज, सुसंस्कृत, सभ्य असावेत अशीच माझी मनापासून इच्छा असते. कर्मधर्मसंयोग, सिंहावलोकन, चक्रनेमिक्रम, एकसमयावच्छेदेंकरून, सद्सद्विवेकबुद्धि, आसेतुहिमाचल, नखशिखान्त असे लांबलचक विद्वत्ताप्रचुर शब्द वापरतांना मला समाधान वाटतें. इतरांच्या लेखनांत येणारे 'काळेशार डोळे' मला हृदयंगम वाटले तरी माझ्या लेखनांतले डोळे काळेभोरच असतात. हिरव्याचार गवता ऐवजीं हिरवेगार गवत मला वरें वाटतें. चपखल, आठंगणें, लेटणें असल्या शब्दांच्या मी चुकून वाटेला जात नाहीं. ऊनी कोट, वायुलीन असले शब्द मला हास्यास्पद वाटतात. चरमसीमा, यंत्रणा, चारुगात्री हे शब्द संस्कृतमध्यें वाचावयालाच मला आवडतात अभिनिवेश, अस्मिता या शब्दांचा निश्चित अर्थ मला स्वत:-लाच ठाऊक नाहींत म्हणून ते शब्द लेखनांत वापरण्याचें मला धैर्य होत नाहीं. आणि 'नेत्र दीपक' सारख्या संशयास्पद जातकुळीच्या शब्दाचा तर मी

आसपासहि फिरकत नाहीं. मला इतके तऱ्हेतऱ्हेचे शब्द मनापासून आवडत असतांना स्वतःच्या लेखनांत मात्र ते शब्द येऊं न देण्याचा माझा अट्टाहास कां असतो कुणास ठाऊक ! पण हें असें आहे खरें.

'एकः शब्दः सम्यगधितः सम्यक्प्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुक् भवति' असें एक संस्कृतवचन आहे. योग्य रीतीनें अवगत झालेला आणि योग्य रीतीनें उपयोजिलेला एक शब्दसुद्धां इहलोकीं आणि परलोकीं आपल्या सर्व इच्छा पूर्ण करूं शकतो असा या वचनाचा अर्थ आहे. बरे वाईट नवेनवे शब्द हव्यासानें गोळा करतां करतां मध्येंच केव्हांतरीं या वचनाचें मला स्मरण होतें अन् मग माझ्या मनांत येतें, हे येवढे शब्द आपल्याला ज्ञात आहेत खरे, पण यांतला एक तरी शब्द 'सम्यक अधीत' असेल कीं नाहीं कुणास ठाऊक !

* * *

## २ : : एकटेपणा

मनुष्य हा समाजप्रिय आहे. किंवा प्राणिशास्त्रज्ञांच्या भाषेत सांगायचें तर तो कळप करून राहणारा प्राणी आहे. या जगांत प्रवेश केल्या क्षणापासून तों जगाबाहेर पुन्हां पाऊल टाकण्याच्या क्षणापर्यन्त माणसाला नेहमींच आपल्या भोंवतीं इतर माणसांच्या अस्तित्वाची अपेक्षा असते. अर्भकाचें जन्मकाळचें रुदन चार चौघांच्या समुदायांत उमटतें आणि त्याचा अन्तिम श्वासही चार चौघांच्या साक्षीनेंच वातावरणांत विलीन होतो. फार काय, त्याचे पार्थिव अवशेष भस्म होत असतांना देखील माणसांची गर्दी भोंवतीं असावीच लागते. होय. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. पण म्हणूनच कीं काय, माणसाला एकान्तांत फार वेळ राहावत नाहीं. एकान्तवासाची त्याला भीति वाटते. 'एकलेपणाची आग' त्याला असह्य होते. माणसांनीं गजबजलेल्या या जगांत एकाद्या अभागी जीवाच्या नशीबीं जर सक्तीचा एकान्तवास आला तर आपलें जिणें त्याला अगदीं नकोसें वाटूं लागतें. मग वाचन करणें, रेडिओ ऐकणें, एकटयानेंच पत्ते खेळणें अशा करमणुकींचा त्याला अवलंब करावा लागतो. आणि एवढयानेंहीं भागलें नाहीं तर मग तो लग्न करतो किंवा दारूकडे वळतो किंवा आत्महत्या करतो.

माणसाच्या एकलकोंडया जीवनाचें चित्रण किती हृदयद्रावक आहे पहा ! ज्या कुणाला आयुष्यांत कधीं एकटें अगदीं एकटें रहावें लागलें असेल

त्यालाच एकटेपणांतील भीषण यातनांची कल्पना येईल. इतरांना ती येणार नाहीं. असा मनुष्य कामावरून परत आल्यावर आपल्या खोलींत एकटाच येऊन बसतो. त्याची खोली अगदीं व्यवस्थित आणि नीटनेटकी असते. कुठें एवढासा सुद्धां केरकचरा पडलेला नसतो. कपडे कपाटांत व्यवस्थित ठेवलेले असतात. पुस्तकें शेल्फवर ओळीनें लावलेलीं असतात. पण ही स्वच्छता, हा आत्यंतिक नीटनेटकेपणाच त्या माणसाला असह्य होतो. घरांत कुणाचा वावर नसल्याचीच ती एक केविलवाणी साक्ष असते. त्या सुव्यवस्थित वातावरणांत जिवंतपणा नसतो. चैतन्य नसतें. 'मानवी' पणा नसतो. खोलीचा मालक त्या खोलींत एकवार सभोंवती नजर फिरवतो आणि मग एक उसासा टाकतो. नंतर तो कोपऱ्यांतल्या आरामखुर्चीवर आपलें अंग झोकून देतो आणि श्रांत भावानें डोळे मिटून घेतो. जरा वेळानें दार वाजल्या-सारखें वाटतें. तो उत्सुकतेनें जाऊन दार उघडतो. पण बाहेर कुणी नसतें. वाऱ्यानें दार वाजलेलें असतें. तो मनुष्य खिन्नपणें परत येऊन आराम-खुर्चीवर पडतो. जरा वेळानें पुन्हां खोलींत हलकीशी चाहूल लागते. पण डोळे उघडून पहावें तर एक मांजर चोरट्या पावलांनीं खिडकींतून आंत येऊन खोलींत फिरत असतें! हें एकलकोंडें जिणें माणसाला कसें सहन व्हावें? अशा माणसाचीं स्थिति वेड्यासारखी होत असल्यास त्यांत नवल तें काय?

असा एकटेपणा वांट्यास येणें हें दुर्दैव तर खरेंच, परंतु यांतहि कित्येक वेळां बराचसा दोष खुद्द त्या व्यक्तीकडेच असतो असें म्हटल्यास त्यांत फारशी चूक होणार नाहीं. एकटेपणानें आयुष्य घालवावें लागणें एक प्रकारें त्या माण-साचा पराभव आहे. त्याच्या दुबळेपणाची ती साक्ष आहे. जीवनाच्या प्रवा-हांत निःशंकपणें आणि निर्भयपणें जें उडी टाकूं शकत नाहींत त्यांनाच असला एकलकोंडेपणा सहन करावा लागतो. अशीं माणसें स्वार्थी असतात. आप्पल-पोटीं असतात. स्वतःव्यतिरिक्त इतर कुणाचाही विचार करणें त्यांना परवडत नाहीं. दुसऱ्याचे विचार, विकार, भावना, आशाआकांक्षा यांसंबंधीं कुतूहल दाखविण्याची किंवा त्यांत 'रस' घेण्याची ताकदच अशा लोकांत नसते. दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं समरस होण्यास जी तीव्र आणि सूक्ष्म कल्पकता लागते तिचा या अशा माणसांजवळ अभाव असतो आणि त्यामुळें सहानुभवाच्या

दिव्य देणगीला तीं पारखीं झालेलीं असतात. हीं माणसें दुर्दैवी होय. खोलींतल्या शून्य एकान्तांतच काय, पण माणसांनीं अगदीं वहरून फुलून गेलेल्या स्थळीं-सुद्धां अशा लोकांच्या नशिबीं एकटेपणाच येतो. ज्याक्षणीं मनुष्य केवळ स्वतः-बद्दलच विचार करणें सोडून देईल, स्वतःवर केंद्रित झालेलें आपलें चित्त काढून तें इतरांकडे वळवील त्याच क्षणीं त्याच्या जिवाला लागलेली एकटे-पणाची कठोर जाचणी नष्ट होईल.

आत्यंतिक स्वयंकेंद्रिततेमुळें जसें माणसाला एकटेपणाचें दुःख भोगावें लागतें त्याप्रमाणें लाजाळू भित्र्या वृत्तीमुळें, स्वतःविषयीं वाटणाऱ्या तीव्र, न्यून भावामुळेंही एकलकोंड्या जीवनाचा शाप माणसाच्या नशीबीं येतो. पुष्कळशीं माणसें आपल्याभोंवतीं अबोलपणाचा एक कोश तयार करून त्यांतच स्वतःला कोंडून घेतात. हें कवच फोडून बाहेर येण्याची त्यांना भीति वाटू लागते, दुसऱ्याशीं बोलणें ते टाळतात. गर्दींत मिसळण्याचें त्यांना भय वाटतें. जमावाशीं समरस होऊन त्याबरोबर बेहोशपणें ओरडण्याचा, हंसण्याचा, खिदळण्याचा त्यांना संकोच वाटतो. दोरीवरून चालणारा डोंबारी जसा इकडे तिकडे अजिबात न बघतां फक्त आपल्या हातांतल्या काठीच्या आधारानें तोल सांभाळून पावलें टाकीत असतो तद्वत् हीं अशीं भित्रीं माणसें आजू-बाजूला न बघतां कसा बसा स्वतःचा तोल सांभाळीत जीवनांतून मार्ग काढीत असतात. परन्तु अत्यंत स्वयंकेंद्रित असणें जसें वाईट तसेंच अतिशय भित्रें असणेंहि अतिशय वाईट ! कांहीं थोडे अपवाद सोडले तर सामान्यतः सारीं माणसें बहुधा एकाच पातळीवरचीं असतात. बुद्धिमत्तेच्या, कर्तृत्वाच्या, सौंदर्याच्या अगर श्रीमन्तीच्याही दृष्टीनें त्या साऱ्यांचा वकूब प्रायः सारखाच असतो. एवढी एक गोष्ट जर ध्यानांत घेतली तर कुणालाही या आयुष्यांत न्यून भावानें अगर भित्रेपणानें वावरण्याचें कारण नाहीं.

मनुष्यप्राणी हा पुष्कळसा दुबळा असतो एकटेपणाची सर्वांनाच भीति वाटते. सहानुभूति प्रत्येकालाच हवी असते. माझ्याकडे इतरांनीं थोडेंफार लक्ष द्यावें, जगाच्या या विशाल 'रंगभूमीवरच्या माझ्या भूमिकेस मग ती कितीही क्षुद्र असो इतरांनीं थोडें तरी महत्त्व द्यावें' ही इच्छा प्रत्येकाच्याच हृदयांत जागृत असते. एवढें ओळखून जर मनुष्य जगांत वागेल तर एकटे-पणाचें भय बाळगण्याचें त्याला मुळींच कारण नाहीं. जो इतरांकडे प्रेमानें

सहानुभूतीनें व भावनापूर्ण दृष्टीनें पहातो त्याला जगांत स्नेहाची वाण कधींही पडावयाची नाहीं. पण यासाठीं माणसानें कांहीं विशेष नियम ध्यानांत ठेवायला हवेत. स्वत: बोलण्यापेक्षां दुसरे काय बोलतात तें ऐका-वयास शिकलें पाहिजे. स्वत:वर सारा प्रकाशाचा झोत पाडून घेणारे, स्वत:च सर्वांच्या नजरेचें केन्द्रस्थान होऊं पाहणारे, किंवा स्वत:च एकसारखें बडबडत राहणारे लोक बाह्यात: मोठे लोकप्रिय दिसले तरी अशा व्यक्तींचा मनांतून इतरांना रागच येत असतो. पुरुषांना कोणत्या तऱ्हेच्या स्त्रिया आवडतात याबद्दल स्थूलमानानें एकच एक असा नियम कांहीं सांगतां येणार नाहीं. परंतु आपला प्रियकर जें कांहीं बोलत असेल तें अत्यंत लक्षपूर्वक ऐकणारी आणि त्याच्या त्या बोलण्याखेरीज जगांत दुसरें कांहींहि अधिक महत्वाचें नाहीं असा भाव चर्येवर दर्शविणारी स्त्री ही पुरुषांना सर्वांत अधिक आवडत असावी अशी स्त्री पुरुषाच्या अहंभावाला सुखवितें आणि त्याच्या कर्तृत्वाला ती प्रेरक होते. या स्त्रीला जगांत कधींही एकलकोंडें आयुष्य वांट्याला यावयाचें भय नाहीं.

या जगांत एकटेपणा नशीबीं येणें हें तर वाईटच, पण असा एकटेपणा क्षणभरही सहन करावयाची ताकद अंगीं नसणें हें त्याहून अधिक शोचनीय आहे. ज्या माणसांना एकटेपणा अजिबात सहन होत नाहीं, ज्यांना एक घडीभरही एकान्तांत राहतां येत नाहीं. त्यांचें मन अधू झालें आहे. कमजोर झालें आहे असें निश्चित समजावें. पुष्कळशीं माणसें एकान्ताला भितात. आणि तीं एकान्ताला भितात याचें कारण एकान्तामध्यें त्यांना आपला स्वत:चा जो सहवास लाभतो, स्वत:चें. स्वत:च्या अन्त: सृष्टीला जें दर्शन होतें त्याला तीं घाबरतात. या एकान्तात प्रकट होणारें स्वत:चें स्वरूप त्यांना बघवत नाहीं. आपला स्वत:चा सहवास त्यांना भयंकर वाटतो. स्वत:च्या हृदयांतून अशा वेळीं जो कोलहाल उठतो तो त्यांना असह्य होतो. आणि मग त्या भयानक एकान्तांतून तीं धांवतच बाहेर पडतात आणि मिळेल त्या व मिळेल तसल्या संगतींचा आश्रय घेतात ! कसली कां होईना, पण त्यांना 'कंपनी' हवी असते ! हीं असलीं माणसेंहीं जीवनांत एका निराळ्या अर्थानें पराभूत झालेलीं असतात. जीवनाबद्दलची त्यांची रुचीच नष्ट आलेली असते. आणि मग तापानें तोंडाची चव गेल्यावर जसे नाना तऱ्हेचे

चमचमित पदार्थ खाऊन मनुष्य जिभेला रंजवूं पाहातो त्याप्रमाणें हीं माणसें कसलाही विधिनिषेध न बाळगतां वाटेल त्या विषयावर बोलून आपल्या पराभूत जीवनावर सूड घेऊं पाहतात. आपल्या अन्तःकरणांत भडकलेली आग विझविण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. प्रेमांत अयशस्वी होऊन नंतर बेफिकीर वृत्तीनें जीवन घालवूं बघणारी समाज सुंदरी, कलेच्या नांवावर जीवनाचें दिवाळें वाजवून बसलेला अयशस्वी व्यसनी कलावन्त, पैशासाठीं अनन्वित पातकें केल्यानंतर त्या पैशाच्या जोरावर नानाविध उपभोगांचे रंग उडविणारे लक्ष्मीचे लाल, विश्वासानें खांद्यावर मान टाकून निजलेल्या प्रीतीचा आपल्या हातानें गळा दाबणारा संभावित प्रेमिक—या साऱ्या लोकांना एकटेपणाची कट्यार उरांत बाळगून त्या भयंकर जखमेच्या वेदनेनें विव्हळत आपलें उभें आयुष्य काढावें लागतें. त्यांच्या दुःखाला सीमा नाहीं. मृत्यूशिवाय त्यांचा एकटेपणा कुणीही संपवूं शकणार नाहीं. अशा माणसांना एकटेपणा हा शापच वाटत असतो.

पण एकटेपणा खरोखरीचे इतका वाईट आहे काय ? एकलकोंडेपणांत खरोखरींच एवढ्या परमावधीच्या यातना भरलेल्या आहेत काय ? नाहीं. एकटेपणा हा माणसाला वाटतो तितका भयंकर खचित नाहीं. एकटेपणांतहि माधुर्य भरलेलें आहे. दोन माणसांचा एकान्त हा पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करूं शकतो, पण एकट्या जिवाचा एकान्तहि कांहीं कमी सुखकर नसतो. महान काव्यें एकान्तांतच लिहिलीं जातात. अपूर्व शोध एकान्तांतच लागतात. रमणीय कलाकृति एकान्तांतच निर्माण होतात. धर्मचिन्तन, तत्वचिन्तन एकान्तांतच साध्य होतें. पूर्वीचे ऋषिमुनि गिरीकंदरांत जाऊन बसत आणि तेथील एकान्तांमध्येंच त्यांना आत्मसाक्षात्कार होई. सारे विश्व गाढ निद्रेंत बुडून गेलें असतां संयमी जागा असतो याचें कारण देखील रात्रीच्या शान्ततेइतकाच रात्रीचा एकान्तहि त्याला आवश्यक असतो. तुकारामासारखा एवढा श्रेष्ठ साधु आणि प्रसिद्ध कवि, पण त्यांनीं आपले अभंग कुठें लिहिले तर जनसमुदायापासून दूर अशा डोंगरावर, तेथील एकान्तांत अन् 'वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें ! पक्षीही सुस्वरें आळवीती , अशा निसर्गरम्य वातावरणांत तुकारामांची सुंदर अभंगवाणी प्रकटली. श्री ज्ञानेश्वरांनीं देखील योगाभ्यासासाठीं एकान्तावरच अधिक भर दिला आहे. योगसाधन

करूं इच्छिणाराला ते सांगतात, 'आणिकही एक पहावें। जेथ साधकीं वसत होआवें। आणि जनांचेही पायरवें। रुळेचिना' आणि 'बहुत करूनि एकान्तें बैसिजेगा' सारांश, प्रेम असो कीं योग असो, कला असो कीं शास्त्र असो एकान्ताशिवाय त्यांचें प्रसादन करणें केवळ अशक्य आहे. एकान्त हा मनाच्या निरामयतेला, आत्म्याच्या उन्नतीला आवश्यक आहे. स्वतःच्या हृदयाचे बोल केवळ एकान्तातच आपणाला ऐकावयाला मिळतात.

आणि तसें पाहिलें तर सारे थोर आत्मे हे एका अर्थानें जन्मभर एकान्तवासांतच असतात. जितका मनुष्य अधिक बुद्धिमान्, अधिक कर्तबगार, अधिक संवेदनाक्षम तितका तो जीवनांत अधिकाधिक एकटा असतो. आकाशांत उंचच्याउंच चढलेल्या पर्वतशिखराला आपल्या 'उच्च' अवस्थेबरोबर भयाण एकान्तवासही पत्करावा लागतो. आकाशाच्या निळ्या पोकळींत घुसलेला उंच सुळका हें मोठ्या माणसाच्या जीवनाचें सुंदर प्रतीक आहे. तो सुळका जसा आभाळाला मस्तक भिडवून एकटा उभा असतो त्याप्रमाणें भोंवतालच्या खुल्या जनसमुदायामध्यें मोठा माणूस हा सर्वांपासून अलिप्त असा एकटाच आपलें आयुष्य कंठीत असतो. मोठ्या माणसांचीं स्वप्नें, त्यांचीं ध्येयें, त्यांचें सामर्थ्य सामान्यांकडून वेगळें असतें. आणि त्यामुळेंच त्यांचें जीवनही वेगळें होतें. अफाट गर्दींतहीं ते एकटेच असतात. त्यांच्याएवढें मानसिक वा आत्मिक सामर्थ्य इतरांत नसते. त्यांचीं उज्ज्वळ स्वप्नें पाहण्यास लागणारी तीव्र दृष्टि इतरांजवळ नसतें. त्यांचें सुंदर आदर्श जाणून घेण्यासाठीं हव्या असलेल्या सूक्ष्म कल्पनाशक्तीचा इतरांच्या ठायीं अभाव असतो. त्यामुळेंच थोर माणूस प्रचण्ड जनसमुदायांतहि एकटाच असतो.

कपिलवस्तु येथील भव्य राजवाड्यांत, नानाविध सुखविलासांच्या ऐन बहरांत आणि पत्नी यशोधरा हिच्या मधुर सहवासांतहि, राजपुत्र सिद्धार्थ हा एकटेपणाचेंच दुःख भोगीत नव्हता काय ? तें दुःख त्याला शेवटीं इतकें असह्य झालें कीं भोंवतीचे सारे पाश तोडून अखेर तो रानांत चालता झाला. आणि मग तेथेंच त्याला आपल्या जीवनकार्याचा साक्षात्कार झाला. येशू ख्रिस्ताच्या हयातींत त्याला एवढे अनुयायी लाभले, इतके लोक त्याच्या भजनीं लागले, पण या अफाट गर्दींतील येशू ख्रिस्त हा एकान्तवासीच होता. एकटाच होता. तसें जर नसतें तर अखेर त्याला क्रूसावर कां चढावें लागलें

असतें ! एका लेखकानें येशू ख्रिस्ताविषयीं असे उद्गार काढले आहेत कीं, 'या जगांत खरा ख्रिस्तानुयायी जर कोणी असेल तर तो फक्त येशू ख्रिस्त हाच होय !' थोर आणि महान् तत्त्वप्रणेत्यांच्या जीवनाची हीच विपरीत दुःखांतिका असते कीं त्यांच्या दिव्य तत्त्वांचें पालन खुद्द त्यांच्याशिवाय दुसरा कोणीच करीत नाहीं. महात्माजींबद्दलही असेंच म्हणतां येईल. साऱ्या आयुष्य-भर केवढा भीषण एकांतवास यांनीं सहन केला असेल हें फक्त त्यांच्या आत्म्यालाच माहीत ! सत्य, अहिंसा, क्षमा, मानवताप्रेम या आपल्या प्रिय तत्त्वांच्या प्रसारासाठीं महात्माजी आमरण झटले, परंतु त्यांच्यामागें त्यांचीं हीं आवडतीं थोर तत्त्वें या जगांत टिकून राहतील काय ? कोणास ठाऊक ! येशू ख्रिस्ताप्रमाणेंच महात्माजींबद्दलही एका लेखकानें म्हटलें आहे कीं, 'या जगांत खरा गांधीवादी फक्त महात्मा गांधीच होत.' हा एकमेव गांधीवादी तर आतां नष्ट झाला. मग गांधीवादाचें पुढें काय होईल ?

महात्म्यांना एकांतवास जन्मभर भोगावा लागतो खरा, पण या एकांत-वासांत आपल्या भव्य आदर्शांची, उज्वल ध्येयांची आणि रमणीयस्वप्नांची त्यांना अखण्ड सोबत असते. मग त्यांना एकटे कसें म्हणावयाचें ? आणि जरी त्यांना एकटें म्हटलें, तरीसुद्धां असा उदात्त आणि दिव्य एकांतवास ज्यांच्या वांट्याला येतो ते केवढे भाग्यवान् म्हणावयास पाहिजेत !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम २६१६२ वि: निबंध
क्रमांक १२०६ नों: दि: ६।३।६०

## २ : : दु:ख आणि तत्त्वज्ञान

कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांनीं एक अतिशय मार्मिक आणि सुंदर अशी कथा लिहिलेली आहे. या कथेंत एक सरकारी नोकर अगदीं आड-बाजूच्या खेडेगांवीं नोकरीनिमित्त जातो. तेथें रतन नांवाची एक नवतरुण बालिका त्याचें घरकाम करण्यासाठीं म्हणून येत असते. त्या मुग्ध आणि अव्याज किशोरीला लौकरच या नोकराविषयीं गाढ स्नेहभाव आणि जिव्हाळा वाटूं लागतो. पुढें कांहीं दिवसानंतर त्या उजाड खेडेगांवीं या गृहस्थाला करमेनासें होतें आणि राजिनामा देऊन परत तो आपल्या गांवीं, आपल्या बायकामुलांकडे व मित्रमंडळीकडे निघून जातो. रतनच्या मनाची स्थिति त्याला कळत नाहीं. जातांना तो तिला थोडीशी बक्षिसी देतो. आपल्या भक्तीचें मोल रतनला पैशांत करावयाचें नसतें. त्यामुळें ते पैसे ती नाकारतें. गांव सोडून जातांना बाबूमहाशयांना थोडेसें वियोगदुःख होतें. परंतु ते स्वत:शींच म्हणतात, 'चालायचेंच, दोन माणसें योगायोगानें एकत्र यायचीं आणि नंतर परस्परांपासून तीं पुन्हां दूर व्हायचीं हा या सृष्टीचा व्यवहारच आहे. त्याचा खेद कशाला ?' आणि या तत्त्वज्ञानानें तो आपल्या मनाची समजूत घालतो. बिचारी रतन मात्र दु:खानें आणि निराशेनें व्याकुळ होऊन बाबूमहाशयांच्या घराभोंवतीं फेऱ्या घालीत बसते. तिला आपल्या वियोग-वेदनांचें निरसन करतां येत नाहीं. कारण, रवींद्रनाथ शेवटीं सांगतात,

'Poor Ratan had no philosophy— बिचाऱ्या रतनजवळ कुठलेंच तत्वज्ञान नव्हतें.' टागोरांनीं आपल्या या कथेमध्यें मानवी जीवनांतील एका रहस्यावर जातां जातां भेदक प्रकाश पाडलेला आहे असें मला वाटतें. तत्वज्ञानाचा अवलंब केल्यामुळें माणूस प्रसंगीं कसा हृदयशून्य कठोरतेनें वागतो हें या कथेंत टागोरांनीं सुंदर रीतीनें दाखवून दिलेलें आहे. माणसें एकत्र यायचीं आणि परत दूर जायचीं हा जगाचा न्यायच आहे. तेव्हां जें क्षणभंगुर आहे त्याचा खेद कशाला अशा तत्त्वज्ञानानें वियोगाचें दुःख एका घडींत विसरून जाणारा तो सरकारी नोकर ज्या कुणाला मोठा आदरणीय अन् कौतुकास्पद वाटत असेल त्यांना तो तसा सुखेनैव वाटो. मला स्वतःला तर दुःखानें व्याकुळ आणि विव्हळ होऊन जाणारी, व कुठल्याच तत्त्वज्ञानाची तोंडओळखहि नसलेली साधी, भोळी भाबडी अकृत्रिम रतनच अधिक आवडते.

तसें पाहतां 'तत्त्वज्ञान' हा विषय सर्वसामान्य माणसांच्या कक्षेबाहेरचाच आहे. खरें तत्त्वज्ञान या जगांत कितीकांना कळत असेल कोण जाणें आणि त्याचा अवलंब करून त्या योगानें दैनंदिन जीवनांत येणारीं सुखदुःखें समयज्ञतेनें सहन करूं शकणारे महाभाग त्यांत कितीसे असतील हें सांगणें तर अधिकच कठिण आहे. पण एका दृष्टीनें असें 'तत्त्वज्ञानी' लोक आपणांपैकीं फार थोडे असतात हीच आनंदाची गोष्ट आहे. उद्यां जगांतले सरसकट लोक 'सुखदुःखें समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ' अशा स्थितप्रज्ञ वृत्तीनें वागूं लागले तर जीवनांतला सारा रंग, रस, उल्हास आणि उत्कटता क्षणार्धांत नष्ट होऊन जाईल आणि हें विश्व म्हणजे रूक्ष, गंभीर व सुतकी चेहऱ्यांच्या बैराग्यांनीं भरून गेलेली एक भली थोरली धर्मशाळा होऊन बसेल !

हे सारे विचार आज मनांत येण्याचें कारण म्हणजे नुकतेंच एका अत्यंत विद्वान् व चिकित्सक प्राध्यापकांशीं माझें झालेलें संभाषण. हे प्राध्यापक तीक्ष्ण, विवेचक बुद्धिमत्ता, गाढ विद्वत्ता आॅणि सडेतोड व स्वतंत्र विचारसरणी या बद्दल प्रसिद्ध आहेत ज्ञानेश्वरीचा त्यांचा व्यासंग गेल्या वीसपंचवीस वर्षांचा असून त्या महान् ग्रंथावर अधिकारवाणीनें बोलण्याची पात्रता या प्राध्यापकांइतकी महाराष्ट्रांत अन्यत्र फारच थोड्या विद्वानांजवळ असेल. त्यांच्याशीं परवां बोलतांना 'तत्त्वज्ञान' या विषयाकडे कसा कोण जाणे पण आमच्या संभाषणाचा ओघ वळला. त्यावेळीं या प्राध्यापकांनीं

मला म्हटलें, ' अध्यात्म काय किंवा तत्त्वज्ञान काय हीं नांवें आपणाला जेवढीं मोठमोठीं आणि गूढ वाटतात, तसे ते विषय खचित नाहींत. आपल्या दैनंदिन जीवनांतहि तत्त्वज्ञानाचा आधार आपणांस सहज घेतां येतो. एक साधेंच उदाहरण सांगतों. ही सृष्टि कांहीं विशिष्ट नियमांनी बांधलेली आहे. ' निसर्ग ' म्हणून ज्याला आपण म्हणतों त्याचे कांहीं विवक्षित कायदे ठरलेले आहेत. आपण माणसें मात्र या गोष्टी ध्यानांत न घेतांच आपलीं जीवनांतलीं ध्येयें, आशा, आकांक्षा ठरवीत असतों. आणि मग आपल्या इच्छांचा अन् निसर्गाच्या नियमांचा संघर्ष झाला म्हणजे मग आपण शोक करीत बसतों. उदाहरणार्थ मी एक घर बांधतों. माझी अपेक्षा अशी असते कीं हें घर पांचपन्नास वर्षें टिकावें. माझ्या मुलांबाळांनीं त्यांत नांदावें. पुढील पिढ्यांना त्या घराची सांवली व्हावी. माझे हे विचार अर्थात् सुसंगतच आहेत. त्यांत वाईट असें कांहींच नाहीं. माझें चुकलें तें एवढेंच कीं निसर्गांत प्रकोप होऊं शकतील, भूकंप अगर महापूर या आपत्ति अनपेक्षित रीत्या येतील हें मी लक्षांत घेतलें नाहीं. अर्थात् असें कांहीं संकट येऊन कोसळलें व त्यांत माझें घर नष्ट झालें तर मी शोकानें व्याकुळ होतों. तेंच, ही सारीं आगामीं संकटें गृहित धरून मी माझें घर बांधलें असतें तर असा दुःखविव्हल होण्याचा प्रसंग मजवर आला नसता. निसर्ग हा अन्ध आहे. त्याला मानवाच्या सुखदुःखाची पर्वा नाहीं. हें ध्यानांत घेऊन जे जीवनांत स्थितप्रज्ञ वृत्तीनें वागतात त्यांच्यावर शोकाकुल होण्याचा प्रसंगच येत नाहीं. आणि असें वागणें याचेंच नांव तत्त्वज्ञान. ' प्राध्यापकांचें हें बोलणें ऐकून मी स्तंभित झालें. माझ्या तोंडून शब्दहि फुटेना. तोंच ते पुन्हां पुढें बोलूं लागले, ' जी गोष्ट या घराची तीच गोष्ट आपल्या प्रिय व्यक्तींची. पुरुष जेव्हां एकाद्या स्त्रीशीं विवाह करतो त्यावेळीं ' मी तुमच्या उभ्या आयुष्याला पुरून उरेन ' अशी कांहीं तिनें त्याला हमी दिलेली नसते. कारण तशी हमी देणें कुणालाच शक्य नाहीं. पुरुष मात्र ही स्त्री आपणाला जन्मभर साथ देईल अशी अपेक्षा मनांत बाळगून चालतो. आणि आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच ही जीवनाची जोडीदारीण जर मृत्युमुखीं पडली तर तो दुःखानें खचून जातो. पण हा सारा शोक निरर्थक असतो. मागचा पुढचा विचार त्यानें केला नाहीं आणि मानवी जीविताची क्षणभंगुरता ध्यानांत घेतली नाहीं हा दोष कुणाचा ? त्याचा

स्वतःचाच ना ?' किंचित्काळ स्तब्ध राहून मग मी म्हणाले, 'त्यानें बिचाऱ्यानें प्रथम या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतल्या नाहींत हा त्याचा दोष खराच आणि त्याचा शोकहि केवळ निरर्थक असेल. पण त्याला होणारें अपरिमित दुःख–तें तर अगदीं खरें असतें ना ?' माझा प्रश्न ऐकून प्राध्यापकांनीं मजकडे क्षणभर निरखून पाहिलें आणि नंतर मिस्किलपणें स्मित करीत ते म्हणाले, 'अहो, तो शोक सुद्धां खोटाच. त्यांतला थोडासा भाग अर्थात् सत्य असतो. पण बाकी बरेंचसें केवळ काव्यच असतें. आपलें एकादें प्रिय माणूस मृत्यूनें म्हणा अगर अन्य कांहीं कारणानें म्हणा, आपणाला दुरावलें तर आपणाला दुःख होतें. खरी आहे ही गोष्ट. पण हें 'दुःख' होतें म्हणजे तरी नेमकें काय होतें ! एकतर त्या व्यक्तीविषयीं आपल्या हृदयांत जी ममत्वभावना असते ती व्याकुळ होते. आणि दुसरें म्हणजे आपल्या दैनंदिन व्यवहारामधून ती व्यक्ति निघुन गेल्यामुळें तेथें जी एक पोकळी निर्माण होते ती आपल्याला असह्य होते. त्यामुळें कांहीं दिवस आपणाला चुकल्या चुकल्यासारखें वाटतें. आणि यालाच आपण 'दुःख' म्हणतों. वस्तुः हें दुःख नसून हा केवळ रोजच्या ठराविक जीवनक्रमांत पडलेला फरक–रोजच्या कार्यक्रमांत झालेला एक बदल असतो. आपणास मात्र वाटतें कीं हेंच दुःख.' प्राध्यापकांचें हें बोलणें ऐकून तर माझें मन फारच उद्विग्न झालें. मी म्हणालें, 'हें किती भयंकर वाटतें !' त्यावर प्राध्यापकांनीं उत्तर दिलें, 'होय. हें भयंकर वाटतें खरें. पण त्याला कांहीं इलाज नाहीं. कारण आपलें जीवन अन् त्यांतले नियम हेच मुळीं भयंकर आहेत. कठोर आहेत. म्हणून तर तत्त्वज्ञानाची मातब्बरी. जीवनाची ही सारी कठोरता गृहित धरून स्थिरवृत्तीनें आयुष्यांत वागावयाची, तत्त्वज्ञान आपणांस शिकवण देतें. ज्यांना एकदां ही स्थितप्रज्ञ वृत्ति अंगांत बाणवून घेतां आली त्यांना मग कोणत्याहि दुःखाचें भय राहात नाहीं. आणि हे लोक म्हणजेच तत्त्वज्ञानी लोक.' तत्त्वज्ञानाचें आणि तत्त्वज्ञ वृत्तीचें तें विवरण ऐकून घडीभर मी अगदीं सुन्न होऊन गेलें. माझें मन अतिशय उदास झालें. एका अनामिक भीतीनें आणि असहायतेनें माझें हृदय व्यापून गेलें, आजवर उराशीं बाळगून ठेवलेल्या कांहीं सुंदर कल्पनांवर जबरदस्त आघात होत आहेत, हृदयाशीं जपून ठेवलेलीं कांहीं शाश्वत मूल्यें छिन्नभिन्न होत आहेत असें त्या क्षणीं मला वाटलें.

प्राध्यापकांनीं जें कांहीं सांगितलें तें खरें असेल—नव्हे तें खरें आहेच. पण त्या भीषण सत्याचें दर्शन होतांच माझा जीव विलक्षण व्याकुळ झाला. या आयुष्यांत माणसाच्या हातीं कांहींच नाहीं. वारुळावर हत्तीनें सहज लीलेनें पाय द्यावा आणि त्याच्या पावलाखालीं लक्षावधि मुंग्या क्षणार्धांत चिरडून जाव्या तद्वत् निसर्गाच्या प्रकोपाच्या एका तडाख्यानें उध्वस्त होऊन जावें एवढाच मानवाच्या जीविताचा अर्थ आहे काय? मग मानवाची उच्च संस्कृति, त्याची सुंदर कला, निसर्गाशीं अविरत झगडून त्यावर वेळोवेळीं त्यानें मिळवलेले विजय—हें सारें केवळ क्षणभंगुरच म्हणावयाचें का? एका-एकीं जीवनांतला सारा रंग उडून गेल्यासारखें मला वाटूं लागलें. माझा जीव कासावीस झाला. प्रियजनांच्या वियोगानंतर मनाला होणाऱ्या दुःखाचा त्या प्राध्यापकांनीं जो अर्थ मला सांगितला तो तर या सर्व गोष्टीहूनहि अधिक भयानक होता. प्रियव्यक्तींच्या वियोगानें मनाला होणाऱ्या यातना या सर्व खोटयाच काय? दैनंदिन जीवनांत त्यांची भासणारी उणीवच केवळ आपणाला खुपते का? स्वतःच्या गैरसोयी पलीकडे प्रियजनांच्या वियोगांत दुसरें कांहींच दुःखकारक नसतें का? तर मग प्रेम हा शब्दच अर्थशून्य आहे. प्रेमाला अर्थ नाहीं. वियोगाला अर्थ नाहीं आणि दुःखालाहि अर्थ नाहीं. कशा-लाच कांहीं अर्थ नाहीं तेव्हां कसलाच शोक करण्याचें कारण नाहीं. जीवनांत सदैव सुखी अन् निश्चिंत राहण्याची ही केवढी सोपी युक्ति आहे? आणि हें सारें केवळ एक तत्त्वज्ञानाच्या जोरावर आपणाला कळूं लागतें!

त्या प्राध्यापकांच्या घरांतून मी बाहेर पडलें तेव्हां वैफल्याच्या तीव्र जाणीवेनें माझें मन भरून गेलें होतें. वृत्तींना एक कडवट बधिरता आली होती. रस्त्यावर दुतर्फा सुंदर आणि भव्य इमारती हारीनें लागल्या होत्या. एरव्हीं या इमारती बघून माझ्या मनाला मोठा विस्मय आणि कौतुक वाटतें. पण आज मात्र त्यांच्याकडे दृष्टि जातांच भूकंप, अग्निप्रलय, महापूर यांचीं भेसुर दृश्यें माझ्या डोळ्यापुढें नाचूं लागलीं. एक सुंदर तरुण जोडपें परस्परांशीं हास्यपरिहास करीत मोठ्या गंमतीनें रस्त्यांतून चाललें होतें. पण त्या दोघांकडे पाहतांच माझ्या मनांत आलें, 'उद्यां या उभयतांपैकीं कुणी एक अचानक मृत्युमुखीं पडणेंहि अगदीं शक्य आहे.' आणि त्या विचारासरशीं माझ्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. निळ्या रंगानें रंगलेलें

माथ्यावरचें आकाश, रस्त्यावरून चाललेली माणसांची उल्हासित व आतुर लगबग, ट्रॅम, बसेस व मोटारींची धांवपळ—मुंबईचें गजबजलेलें आयुष्य रोजच्यासारखेंच आजहि अगदीं ऐन धांदलीनें चाललेलें दिसत होतें पण आज मला एकाएकीं तें सारें अर्थशून्य वाटूं लागलें. तत्त्वज्ञानामुळें कुणाला हें जीवित अधिक सुसह्य होत असेल तें होवो. मला तर तत्त्वज्ञानाची ओझरती जाणीव झाल्याबरोबर जीवित विलक्षण निराशापूर्ण आणि असह्य वाटूं लागलें होतें.

लोकलमध्यें बसेपर्यंत माझ्या जिवाची हीच तगमग चालूं होती. मनाला एक विचित्र सुन्नता आणि जडपणा आला होता. पण लोकल दादरच्या दिशेनें धावूं लागली, सायंकाळच्या थंडगार वाऱ्याचे झोत चेहऱ्यावर अंगावर आदळूं लागले आणि आजूबाजूला विद्युदीप उजळले तशी माझ्या मनाची अस्वस्थता हळूं हळूं आपोआप नाहींशीं होत चालली. माझ्या पलीकडे बसलेल्या एका स्त्रीनें आपल्या अंबाड्यावर मोगऱ्याच्या उमलत्या कळ्यांची वेणी चढवली होती. त्या फुलांच्या मधुर परिमलानें माझ्या वृत्ति उल्हासित झाल्या आणि दुसऱ्या एका तरुणीनें खालीं वांकून छातीशीं बिलगलेल्या आपल्या तान्हुल्या अपत्याचें वात्सल्यभावानें चुंबन घेतलें तेव्हां तर माझें मन अगदीं संपूर्णपणें प्रसन्न झालें.

एकाएकीं माझ्या वेडेपणाचें मलाच हंसूं आलें. त्या विद्वान् प्राध्यापकांशीं गप्पा मारल्या त्या क्षणापासून उगीचच मी उदास होऊन बसलें होतें. त्यानीं ‘ तत्त्वज्ञाना ’ चा अर्थ सांगितला होता त्याचा मी सर्वस्वी विपर्यास केला होता. आणि म्हणूनच मला जीवित निरर्थक वाटूं लागलें होतें. पण तसें तें वाटावें याचें खरोखरी कांहीं कारण आहे काय ? या जगांत अपघात घडत असतील, अकालमृत्यु होत असतील आणि हें जीवित क्षणभंगुरहि असेल पण त्यामुळें त्याची रुचि किंवा माधुरी कमी होतें थोडीच ! या शेजारच्याच तरुणीच्या मस्तकावरील वेणींतली हीं मोगऱ्याचीं फुलें उद्यां यावेळीं वाळून कोळ होतील. पण त्यामुळें आजच्या त्यांच्या प्रफुल्लतेला आणि टवटवीला कांहीं कमीपणा येणार आहे काय ?

घरीं येईपर्यंत एक गोष्ट मात्र मला पुरतेपणीं उमगली होती आणि ती म्हणजे जगांत बहुसंख्य लोकांना तत्त्वज्ञान कळत नाहीं हेंच चांगलें आहे.

माणसाला तत्त्वज्ञान कळायला हवें आहे कशाला? माणसानें आनंदानें हर्षित व्हावें, दुःखानें व्याकुळ व्हावें, आशेनें प्रफुल्ल व्हावें, निराशेनें खचून जावें-थोडक्यांत म्हणजे माणसानें माणसासारखेंच वागावें अन् माणसासारखेंच जगावें. आपलें मन आणि जगांतल्या बऱ्यावाईट घडामोडी यांच्या दरम्यान तत्त्वज्ञानाचा जाडजूड पडदा उभारावयाचें कांहीं कारण नाहीं. खरें म्हणजे तत्त्वज्ञानाचा अवलंब करून त्याच्या बळावर दुःखांना तोंड देणें हाहि एक तऱ्हेचा भित्रेपणाच आहे दुःखानें व्याकुळ होऊन जाणें ही सुद्धां कांहीं सोपी गोष्ट नाहीं. दुःख भोगायलाहि माणसाच्या अंगीं एक विशिष्ट तऱ्हेचें धैर्य असावें लागतें. मला तर वाटतें कीं मदिरेच्या प्याल्यांत दुःख बुडवूं पहाणें आणि तत्त्वज्ञानाचें कांबळें अंगावर घेऊन दुःखाचे दंश चुकविणें-दोन्हीहि गोष्टी सारख्याच भ्याडपणाच्या होत. तत्त्वतः दोहोंचा अर्थ एकच !

आणि शिवाय-तत्त्वज्ञान कळूनहि ऐनप्रसंगीं दुःखाचें निरसन त्यामुळें हमखास करतां येतेंच असें तरी कुठें आहे? प्रभु रामचंद्रासारखा एवढा विवेकी, तत्त्वज्ञ आणि धीरगंभीर पुरुषश्रेष्ठ-पण तोसुद्धां सीतादेवीला रावणानें पळवून नेल्यानंतर 'हा सीते, हा सीते,' असें आक्रंदत विव्हळ अंतःकरणानें लतावेलींना कवटाळींत रडत सुटलाच ना! आणि भगवान् श्रीकृष्णांकडून अठरा अध्याय गीता ऐकून अन् 'जातस्यहि ध्रुवो मृत्यू पुनर्जन्मं-मृतस्यच तस्मादपरिहार्येथे न त्वं शोचितुमर्हसि' हा उपदेश श्रवण करूनहि बाळ अभिमन्यूच्या मृत्यूनें पार्थासारख्या स्थितप्रज्ञ नरवीराचें हृदय शोकानें विदीर्ण झालेंच ना!

—जीवनांत तत्त्वज्ञान उपयोगी पडत नाहीं हेंच खरें!

* * *

## ४ : : इतकी घाई कशाला ?

परवांचीच गोष्ट. कांहीं कामासाठीं मी गिरगांवांत जायला निघालें होतें. रेल्वेनें जाण्याऐवजीं बसनें जावें असें माझ्या मनांत आलें आणि त्याप्रमाणें टिळक पुलावर मी गेलें. पुलावरचा रस्ता ओलांडून मी जाणार तों गिरगांवकडे जाणारी एक बस शिवाजीपार्ककडून वेगानं आली आणि बसच्या ' स्टॉप 'वर थांबली. माणसाची रागहि फार मोठी नव्हती. मला वाटलें, मी जराशीं धांवलें तर बस सहज पकडूं शकेन. खरें म्हणजे हा इतका सुसंगत विचारहि मी त्यावेळीं केला असेल कीं नाहीं कोण जाणे. बस समोरून येत असलेली दिसतांच ती पकडण्याचा माझ्या अंतर्मनानें जणूं निश्चय केला आणि माझ्या शरिरानें फक्त वेगानें धांवण्याची यांत्रिक क्रिया तेवढी केली. नव्हे, माझ्या मनानें ती क्रिया माझ्या शरिराकडून आपोआप घडविली. लोक आपल्याला काय म्हणतील, कुणी हंसेल कीं काय–कसलाहि विचार माझ्या मनांत आला नाहीं. मी धांवतच ' स्टॉप 'कडे गेलें. पण मी तेथें जातें न जातें तो बस हलली आणि मला उपहासानें जणूं हंसतच ती तेथून निघून गेली. धांपा टाकीत आणि अंगावरचा पदर नीट सरसावून थेट मी उभी राहिलें, आणि खोदादाद सर्कलकडे वेगानें जाणाऱ्या बसकडे हताशपणें बघत मनांतल्या मनांत मी खूप हळहळलें. आपण घरांतून निघतांना शेजारणीच्या धाकट्या मुलीशीं बोलत उगीचच रेंगाळत राहिलों. तसें आपण केलें नसतें तर ही

बस आतां आपल्याला सहज मिळाली असती असाहि विचार माझ्या मनांत डोकावून गेला आणि त्यामुळें माझी खिन्नता अधिकच वाढली.

पांच दहा मिनिटें अशा मनःस्थितींत गेलीं. आणि मग माझें मलाच हसूं आलें. जणूं इतका वेळ एका विशिष्ट दिशेनें विचार करणाऱ्या माझ्या मनानें एकाएकीं विरुद्ध दिशेला पलट खाल्ली. मी स्वतःशींच असा विचार करूं लागलें कीं आतां ही बस आपण पकडूं शकलों नाहीं हें खरें. पण त्यामुळें आपलें असें काय मोठें नुकसान झालें आहे? आश्चर्य तर खरेंच, पण मी स्वतःला जेव्हां हा प्रश्न विचारला तेव्हां मला त्या प्रश्नाचें कांहीं नीट उत्तर देतां येईना. आणि त्यामुळें मी ओशाळून गेलें. खरोखरच वस्तुस्थिति अशी होती कीं ती बस न मिळाल्यामुळें माझें कांहीं सुद्धां नुकसान झालें नव्हतें. मी गिरगांवांतच चाललें होतें खरी, पण ती कांहीं अत्यंत महत्त्वाच्या कामासाठीं चाललें होतें असें मुळींच नाहीं. सहज एका मैत्रिणीस भेटायला म्हणून गंमतीनें मी जाणार होतें. बरें, ती मैत्रिणहि अगदीं दीर्घकाळानंतर मला भेटणार होती अशांतला भाग नाहीं. महिन्यांतून तीनचारदां तरी आमच्या दोघींच्या खचित भेटी होतात. तेव्हां आज नाहीं तर चार दिवसांनीं आमची भेट पुन्हां नक्कीच झाली असती. तात्पर्य, ही बस चुकल्यामुळें तर सोडाच, पण आज मी गिरगांवला अतिबात न जाण्यानें देखील माझें कांहीहि बिघडणार नव्हतें. पण तरी देखील बस समोर दिसतांच जिवाचा केवढा आटापिटा करून मी तिच्याकडे धांव घेतली होती. माझ्या देखत ती बस निघून गेल्यावर मी किती हताश झालें होतें. स्वतःला किती बोल लावून घेतला होता. आणि केवढ्या दुःखांत मी बुडालें होतें. जणूं माझ्यावर कांहीं विलक्षण आपत्ति कोसळली होती ! केवढा वेडेपणा !

हे सारे विचार एकापाठोपाठ एक माझ्या मनांत येऊन गेले आणि शेवटच्या विचारासरशीं तर एकदम मी मोठ्यानें हंसलें. खरोखर, आपल्या हातून वेडेपणा घडला हें स्वतःशीं कबूल करण्यांतहि कधींकधीं केवढें मानसिक समाधान असतें ! बससाठीं जिवाचा आटापिटा करण्यांत आपण अगदीं मूर्खपणा केला ही जाणीव झाली मात्र, मला एकदम मोकळें मोकळें वाटलें. माझ्या मनावर पडलेला असह्य ताण तात्काळ नाहींसा झाला. माझ्या चित्त-

वृत्ति प्रसन्न झाल्या आणि भोंवतालच्या वातावरणांत देखील एकदम विशेष उल्हास निर्माण झाल्यासारखें मला वाटलें.

मीं आजूबाजूला पाहिलें. वातावरण खरोखरच प्रसन्न होतें. नुकतीच एक पावसाची सर पडून गेली होती. त्यामुळें हवेंत सुखकर गारवा निर्माण झाला होता. माथ्यावरचें आभाळ तर असें गडद निळें दिसत होतें कीं आकाशाला इतकी गहिरी छटा चढलेली क्वचितच कुणी पाहिली असेल. निदान मी तरी इतका गर्द निळेपणा पूर्वीं कधीं पाहिल्याचें मला आठवत नाहीं. त्या निळ्या निळ्या आकाशांतून सोनेरी ऊन खालीं सांडत होतें आणि पावसानें भिजलेल्या वस्तुजातीवर तें प्रसन्नपणें चमकत होतें. कसला तरी सूक्ष्म सुगंध चहूंकडे भरल्यासारखा वाटत होता. आणि पुलाच्या आजूबाजूला जीं थोडीं झाडें आहेत तीं आपलीं पालवी मोठ्या उत्सुकतेनें आणि आनंदानें सळसळवीत होतीं. जणू तीं आल्यागेल्यांना सांगत होती, 'पावसाळा सुरू झाला आहे आणि आम्हांला दररोज मनसोक्त स्नान करायला मिळत आहे. त्यामुळें आमच्या शरीरावरची सारी धूळ कशी लख्ख धुवून गेली आहे पहा आणि आमच्या पालवींचा रंग तरी किती तकतकीत अन् तजेलदार दिसतो आहे पहा. गंमत असते नाहीं पावसाळा म्हणजे !'

त्या झाडांची ती मूक भाषा मला कळली आणि त्यांच्या प्रसन्नतेचा पडसाद तात्काळ माझ्याहि अंतःकरणांत उमटला. माझ्या मनांत आलें, वर्षाऋतुचा अवर्णनीय गोडवा वातावरणांत कसा कांठोकांठ भरला आहे. पण बस पकडण्याच्या धांदलींत आपलें तिकडे लक्षहि गेलें नव्हतें. मला एकदम माझा स्वतःचाच राग आला. वाटलें, किती करंटीं असतों आपण माणसें! जग किती सुंदर आहे. निसर्ग कसा अनंत रूपांनीं नटला आहे. पण क्षणभर थांबून तिकडे बघायलाहि आम्हांला सवड नसते. सदान् कदा आम्हीं कसल्यातरी घाईंत असतों. कशाला हवी ही घाई ! सदा आपलें धावपळ करीत रहायचें अन् धापा टाकीत बसायचें. तें कांहीं नाहीं. मी नाहीं यापुढें असें करीत जाणार ! काय मोठें नुकसान व्हायचें आहे त्यामुळें !

माझा हा नवा विचार मला इतका आवडला कीं एव्हांना दोन बसेस माझ्यापुढून गिरगांवांत गेल्या. पण त्यापैकीं एकींतहि मी चढलें नाहीं. त्या दिवशीं मी गिरगांवांत गेलेंच नाहीं. बराच वेळ पुलावर रेंगाळत राहिलें.

खोदादाद सर्कलला गेलें, तिथें मनसोक्त भटकलें, अन् मग रमतगमत, माणसांची मौज पहात आणि निसर्गाची शोभा अवलोकीत मी सावकाश पुन्हां घरीं आलें ?

तेव्हां पासून एकसारखा हा विचार माझ्या मनांत येत आहे, आपण प्रत्येक गोष्ट इतकी घाईनें, अगदीं वाघ पाठीला लागल्यासारखी करतों ती काय म्हणून ? कां आपण एवढ्या घाईनें जातों ? कशाला ही इतकी घाई ? आणि इतक्या घाईगर्दीनें साऱ्या गोष्टी करून अखेर आपण साधतों तरी काय ? माणसानें जरा सावकाश, रमतगमत, भोंवतालच्या जगांतील सौंदर्याचा आस्वाद घेत जीवनांतील विविधरस चाखीत असें कां जगूं नये ?

आजचें आपलें सारें जीवनच घाईचें झालें आहे. आजच्या जगाचा मुख्य धर्म कोणता असें जर कुणीं विचारलें तर घाई, गति, वेग हेंच त्या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल. जरा आजूबाजूला वळून आपण भोंवतालच्या माणसांचें निरीक्षण केलें तर प्रत्येकजण कसल्यातरी घाईंत आहे असें आपल्याला दिसून येईल. एका इंग्रजी कवीनें म्हटलें आहे ना, There is no time to stand and stare. तशी आज प्रत्येकाची अवस्था झाली आहे. क्षणभर थांबून आजूबाजूला बघायला कुणाला सवडच नाहीं. एकसारखी आणि अविरत धांवपळ करणारीं हीं माणसें पाहिलीं कीं माझ्या डोक्यांत एक चमत्कारिक कल्पना येते. लहान मुलांच्या खेळण्यामध्यें कांहीं खेळणीं अशीं असतात कीं त्यांना एकदां चावी देऊन खालीं जमीनीवर सोडलें म्हणजे चावी संपेपर्यंत तीं आपलीं एकसारखीं गरगर फिरत राहतात. या धांवपळच्या माणसांना देखील असेंच कोणा अदृश्य हातानें चावी देऊन या जगांत सोडलें आहे आणि चावी संपेपर्यंत तीं अशींच अविरत गरगर फिरत राहणार आहेत असें मला वाटूं लागतें. या कल्पनेची मला मौज वाटते पण ती क्षणभरच. दुसऱ्याच क्षणीं, कां कोण जाणें, कसल्याशा भयानें माझा जीव गुदमरूं लागतो.

आजच्या जगांतल्या थोर लोकांची गोष्ट सोडून द्या. पण अगदीं सर्व सामान्य माणूससुद्धां किती घाईगर्दीनें जगत असतो पहा. सकाळीं तो घाईघाईनें उठतो, घाईनें चहा घेत असतां घाईघाईनेंच वृत्तपत्रांतल्या ठळक मथळ्यांवरून नजर फिरवतो. पेपर पाहून झाला, कीं घाईघाईनें दाढी करून लगबगीनें चार तांबे डोक्यावरून घेतो. पानावर बसला कीं घाईघाईनें चार

घांस पोटांत कोंबतो आणि तसाच धांवत पळत ट्रॅम, बस किंवा रेल्वे पकडायला जातो. ऑफिसांत गेला म्हणजे घाईगर्दीनेंच तो पुढयांतलें काम करतो. संध्याकाळीं ऑफिस सुटलें कीं ट्रॅम, बस अगर रेल्वे पकडण्याची पुन्हां तीच ती केविलवाणी धांदल. बरें घरीं आल्यावर तरी त्याला निवान्तपणा मिळतो म्हणावें तर तेंही नाहीं. घरीं येतांच पुन्हां दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमांचा राक्षस आ वासून त्याच्याकडे अक्राळविक्राळ मुद्रेनें टवकारून बघत असतो. त्या राक्षसाच्या भीतीनें हा छोटा माणूस लगबगीनें रात्रीचें जेवण उरकून बिछान्यावर पडतो. दुसरें दिवशीं सकाळीं लवकर उठायचें असतें ना त्याला! दुसरे दिवशीं उठला कीं पुन्हां कालच्यासारखें कामाचें यंत्र सुरू. या यंत्रांत एकदां माणूस अडकला कीं मग मरेपर्यंत त्याची त्यांतून सुटका नाहीं. दैनंदिन जीवनक्रमाच्या व्यापांत गुरफटून जाऊन अगतिक, असहाय झालेल्या या सामान्य माणसाकडे पाहिलें कीं माझें अन्तःकरण करूणेनें भरून जातें. आपणा सर्वांचीच स्थिति आज अशी आहे कीं नाहीं याचा प्रत्येकानें स्वतःशीं थोडा विचार करून पहावा. एकाद्या भल्यामोठ्या साखळीनें एखाद्या छोट्या कुत्र्याला बांधून टाकलेलें असावें आणि कुणीतरी धष्टपुष्ट अडदांड माणूस ती साखळी खेंचीत असावा म्हणजे मग सांखळीबरोबर फरफटत जाण्याखेरीज त्या कुत्र्याला जसें गत्यंतर उरत नाहीं त्याप्रमाणें आपणहि सारेजण दैनंदिन जीवनक्रमाच्या सांखळीला बांधलें गेलों आहोंत आणि कुणीतरी अदृश्य पण बलवान् हात त्या साखळीबरोबर आपल्याला फरफटत खेंचीत नेत आहेत.

वस्तुतः आपली ही सारी धडपड कशासाठीं चाललेली असते बरें? तुम्ही म्हणाल, कशासाठीं म्हणजे काय? अर्थात् जगण्यासाठीं. माणसाला या जगांत जिवंत रहायचें असेल तर त्याला दोन्हीं वेळेला पोटाला अन्न मिळालें पाहिजे. आणि हें अन्न मिळायला हवें असेल तर त्यासाठीं त्यानें कांहींतरी कामधंदा करायला हवा. होय कबूल आहे हें सारें. पण जगण्यासाठीं जी धडपड आपण करीत असतों त्या धडपडींतच आपला इतका वेळ आणि इतकी शक्ति खर्च होते कीं त्यामुळें जगण्याचें आपण विसरून जातो. खरें म्हणजे जगणें, जगण्यांतला आनंद उपभोगणें हें आपलें साध्य आहे आणि धडपड करणें किंवा कष्ट करणें, हें त्या साध्याकडे आपणांस घेऊन जाणारें साधन आहे. पण कधीं कधीं साधनांलाच साध्य समजण्याची चूक होत असते.

आपलेंहि असेंच झालें आहे. जगण्यासाठीं धडपडतांना प्रत्यक्ष जगण्यांतला आनंद आपण मुळीं भोगीतच नाहीं. वस्तुत: हें जीवन किती आनंदपूर्ण आहे. जीवनांतील अगदीं लहान सहान गोष्टींत देखील असीम आनंद भरला आहे. वाऱ्याच्या थंड झुळकेचा उत्साहकारक स्पर्श, गडद निळ्या रंगानें भरलेलें अनन्त आकाश, दर्शनासरशी डोळ्यांना सुखवून तृप्त करणारी तजेलदार हिरवळ, सांजसकाळ तुम्हाला कुरवाळून तुमच्या नसानसांत चैतन्य खेळविणारीं सूर्यकिरणें, फुलांचें गहिरे रंग, बालांचें अवखळ हास्य, रमणीचे लाडिक विभ्रम, चांदण्या रात्रीची खिन्नकरुण शोभा, नक्षत्रांकित रजनीचें गूढ रहस्यमय सौंदर्य, पावसानें भिजलेल्या जमिनीचा मत्त गंध, वसंत ऋतूंतला आंब्याच्या मोहराचा धुंद दरवळ एक ना दोन किती म्हणून गोष्टी सांगाव्या? यापैकीं प्रत्येक गोष्ट सौंदर्यानें नटली आहे. पण यांतल्या किती गोष्टींचा आपण शान्तपणें स्थिरवृत्तीनें आस्वाद घेतों बरें ? अनेक लहानमोठीं सौंदर्यें आपल्याभोंवतीं विखुरलेलीं आहेत. मूक खुणा करून आपलें लक्ष वेधून घेण्याचा ती एकसारखा प्रयत्न करीत आहेत. पण क्षणभर थांबून त्यांच्याकडे पहावयाला, रसिक दृष्टीनें त्याचें अवलोकन करावयाला आपल्याला मुळीं वेळच नाहीं. We have no fime to stand and stare.

जगण्यासाठीं धडपडत असल्यामुळे जगण्याला सवड मिळत नाहीं हा मानवी जीवनांतला सर्वांत मोठा विरोधभास आहे असें मला वाटते. एकाद्या शर्यतींत घोड्यांनीं तुफान वेगानें धांवावें तसें जीवनाच्या मार्गावरून आपण धांवत असतों. आणि काय होत आहे किंवा काय झालें हें कळण्यापूर्वींच अचानक हा आपला प्रवास संपून आपण मृत्यूच्या पडद्याआड जात असतों. पुष्कळदां मला वाटतें, मरतांना माणसांच्या मनांत काय विचार येत असतील ? कित्येकदां मरणापूर्वीं माणसाची शुद्ध जाते आणि शारीरिक मृत्यू घडण्याआधींच त्याची जाणीव मरण पावलेली असते. अशा माणसाच्या मनांत मरणापूर्वीं कांहीं विचार येण्याचा प्रश्नच नाहीं. पण जीं माणसें पूर्णपणें शुद्धीत असतांना या जगाचा निरोप घेतात त्यांची मन:स्थिति मृत्यूच्या क्षणीं काय असेल ? मला वाटतें अशीं माणसें मरतांना स्वत:शीं खचित दु:खी होत असतील. आयुष्य जगतांना आपण इतकी घाई केली कीं त्यामुळें जीवनांतल्या अनेक छोट्या छोट्या सुखाचा आपणाला आस्वादच घेतां

आला नाहीं याची हळहळ अन्त्यक्षणीं या माणसांच्या वाट्याला आल्या-खेरीज रहात नसेल !

सारें जीवनच आज आपण घाई गर्दीनें आणि वेगानें जगत असल्यामुळें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांतहि आपण गति आणली आहे आणि अनेक ठिकाणीं या गतीचे विपरीत परिणाम झालेले दिसत आहेत. विज्ञानाचीच गोष्ट पहा, निरनिराळे शोध लावावयाची आणि ज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखा हस्तगत करावयाची विसाव्या शतकांत माणसाला इतकी घाई झाली कीं त्यामुळें जें हितकारक होतें, हवेसें होतें त्या बरोबरच जे अहितकारक आणि अनिष्ट आहे त्याचाहि शोध लावून तो मोकळा झाला. ॲटम बॉंब, हायड्रोजन बॉंब हीं मानवतेचा संहार करणारीं भयंकर शस्त्रें पाहिलीं म्हणजे माणसाचें गति-मय जीवनाचें आणि त्याच्या कधीं न शमणाऱ्या ज्ञानलालसेचें कौतुक वाटण्याऐवजीं त्या गोष्टींचा तिरस्कारच वाटत नाहीं काय ?

बरें, जीवनाच्या या घाईला किंवा गतीला कांहीं अंत आहे असें म्हणावें तर तसेंहि नाहीं. जों जों जास्त घाई करावी तों तों ही घाई अपरि-हार्य होत जाणार, आणि घाई अपरिहार्य झाल्यामुळें अधिक घाईनें जगावें लागणार. असें हें दुष्ट चक्र आहे. यांतून माणसाची मुळीं सुटकाच होणार नाहीं. घाई गर्दीनें जगत रहा आणि घाई गर्दीनेंच मरा असा आजच्या जगाचा आणि आजच्या युगाचा दण्डक आहे. सर्व सामान्य माणसाला या दण्डकापुढें मान वांकविल्यावांचून गत्यंतर नाहीं. शंकरानें भस्मासुर निर्माण केला आणि तोच भस्मासुर अखेर शंकराच्या मस्तकावर हात ठेवून त्याला जाळावयास सज्ज झाला. गतीचा, घाईचा हा भस्मासुरहि आपणच निर्माण केला आहे आणि आतां आपल्याच मस्तकावर हात ठेवायला तो उठला आहे—

हे सारे विचार मनांत आले म्हणजे मन भारी खिन्न आणि उद्विग्न होतें. कसल्याशा अनामिक भीतीनें अंतःकरण दाटून येतें. आजहि या विचारांसरशीं माझी अवस्था अशीच होते. मग मला कांहीं करावेसें वाटत नाहीं. हातांतलें पेन मी खालीं ठेवतें आणि खिडकीशीं येऊन उभी राहतें.

पावसाची एक सर नुकतीच पडून गेली आहे आणि झाडांची हिरवी-गार पालवी अतीव उल्हासानें सारखी सळसळत आहे. फांद्यांमधून, पानां-

मधून टपोरे थेंब खालीं टपटपत आहेत, आणि जाईच्या मांडवावर बसलेलें मुठीएवढें एक चिमुकलें गोजिरवाणें पांखरू चोंचीनें आपलीं पिसें साफ करण्यांत गर्क झालें आहे. किती सुंदर, किती शान्त, किती स्निग्ध दिसत आहे हें दृश्य? कुठें आहे इथें ती गर्दी, ती जीवघेणी धांवपळ !

माझ्या मनांत उसळलेला प्रक्षोभ एकदम शान्त होतो. विलक्षण समाधानानें माझें हृदय भरून येतें. समोर दिसणाऱ्या सुंदर दृश्यानें माझ्या विसकटलेल्या मनोवृत्ती पुन्हां नीट एकत्र जुळविल्या आहेत. जीवनांत वरवर भरलेल्या विसंगतीमागें असणाऱ्या अर्थपूर्ण सुसंगतीची मला जाणीव होत आहे आणि माझें मन मला सांगत आहे कीं जीवनाच्या पृष्ठभागावर कितीहि वेगानें लाटा येत असल्या, कल्लोळाचा, गतीचा तेथें कितीहि भास होत असला तरी अन्तर्यामी हें जीवन सागरासारखे संथ, गंभीर आणि स्थिर आहे. असें जर असेल तर मग वरवर दिसणाऱ्या या घाईला आणि वेगाला भिण्याचें काय कारण ? खरेंच काय कारण ?

माझ्या सर्व शंकांचें पूर्ण समाधान झालें आहे. मी खिडकीशीं उभी राहून झाडांच्या पालवीकडे एकटक बघत आहें. खरें म्हणजे माझा लेख तसाच अर्धा लिहून पडला आहे. आणखीहि किती तरी कामें व्हावयाचीं आहेत. पण यांतलें कांहींहि आतां करावयाची मला घाई नाहीं.

मला आतां कसलीच घाई नाहीं !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१६२ वि: निबंध
क्रमांक ...१२०६... नों: दि: ६।२।६०

# ५ : : चेहरे

रस्त्यानें जातां येतांना कितीतरी नवे नवे अनोळखी चेहरे आपणांला दिसतात पण या असंख्य चेहऱ्यांपैकीं एखादा विवक्षित चेहराच आपल्या मनःपटलावर ठळकपणें उमटून राहतो. तो आपण केव्हांहि विसरत नाहीं. आणि त्या चेहऱ्याचें पुन्हां केव्हांहि, कुठेंहि दर्शन झालें तरी त्याची ओळख आपणांस तात्काळ पटते. तो चेहरा सुंदरच असतो असें नाहीं. कित्येकदां तो कुरूपहि असेल. कधीं तो अत्यंत सामान्य असेल. कधीं तो विलक्षण दैन्यवाणा असेल तर कधीं तो क्रूर व भयानक सुद्धां असूं शकेल. तो विशिष्ट चेहराच आपल्या दृष्टींत कां भरतो आणि मनांत जाऊन कां ठसतो याला कांहीं कारण सांगतां येईलसें वाटत नाहीं. कांहीं चेहऱ्यांमध्यें आपणास ओळखीचा भास होतो. कांहीं चेहऱ्यांवरील भावांत आणि आपल्या मनोवृत्तींत एक विशिष्ट तऱ्हेचें संवादित्व असतें. तर कांहीं चेहऱ्यांकडे पाहिल्यावर आपल्या स्मृतिकोषांत खोल कुठेंतरी कांहीं अंधुक चाळवाचाळव झाल्यासारखें वाटतें. कित्येकदां तर एखादा चेहरा पाहून आपल्या मनांत जे जाणीवेचे तरंग उमटतात त्यांचें निश्चित स्वरूप आपण पुरतें समजून घेण्यापूर्वींच समोरचा चेहरा सभोंवतींच्या गर्दींत अदृश्यहि झालेला असतो. गडद काळोखांत वीज चमकली असतां समोर पुढच्यांत कांहीं वस्तु दिसावी, ती उचलून घेण्यासाठीं आपण हात पुढें करावा पण त्या वस्तूजवळ हात जाऊन पोहोंचण्यापूर्वींच पुन्हां

सभोंवतीं अंधार पसरावा आणि आपण गोंधळून चांचपडत रहावें–अशा वेळीं मनाला जें चुकल्याचुकल्यासारखें वाटतें त्याचाच अनुभव आपल्यासमोरील तो विशिष्ट चेहरा नाहींसा झाला म्हणजे येतो. जो चेहरा आजपर्यंत आपण कधीं पाहिलेला नव्हता आणि जो चेहरा उभ्या आयुष्यांत फिरून कधींहि दिसण्याचा संभव नाहीं त्या चेहऱ्याच्या एका क्षणाच्या दर्शनानें आपल्या मन:सृष्टींत एवढी प्रचंड उलथापालथ घडावीं हें केवढें आश्चर्य ! असें का होतें ? कालिदासानें आपल्या एका प्रसिद्ध श्लोकांत म्हटलें आहे ‘ रम्य वस्तु पाहून आणि मधुर शब्द ऐकून सुखी मनुष्याचें मनहि पर्युत्सुक होतें. कारण अशा वेळीं आपल्या पूर्वजन्मींचे जे लागेबांधे नेणीवेंत दडून राहिलेले असतात त्यांचें स्मरण होतें. ’ रम्य वस्तूंच्या दर्शनानें आणि मधुर शब्दांच्या श्रवणानें पूर्वजन्मीचे ऋणानुबंध आठवून माणसाच्या चित्ताला एक उत्कंठापूर्ण खिन्नता वाटते असें कालिदास म्हणतो. जे अनोळखी चेहरे पाहून आपलें मन खळबळतें, उचंबळतें, उत्कंठित होतें किंवा एका रम्य औदासीन्यानें भारावून जातें त्या चेहऱ्यांमागील व्यक्तींत आणि आपणांतहि पूर्वजन्मीचें कांहीं नातें असूं शकेल काय ? कोण जाणे !

कांहीं चेहरे आपणास एकदम आवडतात तर कांहीं चेहऱ्यांविषयीं आपल्या मनांत तात्काळ प्रतिकूल भावना निर्माण होते. या आवडीनिवडीचाहि सौंदर्याशीं क्वचितच संबंध असतो. कित्येकदां एकादा असुंदर चेहराहि मनांतून एकदम आवडून जाईल तर कधीं एकाद्या सुंदर चेहऱ्याकडे बघूनहि मनांत घृणाच निर्माण होईल. कांहीं चेहरे आरशासारखे असतात. संथ सरोवराच्या पृष्ठभागावर सभोंवतालची झाडी आणि माथ्यावरचें आभाळ जसें स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें असतें त्याप्रमाणें अशा चेहऱ्यांवर सभोंवतीं चाललेल्या घडामोडींचें चित्र लख्ख उमटतें. अशा चेहऱ्याच्या व्यक्तीच्या जवळ बसलेला माणूस काय बोलत आहे तें आपल्याला ऐकावयास आलें नाहीं तरी त्यामुळें या व्यक्तीच्या चेहऱ्यावर जे भाव प्रगटतात त्यावरून त्या बोलण्याची कल्पना करतां येणें सहज शक्य असतें. कांहीं चेहरे अतिशय भावदर्शी असतात. त्यांच्याजवळ मुळीं कांहीं लपूनच रहात नाहीं. नदीच्या पाण्यांतून तळची वाळू दिसावी त्याप्रमाणें हृदयांतले सारे भाव या चेहऱ्यामधून आरपार उमटलेले असतात. कांहीं चेहरे फार ‘ हलते ’ असतात.

सायंकाळीं आकाशांत तऱ्हतऱ्हेच्या रंगाच्या छटा जशा झरझर उमटून जातात त्याप्रमाणें अशा हलत्या चेहऱ्यांवर विविध भावनांच्या आणि विकारांच्या छटा अतिशय वेगानें एकामागून एक उमटत असतात. कांहीं चेहरे मोठ-मोठ्या दुकानांच्या दर्शनी भागांत ठेवलेल्या कांचेच्या शो-केसप्रमाणें असतात. जेवढें सुंदर, आकर्षक, प्रेक्षणीय, प्रदर्शनीय तेवढेंच नेमकें नटवून, सजवून, विद्युद्दीपांचे झोत पाडून तेथें नीटनेटके मांडून ठेवलेलें असतें. त्यावरून आंतील मालाच्या बरेवाईटपणाबद्दल खात्रीलायक हमी देतां येईलच असें कोणी समजूं नये. कांहीं चेहरे मयसभेप्रमाणें फसवे असतात. म्हणजे त्यांच्या बाबतींत जेथें जमिनीचा भास होतो तेथें पाण्यांत गटांगळ्या खाण्याची पाळी येते आणि जेथें पाणी असेलसें वाटतें तेथें खडकावर डोकें आपटून चक्काचूर होण्याची भीति असते !

नाक, ओठ, कपाळ, गाल हे आपआपल्या परी चेहऱ्यांचें वैशिष्टय व्यक्त करतात. नाहीं असें नाहीं. पण चेहऱ्याचा सारा वेगळेपणा व्यक्तिमत्व, सारी भावगर्भता जर कशांत सांठवलेली असेल तर ती म्हणजे डोळ्यांत. रमणीच्या सुंदर लोचनामध्यें वल्लभाला आपलें रम्य भवितव्य प्रतिबिंबित झाल्या-सारखें वाटतें. वृद्धाच्या गंभीर डोळ्यांमध्यें भूतकालीन सुख दुःखाचा इति-हास रेखाटलेला असतो. तरुणांच्या तेजस्वी नेत्रांत भावीकालाचीं आशापूर्ण स्वप्नें फुललेलीं असतात. बालकांच्या मुग्ध नयनांत केवळ बाल्यावस्थेंतच पहावयास मिळणारी अशी गूढ अद्भुत सृष्टि उमटलेली असते. डोळ्यांमध्यें सारें ब्रह्मांड भरलेलें असतें. ओठांनीं जें बोलून दाखवितां येत नाहीं तें डोळ्यांनीं सहज सांगतां येते. डोळे या मानवी अंतःकरणाच्या खिडक्या आहेत. डोळे ही हृदयांतील चैतन्याची साक्ष आहे. माणसाचा स्वभाव त्याच्या डोळ्यावरून कळतो. माणसाचें शील त्याच्या डोळ्यांवरून अजमावतां येतें. माणसाची बुद्धिमत्ता त्याच्या डोळ्यांतच चमकतांना दिसते. भीति, अनुकम्पा विलासीपणा, प्रणय, क्रोध, असूया, तिरस्कार, विरक्ति, खेद, हर्ष—मनःपृष्ठा-वर उमटणाऱ्या या विविध तरंगांचें प्रतिबिंब डोळ्यांमध्यें प्रथम दिसतें. प्रतिभावंत कवीचे तेजस्वी डोळे, प्रणयातुर कामिनीचे मदालस डोळे, चतुर मुत्सद्याचे कावेबाज डोळे, चिमुकल्या अर्भकाचे भाबडे डोळे, अनुभवी वृद्धाचे उदास डोळे—यापैकीं एकेका नेत्रयुगुलांत मानवी जीविताच्या महाकाव्याचा एकेक सर्ग रेखाटलेला आहे. कोणत्याहि चेहऱ्यांतले डोळे झांकून ठेवा, त्या चेहऱ्याचें अर्धें अधिक वैशिष्टय कमी झालेलें आढळून येईल आपणांस जे अनोळखी चेहरे दिसतात, त्यांचें आपलें दृष्टिमलिन झालें तरच त्यांच्या

विषयीं होणाऱ्या आपल्या बऱ्यावाईट मताला अधिक तीव्रता, अधिक निश्चितता येते.

सुंदर चेहऱ्याचीं माणसें सद्गुणी असतात आणि असुंदर चेहऱ्याचीं माणसें दुष्ट असतात असा एक ढोबळ नियम आपण मनाशीं बांधून ठेवलेला असतो. तो अर्थातच खरा नाहीं. पण तरी सुद्धां माणसाचा स्वभाव अगर त्याचें वर्तन आणि त्याचा चेहरा या दोहोंमध्यें एक विविक्षित संगति असते, यांत मात्र कांहींच शंका नाहीं. कालिदासाच्या 'कुमारसंभवां'तील बटुवेषधारी शंकर पार्वतीला म्हणतो, 'यदुच्यते पार्वति पापवृत्तयेन रूपमित्यव्यभिचारि तद्वचः– हे पार्वती, सौंदर्याची प्रवृत्ति सहसा पापाकडे असत नाहीं असें जें म्हणतात तें सत्य आहे.' याचाच अर्थ असा कीं सुंदर चेहऱ्यांच्या व्यक्ति बहुधा पापकर्मी नसतात. परंतु यांत थोडासा बदल करून असें म्हणावेसें वाटतें कीं सद्वर्तनीपणामुळें माणसाचा चेहरा आपोआपच सुंदर दिसूं लागत असावा. मन आणि शरीर यांचा अतिशय निकट संबंध आहे असें आधुनिक मानसशास्त्रज्ञ सांगतात. तें जर खरें असेल तर माणसाच्या सुंदर अन्तरंगाचें पर्यवसान त्याचें बहिरंग सुंदर दिसण्यांत कां होऊं नये ? या दृष्टीनें महात्माजींचीं वेगवेगळ्या वयातलीं वेगवेगळीं छायाचित्रें मोठीं सूचक व उद्बोधक वाटतात. एका सर्वसामान्य माणसापासून तों एका अलौकिक पुरुषश्रेष्ठांपर्यंत महात्माजींच्या जीवनाचा जो विकास होत गेला. त्याचा क्रमशः आलेख या छाया चित्रांमधून पहावयास मिळतो. भिन्न भिन्न काळांत घेतलेल्या महात्माजींच्या छायाचित्रांत खूपच वेगळेपणा आहे. आणि सूक्ष्म तर आपणास दिसून येतें कीं पूर्ववयांत सामान्यतः वैशिष्टयहीन असा निरीक्षण केलें असलेला महात्माजींचा चेहरा उत्त ेत्तर अधिक वेगळा, अधिक वैशिष्टयपूर्ण होत गेलेला आहे. वार्ध्यक्यावस्थेंतलें त्यांचें जे एक सुप्रसिद्ध छायाचित्र आहे. त्यामध्यें तर महात्माजींच्या आत्मिक सौंदर्याचा परमोत्कर्ष झालेला दिसतो. त्या विरुप चेहऱ्यावरील दन्तहीन हास्यामध्यें जगातील साऱ्या विशुद्ध सौंदर्याची परिसीमा झाल्याप्रमाणें वाटतें. महात्माजींच्या त्या वृद्धचेहऱ्याचें सौंदर्य असें उज्ज्वल, इतकें उदात्त आणि एवढें आकर्षक आहे कीं सौंदर्या विषयीचें सारे रूढ संकेत त्यापुढें कोलमडून पडतात. मला तर वाटतें, जगांतील अत्यंत सुंदर चेहऱ्यांची कुणी गणना करावयाचें ठरवील तर महात्माजींच्या जराजर्जर हास्यवदनाचा त्याला त्यांत अवश्य अन्तर्भाव करावा लागेल.

* * *

# ६ : : सर्वोच्च आनंदाचा क्षण

•

'जगीं सर्वसूखी असा कोण आहे !' हा मार्मिक प्रश्न रामदासांनीं विचारून ठेविला आहे आणि 'सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें' असल्याचा निर्वाळा तुकारामांनीं कधींच दिला आहे. तथापि या दोघांही सन्तश्रेष्ठांसंबंधीं अवश्य तो आदर मनांत बाळगूनहि जीवनांतील सुख-दुःखांच्या परस्परांशीं असलेल्या प्रमाणाविषयीं हे जे उद्‌गार त्यांनीं काढलेले आहेत त्यांत फारसें तथ्य नाहीं असेंच म्हणावें लागतें. जीवनांत केवळ सुख, निर्भेळ सुख माणसाच्या वांट्याला येत नाहीं ही गोष्ट खरी असली तरी जन्मभर तो केवळ दुःखांतच होरपळत असतो असेंहि नाहीं. जीवन सामान्यतः दुःखमय असलें तरी दुःखाच्या या सहाऱ्यांत सुखाच्या ओलसर आणि प्रसन्न हिरवळीनें भरलेल्या जागाहि कांहीं कमी नसतात. पण तरी देखील जीवनाचा आपण विचार करूं लागलों कीं, त्यांतील सुखकर अनुभूतीचें स्मरण होण्याऐवजीं दुःखाच्या चटक्यांचीच आपणांस आधीं आठवण होते. मला वाटतें याचें कारण थोडेसें असें असावें कीं सुख आणि दुःख या दोहोंचा जो अनुभव आपणांस जीवनांत येतो त्यांत जो फरक आहे तो प्रमाणाचा नसून तीव्रतेचा आहे. सुखाची अनुभूति अनुकूल असल्यामुळें ती इतक्या उत्कटतेनें माणसाच्या स्मरणांत राहात नाहीं. दुःखाची अनुभूति प्रतिकूल असल्यामुळें ती माणसाला फार तीव्रतेनें जाणवते आणि नंतरहि दीर्घकाळ त्याला तिची

आठवण राहते. जीवनांतील सुखांचा आपणांस चटकन् विसर पडतो आणि दु:खें मात्र सतत आपण मनांत घोळवीत राहतों. त्याचें रहस्य असें असलें पाहिजे. आणि म्हणूनच जीवनाचा आढावा घेतांना तें केवळ दु:खमय आहे असा निष्कर्ष आपण काढतों. रामदास आणि तुकाराम यांच्या वचनांचा तरी दुसरा काय अर्थ असणार ?

तथापि, कवि किंवा तत्त्वज्ञ कांहींहि म्हणोत, जीवनांत दु:खाइतकींच सुखेंहि आहेत. त्या दोहोंचें परस्परांशीं प्रमाण सारखेंच आहे. किंबहुना थोडेंसें धाडसाचेंच विधान करावयाचें तर सामान्यत: मानवी जीवन सुखमय आहे असेंच मी म्हणेन. निदान माझ्या स्वत:चा तरी जीवनाचा अनुभव सुखकर असाच आहे. सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यांत येणाऱ्या निराशा, मनोभंग, वियोग, अपमान इत्यादि दु:खांचे चटके मलाही वेळोवेळीं बसलेले आहेत. नाहींत असें नाहीं. पण तरी देखील आज यौवनाच्या मध्यावरून मागील कालाकडे मुरडून मी पाहूं लागलें कीं मन समाधानाच्या व कृतज्ञतेच्या भावनेनेंच भरून येतें. माझ्या जीवनांत आनंदाच्या, साफल्याच्या, तृप्तीच्या अनेक घटना येऊन गेल्या आहेत. निरतिशय उल्हासानें व प्रसन्नतेनें अन्त:करण उचंबळून ओसंडून वाहूं लागावे असे देखील कांहीं क्षण मी अनुभविले आहेत. होय. जीवनाचा माझा अनुभव अनुकूल असाच आहे.

पण जीवनांतील सर्वोच्च आनंदाचा क्षण कोणता याचा मी जेव्हां विचार करूं लागतें तेव्हां वैयक्तिक आकांक्षांच्या पूर्तीचे, लौकिक गौरवाचे, सन्मानाचे, अहंभावनेच्या तृप्तीचे असे जे जे क्षण मी अनुभविलेले आहेत ते सारे चटकन् बाजूला सरतात आणि एक विशिष्ट क्षणच तेवढा भूतकाळाच्या काळोखांत माझ्या नजरेपुढें हिऱ्यासारखा लखलखत राहतो. त्या क्षणानें मला जो आनंद दिला, जें समाधान दिलें तो आनंद व तें समाधान अन्य कोणत्याहि वेळीं मी अनुभवलेलें नाहीं. तो क्षण कोणता ? ती अनुभूति कोणती ? तेच मी येथें थोडक्यांत सांगणार आहें. सांगायचा प्रयत्न करणार आहे. 'प्रयत्न' म्हणायचें तें अशासाठीं कीं खरोखर ती विशिष्ट अनुभूति इतकी तरल आहे, इतकी सूक्ष्म आहे, इतकी चिमुकली आहे व तरीहि इतकी व्यापक आहे कीं शब्दांच्या जाळ्यांत तिला पकडणें भारी अवघड आहे.

त्या गोष्टीस आतां जवळजवळ बारा वर्षें होऊन गेलीं. त्रेचाळीस सालची हकीगत. त्यावेळीं मी ज्यूनियर एम. ए. च्या वर्गांत होतें आणि अभ्यास करण्यासाठीं म्हणून मी माझ्या आजोळीं येऊन राहिलें होतें. माझें आजोळ पुणें जिल्ह्यांतलें एक लहानसें तालुक्याचें गांव आहे. माझ्या बालपणाचा बराच भाग तेथें गेलेला आहे व मजवर निरतिशय प्रेम करणारे माझे आजोबा नि आजी तेथें राहतात. त्यामुळें आजोळवर माझा भारी लोभ आहे. ज्यूनियरचें वर्ष असल्यामुळें माझीं अभ्यासाचीं पुस्तकें घेऊन मी आजोळीं जाऊन राहिलें होतें. माझ्या आजोळच्या गांवचें वाचनालय फार चांगलें आहे आणि मराठीच्या अभ्यासाला उपयुक्त अशीं अनेक जुनीं दुर्मिळ पुस्तकें व जुन्या नियतकालिकांचे एकत्र बांधलेले अंक त्या वाचनालयांत आहेत. वाचनालयाचा भरपूर फायदा घेणें हाहि आजोळीं रहाण्यांतला माझा एक हेतु होताच.

माझे दिवस अत्यंत समाधानानें आणि निर्वेधपणें चालले होतें. घरांत आजोबा, आजी, मी स्वतः आणि आपल्या दोन मुलांसकट माहेरपणाला आलेली माझी धाकटी विवाहित बहीण एवढींच माणसें होतीं. दोन्हीं वेळां आजीच्या हातचें चवदार जेवण जेवावें, सकाळसंध्याकाळ बहिणीसह गांवाबाहेर लांब फिरायला जावें, उरलेल्या वेळांत भरपूर अभ्यास करावा, टिपणें काढावींत आणि अवान्तर वाचन करावें असा तेव्हांचा माझा दिनक्रम असें. रात्रीं बिछान्यावर पडून पुस्तकें वाचायला मला फार आवडतें. अशीं कित्येकदां मीं वाचीत राहिलें कीं रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत वेळ कसा जाई तें मला समजत नसे. एकंदरींत आजोळचा माझा रहिवास मला अत्यंत सुखदायक होत होता. दिवस रेशमाच्या धाग्यासारखे भराभर उलगडून जात होते.

असा कांहीं काळ गेला अन् मग एके दिवशीं एक विलक्षण घटना घडली. आमच्या आळींत राहणारा एक तरुण माणूस मुसलमान होता तो—चार पांच दिवसांच्या आजारानें तडकाफडकीं मरण पावला. त्याच्या पाठीमागें त्याची जैतून नांवाची तरुण, अगदीं पोरसवदा पत्नी व दोन मुलें एवढाच परिवार होता. त्या तरुण माणसाच्या मृत्यूनें सर्वांनाच भारी हळहळ वाटली. पण माझ्या मनावर त्या गोष्टीचा परिणाम झाला तो कांहीं विलक्षणच. खरें तर त्या माणसाला मी धड पाहिलेंहि नव्हतें. पण त्याची बायको

जैतून मात्र माझ्या परिचयाची होती. कित्येकदां आपल्या मुलांना घेऊन रस्त्यानें जातां येतांना ती मला दिसे. कधीं कधीं ती आमच्या घरीं सुद्धां येई. मला ती फार आवडत असे. त्यामुळें तिच्यावर एवढ्या कोवळ्या वयांत वैधव्याचा घाला पडल्याचें मी जेव्हां ऐकलें तेव्हां माझें मस्तक अगदीं सुन्न होऊन गेलें. क्षणभर साऱ्या संवेदना बधिर झाल्यासारखें मला वाटलें आणि मग अपरंपार दुःखानें माझें मन फुटून गेलें. आज माझा स्वभाव कांहींसा शांत झाला आहे आणि जीवनांत हरघडी येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाकडे थोड्याशा स्थितप्रज्ञ वृत्तीनें, थोड्या तडजोडीच्या भावनेनें बघायला मी स्वतःला शिकवलें आहे. पण बारा वर्षांपूर्वी माझा स्वभाव असा नव्हता. माझी वृत्ति अत्यंत उत्कट होती आणि संवेदना तलवारीच्या पात्यासारख्या तीक्ष्ण होत्या. त्या काळांत कोणत्याहि लहानसहान गोष्टीचा देखील माझ्या मनावर अतिशय खोल असा परिणाम होई. जैतूनच्या नवऱ्याच्या निधनाचें दुःख मला अत्यंत तीव्रतेनें जाणवलें त्याचें कारण हेंच होतें. जैतूनची कोवळी पोरसवदा आकृति पुन्हां पुन्हां माझ्या नजरेसमोर उभी राही. तिच्या दोन लहान मुलांचें भाबडें निरागस चेहरे दृष्टीसमोर तरंगून येत आणि मग माझें मन अतोनात व्याकुळ होई. मला पुन्हां पुन्हां वाटे, या जैतूननें, तिच्या लहान पोरांनीं आतां काय करावें ? कुणाच्या तोंडाकडे पहावें ? मृत्यू ही एक किती निर्घृण, आंधळी, विचारशून्य, आडदांड शक्ति आहे याची त्यावेळीं मला जेवढ्या तीव्रतेनें जाणीव झाली तेवढ्या उत्कटतेनें ती पूर्वी कधींच झाली नसेल, मी विलक्षण भयभीत झालें. मानवी जीवन किती क्षणभंगुर आहे याचा मला प्रत्यय आला आणि तो प्रत्ययदेखील अगदीं आकस्मिकपणें, अगदीं अनपेक्षितपणें असा आला. निश्चिततेनें गाढ झोपीं गेलेल्या माणसाला कुणीतरी फाडकन् मुस्काटांत देऊन जाग आणावी तसें जैतूनच्या नवऱ्याच्या मृत्यूनें जणूं चपराक देऊन मला जागें केलें.

त्यानंतर कित्येक दिवस माझी स्थिति फार विलक्षण होऊन गेली. मला अभ्यास सुचेना. वाचनांत माझें लक्ष लागेना. फिरण्यांत वा खेळांत मला गोडी वाटेना. मी अत्यंत बेचैन, अत्यंत उद्विग्न झालें. तरी पण घरांतल्या कुणाहि माणसाजवळ मी माझी परिस्थिति बोलून दाखविली नाहीं. माझें दुःख त्यांना कळेल असें मला वाटत नव्हतें आणि त्यामुळें माझा उपहास होण्याचा संभव

अधिक हें मला भय होतें. तथापि मनांतली खळवळ मी बाहेर दिसूं दिली नाहीं तरी आंतल्या आंत मी एकसारखी तळमळत होतें. पायाखालच्या जमिनीचा आधार एकदम खालून कुणी तरी काढून घ्यावा तसें कांहींसें मला वाटत होतें.

असे आणखीहि कांहीं दिवस गेले आणि मग एक दिवस असा उजाडला कीं, त्या दिवशीं सकाळपासून सारेंच कांहीं बिनसत गेलें. सकाळीं उठल्याबरोबर घरांतली एक भलीमोठी सुंदर बरणी माझ्या हातून फुटली. आंघोळीच्या वेळीं माझें एक आवडतें पातळ बंबावर पदर पडून जळलें. दुपारीं कधीं नव्हे तें माझें आणि माझ्या बहिणीचें भांडण झालें आणि संध्याकाळीं असेंच कांहीं तरी कारण घडल्यामुळें आजीचीं भरपूर बोलणीं खावीं लागलीं. माझा जीव अगदीं कावून कदरून गेला. माझ्या मनांत आलें, किती दुःखपूर्ण आहे मानवी जीवन ! आणि तरीसुद्धां जगण्यासाठीं जिवाचा कोण आटापिटा करतों आपण ! मरणाचें केवढें भय बाळगतों ! या जगांत माणसाच्या हातीं खरोखर कांहींच नसतें. नियतीच्या एका आंधळ्या, वेड्या लहरीसरशी जन्माला यायचें, तिच्या हातच्या निष्ठूर थपडा खात कसेंबसें आयुष्य घालवायचें आणि एके दिवशीं मृत्यूनें तुमच्या खवाट्याला धरून तुम्हांला फरफरा ओढीत नेलें म्हणजे त्याच्याबरोबर निमुटपणें जायचें ! काय अर्थ आहे जगण्यांत ? काय अर्थ आहे कोणत्याच गोष्टींत ?

या साऱ्या विचारांनीं माझ्या मनाची उद्विग्नता परमावधीस जाऊन पोंचली. तसें पाहिलें तर दिवसभर ज्या घटना घटल्या त्या इतक्या जिवाला लावून घेण्याजोग्या होत्या असें मुळींच नाहीं. यापेक्षां शतपटीनें दुर्धर व दुःखद अशा घटनांनाहि मीं अनेकवेळीं कितीतरी शांत व स्थिर वृत्तीनें तोंड दिलें आहे. पण त्या विशिष्ट दिवशीं माझें मन अत्यंत हळवें झालें होतें म्हणा, कीं एकेका वेळेचा गुण म्हणून म्हणा मी अत्यंत खिन्न होऊन गेलें. जीवनाचा मला पराकाष्ठेचा उबग आला पण त्याबरोबरच मरणाचेंहि फार भय वाटूं लागलें.

मनाच्या अशा दोलाचल अवस्थेंतच रात्रीचें जेवण कसेंबसें उरकलें आणि मग माडीवर जाऊन अंथरून टाकून मी वाचीत बसलें. मनाची व्यग्रता दूर करायला भरपूर कामाखेरीज दुसरा उपाय नसतो असा माझा इतक्या

दिवसाचा अनुभव आहे. पण त्या दिवशीं माझ्या आवडत्या पुस्तकांचा अभ्यास करतांनासुद्धां माझ्या मनाची बेचैनी नष्ट झाली नाहीं. मनावरचें खिन्नतेचें सावट दूर झालें नाहीं. कांहीं वेळानें मात्र हलकेहलके माझ्या व्यथेचा मला विसर पडूं लागला आणि मग बराच वेळ मी तन्मयतेनें वाचीत राहिलें.

घड्याळांत दोहोंचे ठोके पडले तेव्हां दचकून मी भानावर आलें. इतकी रात्र झाली असेल या गोष्टीची मला कल्पनाच नव्हती. पुढ्यांतली पुस्तकें मी घाईघाईनें मिटलीं आणि झोंपण्यापूर्वी चूळ भरून पाणी प्यावें या विचारानें हातांत पाण्याचा पेला घेऊन मी खिडकीशीं जाऊन उभी राहिलें.

खिककीशीं मी येतें तोंच वाऱ्याबरोबर एक अत्यंत मधुर, अत्यंत मादक सुगंध दरवळत येऊन मला बिलगला. मी उत्सुकतेनें खालीं वाकून पाहिलें. आमच्या अंगणांत मोगऱ्याचीं जीं छोटीं छोटीं झुडपें होतीं त्यावर पांढरी शुभ्र टपोरीं वाटोळीं फुलें फुललीं होतीं आणि मनाला वेडावून टाकणारा हा सुगन्ध त्यांनींच वातावरणांत उधळून दिला होता. त्या गोड वासानें छाती भरून घेत व तृप्तीचा निःश्वास टाकीत मी समोर पाहिलें--

त्या वेळीं मला जो देखावा दिसला आणि त्याची माझ्या मनावर जी प्रतिक्रिया झाली त्याचें मी कसें वर्णन करूं ? आजवर कधीं पाहिलें नाहीं कधीं अनुभविलें नाहीं असें कांहीं तरी त्यावेळीं मी पाहिलें आणि अनुभविलें. मध्यरात्रीची नीरव, निस्तब्ध शान्ति एखाद्या द्रव पदार्थाप्रमाणें वातावरणांत कांठोकांठ भरून राहिली होती. चहूंकडे गाढ मखमली काळोख पसरला होता आणि वरचें आकाश चमचमणाऱ्या लक्षावधि तारकांनीं नुसतें झगमगत होतें. काळ्या मखमलीवर हिऱ्याचा चुरा सांडावा तसें तें दृश्य दिसत होतें. लहानमोठे टपोरे, तेजस्वी लखलखीत तारे उधळून दिल्यासारखे इतस्ततः पसरले होते. कांहीं तारे तर इतके जवळ आल्यासारखे दिसत होते कीं माझ्या मनांत आलें, खिडकीबाहेर हात काढून मी तो वर केला तर यांतले चारदोन तारे मला सहज खुडून घेतां येतील. त्या कल्पनेनें सुखावून मी पुन्हां समोर नजर टाकली. सारें गांव निद्रावश झालें होतें. दूर अंतरावर चांदण्यांच्या मंदतेज प्रकाशांत अंधुकपणें दिसणारी डोंगराची रेषा काळोखांतून नजरेंत भरत होती. त्याच्या अलीकडे

शेतें व माळरानें पसरलीं होतीं. गांवाबाहेर पण गांवशिवेलगत असलेली मशीद काळोखाच्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगामुळें उठून दिसत होती. काळोखाला छिद्र पडून त्यांतून पलीकडचा तेजोमय प्रदेश दिसावा तशी ती पांढरी मशीद मला भासली. तिच्या अलीकडे गांवाकडेची मोठी सडक सर्पाकृति वळणें घेत दूर गेली होती. रस्त्याच्या पलीकडे असलेलीं झाडें काळचा कागदाच्या छायाकृति कातरून उभ्या कराव्यात तशीं दिसत होतीं. सडकेच्या अलिकडे आमचा वाडा आहे. वाडयाच्या कोपऱ्यांतलें लिंबाचें झाड आपलें मस्तक देखील न हलवितां शांत निःश्चल उभें होतें. अंगणांतल्या छोटचा छोटचा फुलझाडांचें पान हलत नव्हतें. माणसें, जनावरें, झाडें, पानेंफुलें, पांखरें सारीं गाढ झोंपलीं होतीं. सारें जगच झोंपी, गेलें होतें आणि त्या झोंपलेल्या जगावर कुणीतरी अज्ञात प्रेमळ हाताने तारकाखचित काळोखाची रत्नजडित मखमली शाल जणू मोठचा मायेनें आणि वात्सल्यानें ओढून घेतली होती.

तें सारेंच दृश्य मोठें विलक्षण होतें. त्यांत शांतता होती, सौंदर्य होतें, नाकावर बोट ठेवून चूप बसावयास लावणारा धाक होता, पण त्याबरोबरच प्रेमाचें आणि संरक्षणाचें गाढ आश्वासनहि होतें. मी त्या दृश्याकडे कितीतरी वेळ निःश्चलपणें टक लावून बघत राहिलें आणि मग एक अपूर्व अनुभूत भाव माझ्या हृदयांत उदय पावला. जणूं माझ्या डोळचांपुढचा एक जाड काळा पडदा खालीं गळून पडला आणि विश्वाचें ‘ कानडें रहस्य ’ मला जणूं एकदम उलगडलें. दुपारपासून जी आत्यंतिक उद्विग्नता माझ्या मनाला व्यापून राहिली होती ती तात्काळ नाहींशीं झाली आणि एका विलक्षण शांतीनें, समाधानानें माझें हृदय भरून गेलें. माझ्या मनांत आलें, विश्वाचा हा हा जो अफाट पसारा आहे याच्या पाठीमागें कांहींतरी संगति, कांहींतरी व्यवस्था खचित असली पाहिजे. या साऱ्याचा कुणीतरी शास्ता, नियन्ता असलाच पाहिजे. त्याला परमेश्वर म्हणा, निसर्ग म्हणा कीं आणखी कोणतेंहि नांव द्या, पण अशी एक कोणी तरी शक्ति अहर्निश जागरूकपणें, सावधपणें आणि प्रेमळ दक्षतेनें हें सारें विश्व सांभाळीत आहे यांत शंका नाहीं. आणि या जगांतील प्रत्येक लहान मोठी गोष्ट कांहीं एक गूढ अकल्पनीय नात्यानें परस्परांशीं बांधली गेलेली आहे यांतहि शंका नाहीं. माथ्यावर पसरलेलें हें

अफाट अन्तराळ आणि जमिनीवरच्या धुळीचा यःकश्चित कण, दूर अन्तरावर स्थिरपणें भूमींत पाय रोवून वर्षानुवर्षे उभे असलेले हे प्रचंड पर्वत आणि मोगऱ्यावर आज उमलून उद्यां धुळींत मिसळून जाणारी चिमुकलीं सुवासिक फुलें, समोरचीती निर्जीव मशीद आणि सुखदुःखांनीं थरथरणारा, कंपित होणारा माझा लहानसा जीव यासर्वांमधून एक सूत्र अखंडपणें गोवलेलें आहे. विश्वाच्या संसारांत प्रत्येक गोष्टीचें तिच्या परीनें स्थान ठरलेलें आहे. त्या प्रमाणेंच तिचें महत्त्वहि ठरलेलें आहे. असें जर असेल तर मानवालाहि या सर्व पसाऱ्यांत स्थान आहेच आहे. माझ्यासारखा एक क्षुद्र, यःकश्चित् महत्त्वहीन जीव देखील विश्वसंसारांत कांहींना कांहीं कामगिरी बजावीत आलाच पाहिजे. मग स्वतःला तुच्छ लेखायचें तें कशासाठीं आणि जीवाला कंटाळून जायचें तें काय म्हणून ?

——या विचाराबरोबरच कशी कोण जाणे एकाएकीं मला जैतूनच्या नवऱ्याची आठवण झाली. पण एरव्हीप्रमाणें यावेळीं त्याच्या मृत्यूचें मला दुःख वाटलें नाहीं. उलट माझ्या मनांत आलें, नियतीच्या ज्या विशिष्ट प्रेरणेनुसार मोगऱ्यावर फुलें फुललीं आहेत त्याच प्रेरणेनुसार जैतूनचा पति मरण पावला आहे. विश्वाच्या पसाऱ्यांत फुलाचें कुढणें ही घटना जेवढी अपरिहार्य तेवढीच माणसाचें मरण मी घटनाहि अटळ. विश्वचक्राची गति अव्याहत राहण्यासाठीं फुलानें जसें अवश्य फुललें पाहिजे तसेंच माणसानेंहि अवश्य मेलें पाहिजे. हें सारेंच अपरिहार्य आहे. आतां जैतूनची व तिच्या मुलांची मला काळजी वाटते खरी, पण ती काळजी करणारी मी कोण ? विश्वाचा जो नियन्ता जैतूनच्या पतीला घेऊन गेला तोच तिची व तिच्या मुलांची काळजी घेणार नाहीं काय ?

हे विचार खरें म्हटलें तर निराशेचे आहेत, पण त्यांच्या योगानें माझें मन निराश झालें नाहीं. उलट एका अनिर्वचनीय आशेनें व उल्हासानें तें फुलून आलें. मला स्वतःविषयीं वाटणारी हीनगंडाची भावना तात्काळ नष्ट झाली आणि मनाची सारी तळमळ क्षणार्धांत निवली. ब्रह्मानंद म्हणजे काय मला माहीत नाहीं व मोठ्यांना आत्मसाक्षात्कार होतो म्हणजे काय होतें त्याची मला कल्पना नाहीं. माझ्या मनाचा कल अध्यात्माकडे मुळींच नाहीं आणि मी संपूर्णपणें बुद्धिवादी आहें. पण तरी देखील त्या विशिष्ट रात्रीं, त्या

विशिष्ट क्षणीं निसर्गाचें तें विशिष्ट रूप बघतांना मला जें कांहीं जाणवलें त्याचें स्वरुप ब्रह्मानंदापेक्षां फारसें निराळें असेल असें मला वाटत नाहीं.

पेल्यांतल्या पाण्यानें चूळ भरून मी मागें वळलें आणि अंथरुणावर येऊन पडलें. दुसऱ्याच क्षणीं मला गाढ झोंप लागली.

त्या घटनेला आतां बारा वर्षें लोटून गेलीं आहेत. पण तरी देखील त्या रात्रींचें ते विशिष्ट क्षण अगदीं आतां अनुभविल्याप्रमाणें माझ्या स्मृतींत ताजे, टवटवीत, प्रफुल्ल आहेत. अजूनहि जीवनाचे प्रश्न जेव्हां अत्यंत बिकट होतात, पायाखालची वाट दिसेनाशी होते आणि मनावर नैराश्याचें काळें सांवट पसरतें तेव्हां ती रात्र मला आठवते आणि मग कुणीतरी पाठीवरून हात फिरवून प्रेमळपणें आपणांस आश्वासन देत आहे असा भास होतो. मन शांत होतें. निश्चित होतें.

त्या रात्रीं मी अनुभविलेले ते कांहींक्षण हे माझ्या जीवनांतील सर्वोच्च आनंदाचे होते.

* * *

## ७ :      :      चेतः समुत्कण्ठते

बऱ्याच वर्षांपूर्वी मम्मटाच्या 'काव्य प्रकाशां' त वाचलेला एक श्लोक परवां सहज पुन्हां एकदां मला आठवला. श्लोक असा आहे--

य: कौमारहर: स एव हि वरस्ताश्चैव चैत्रक्षपा–
स्ते चोन्मीलित मालतीसुरभय: प्रौढा कदम्वानिल:
सा चैवास्मि तथापि तत्र सुरतव्यापारलीलाविधै
रेवारोधसि वेतसीतरुतले चेत: समुत्कण्ठते

श्लोकाचा अर्थ असा : एक स्त्री म्हणते, " माझें कौमार्य हरण करणारा जो माझा प्रियकर तो तोच आहे. चैत्र महिन्यांतल्या रात्रीहि त्याच आहेत. कदम्ब वृक्षावरून वहात येणारे आणि मालतीच्या पुष्पांनीं सुगन्धित झालेले वारेहि तेच आहेत. मीहि तीच आहे. आणि आमच्या प्रणयक्रीडाही त्याच आहेत. रेवा नदीच्या तीरावरचें वेताच्या गुम्फेंतलें आमच्या प्रणयक्रीडांचें संकेतस्थळही पण तें पूर्वीचेंच आहे. परंतु हें सारें पूर्वींचेच असलें तरी सुद्धां त्याच प्रणयक्रीडा करतांना आज मात्र पूर्वींचा निर्भर आणि निरतिशय आनंद माझ्या प्रत्ययास येत नाहीं. आज माझें मन हुरहुरतें. उत्कंठित होतें. कसलीतरी अबोध उणीव जाणवून मी खिन्न होतें."

मम्मटानें ' काव्य प्रकाशा ' च्या पहिल्याच उल्हासांत हा श्लोक दिला आहे. त्यानें कोणत्या तरी एका विशिष्ट अलंकराचें उदाहरण म्हणून तो

दिला असावा असें वाटतें. हा श्लोक मम्मटानें कोणत्या काव्यग्रंथांतून घेतला आहे तें मला ठाऊक नाहीं. तसेंच मूळग्रंथकारानें हा श्लोक कोणत्या पात्राच्या तोंडीं घातला आहे. किंवा तो कोणत्या सन्दर्भानुसार त्यानें उपयोजिला आहे तेंही मला सांगतां यावयाचें नाहीं. मीं या श्लोकांचा जो अर्थ लावला आहे तो मुळांत कवीला कदाचित् अभिप्रेत नसण्याचाही संभव आहे. तें कांहींही असो या श्लोकानें माझ्या मनावर विलक्षण परिणाम केला आहे हें मात्र खरें. बी. ए. च्या वर्गांत शिकवतांना हा श्लोक जेव्हां मी प्रथम वाचला होता तेव्हांच तो माझ्या मनावर ठसला होता. त्या श्लोकाचें गांभीर्य पुरतेपणीं जाणवण्याइतकी अर्थातच तेव्हां मी वयानें किंवा भावनेनें प्रौढ नव्हतें. तरीसुद्धां तो श्लोक वाचल्यावर मला कांहींसें हुरहुरल्यासारखें वाटलें होतें. श्लोकांतल्या नायिकेप्रमाणेंच माझेंहि मन क्षणभर समुत्कंठित झालें होतें. आणि कांहीं एक अबोध खिन्नता माझ्या हृदयांत दाटून आली होती. त्या श्लोकाचा मनावर हा विशिष्ट परिमाण कां व्हावा तें त्यावेळीं मला सांगता आलें नसतें. पण आतां मला वाटतें, श्लोकाच्या अखेरीस असणाऱ्या 'चेतःसमुत्कण्ठते' या शब्दसंहतीनेंच माझ्या मनांत तें औदासिन्य निर्माण केलें असावें.

साहित्यशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें या श्लोकांतला रस शृंगार हा असेल. पण मला स्वतःला शृंगारापेक्षां येथें कारुण्याचाच जास्त प्रत्यय येतो. सकृद्दर्शनीं शृंगारिक वाटणाऱ्या या श्लोकांत मानवी आयुष्याच्या शोकमयतेचें रहस्यच कवीनें सांगून टाकलें आहे असें मला वाटतें.आपल्याला या आयुष्यांत जें अत्यंत तीव्रतेनें, उत्कटतेनें मिळावेंसें वाटतें तें मिळत नाहीं ही जीवनाची खरी 'ट्रॅजिडी' नाहीं. तर जें अत्यंतिकतेनें हवेहवेंसें वाटतें तें मिळाल्यावरही आपल्याला खरें समाधान लाभत नाहीं, उलट मन खिन्न आणि उदास होतें ही मानवी जीविताची खरी 'ट्रॅजिडी' आहे. प्रियकर तोच, वसंतऋतूंतल्या उन्मादक रात्री त्याच. फुलांच्या सुगंधानें–भारावलेले वारे तेच, संकेतस्थळ तेंच, प्रणयक्रीडा त्याच आणि प्रेयसीहि तीच पण तरी सुद्धां 'चेतः समुत्कंठते' इष्ट गोष्टींची प्राप्ती झाल्यावरहि मन तृप्तीचा निश्वास टाकीत नाहीं. तें हुरहुरतच राहतें. जीवनांतलें खरें दुःख जर कोणतें असेल तर तें हें आहे.

कोणत्याहि वस्तूबरोबर तिची सावली जशी अपरिहार्यपणें येते तद्वतच इच्छापूर्तीच्या पाठोपाठ मनाची ही निराशा आणि हुरहुरही यावयाची

हें जणूं ठरलेलेंच आहे. इतकेंच नव्हे तर अपेक्षेची तीव्रता जितकी अधिक तितकीच प्रतिक्रियेनें येणाऱ्या या निराशेची तीव्रताहि असह्य असते. प्रणयासारख्या अत्यंत उत्कट आणि भावनेलाहि या निराशेच्या प्रतिक्रियेपासून मुक्त होतां आलेलें नाहीं. आसक्तीच्या मागोमाग विरक्ति, रतीच्या मागोमाग विरति यावयाची हा जीवनाचा कठोर कायदा आहे. म्हणूनच निर्भर आनंदानें गाणाऱ्या स्कायलार्क पक्षाला उद्देशून शेलेनें म्हटलें असावें,—

'Thou Knowest love but not its Sad Satiely'

'वा पक्ष्या, तुला प्रीतीचा अनुभव आला असेल, पण प्रीतीच्या पाठोपाठ अपरिहार्यपणें येणारा जो उबग किंवा वीट, तो मात्र तूं कधींच अनुभवला नसावास. एरव्ही तूं इतक्या उत्कट हर्षानें गात राहिला नसतात.'

हें असें कां बरें होतें ? अपेक्षेंत जें सुख आहे तें अपेक्षापूर्तींत कां नसावें ? खरें तर पहातां तें सुख अधिक उत्कट, अधिक तृप्तिकारक असावयास हवें. पण अनुभव तसा येत नाहीं हें मात्र खरें. विशिष्ट गोष्टीची अपेक्षा करतांना माणूस आनंदानें बहरून गेलेला असतो. पण ती अपेक्षा पूर्ण झाल्यावर मात्र अपरिहार्यपणें तो उदास होतो. अपेक्षापूर्तीनंतर माणसाच्या मनाला ही जी खिन्नता येते तिचीं कांहीं कारणें असलीं पाहिजेत. मला वाटतें, ज्यावेळीं माणसाला एकादी गोष्ट अत्यंत तीव्रतेनें हवी असते त्यावेळीं तो त्या अपेक्षित गोष्टीचें स्वतःच्या मनाशीं एक सुंदर चित्र रेखाटीत असतो. हें चित्र रेखाटतांना आपल्या भावनेंचे आणि कल्पनेंचे अद्भूत रंग तो त्यावर चढवीत असतो. आणि मग ती अपेक्षित गोष्ट त्याला अतिशय सुंदर वाटूं लागते.तथापि त्या वस्तूंत हें जें सौंदर्य त्याला दिसतें ते सौंदर्य मुळांत त्या वस्तूंत नसतें, तें अपेक्षा करणाराच्या मनांतच असतें.आपल्याच भावनेचें लेणें त्या वस्तूवर त्यानें चढविलेलें असतें, आणि म्हणून ती अपेक्षित गोष्ट त्याला इतकी सुंदर वाटत असतें. तथापि त्या गोष्टीचा त्याला प्रत्यक्ष जेव्हां लाभ होतो तेव्हां तिचें वास्तव स्वरूप त्याला कळून येतें. आणि मग, ज्या सौंदर्याचें चित्र आपण इतके दिवस बघत होतों तें सौंदर्य केवळ आपल्या कल्पनेचें, भावनेचेंच होतें ही कटु जाणीव होऊन तो खिन्न होतो. अपेक्षापूर्तीनंतर मनाला औदासीन्य येण्याचें आणखीही एक कारण संभवतें. ज्या वेळीं मनुष्य कोणत्याहि एकाद्या गोष्टीच्या पाठीमागें धांवत असतो त्यावेळीं आपल्या सर्व शक्ति हें विशिष्ट

१०२५८

स्थान गांठण्यावरच केन्द्रित केलेल्या असतात. त्या स्थानीं जाऊन पोहोंचल्यावर पुढें काय करावयाचें याचा त्यानें मुळीं विचारच केलेला नसतो. आपण त्या स्थानापर्यंत जाऊन पोहोंचलें पाहिजे एवढेंच जणूं त्याला ठाऊक असतें. त्यामुळें एकदां तें इष्ट स्थान गांठलें कीं, मग तो गोंधळतो, वावचळून जातो. एवढा वेळ विलक्षण ताणून धरलेल्या त्याच्या साऱ्या शक्ति एकदम ढिल्या पडतात. पुढें काय करावें तें त्याला सुचेनासें होतें. आणि मग साहजिकच त्याचें मन उदास होतें.

पुष्कळदां हें असें घडत असलें तरी कांहीं वेळां असेंहि होतें कीं अपेक्षापूर्तीनंतर अकल्पनीय सुखाचा लाभ झालेला असतो. आपलें ईप्सित हें आपल्या अपेक्षेहूनहि अधिक सुंदर, अधिक आल्हादकारक आहे असें आढळून येतें. पण तरीसुद्धां मनाची ही हुरहुर थांबत नाहीं. येवढें लाभलें खरें, पण याहूनही आणखी कांहीं हवें होतें. निराळें कांहीं तरी हवें होतें अशी चुटपूट मनाला लागून राहते. हें 'आणखी' आणि 'निराळें' काय तें माणसाला नेमकें बोट ठेवून सांगतां येत नाहीं, पण त्याची उणीव मात्र त्याला स्पष्टपणें आणि तीव्रतेनें जाणवत राहते. 'चेत: समुत्कण्ठते' हा त्याला अनुभव येतो. आणि मग तो उदासीन होतो. इष्ट वस्तूचा लाभ झाला नाहीं तर माणूस दु:खी होतो, पण तिचा लाभ झाला तरीसुद्धां तो दु:खीच होतो, ही गोष्ट चमत्कारिक वाटत असली तरी ती सत्य आहे. मला वाटतें, यामुळेंच ऑस्कर वाईल्डनें आपल्या एका नाटकांत पुढील अर्थाचे उद्गार काढले असावेत—

'There are two tragedies in life. One is not to get what you want and the other is to get what you want.'

सर्वसामान्य माणसांच्या ठायीं दिसून येणारी ही असंतुष्टता, आणखी कांहीं तरी हवेंहवेंसें वाटण्याची ओढ कलावंतांमध्यें तर अधिक तीव्रतेनें आढळून येते. किंबहुना ही असंतुष्टता अधिक प्रमाणांत त्यांच्यामध्यें असल्यामुळेंच ते कलावंत झालेले असतात असें म्हटलें तरी चालेल या असमाधानालाच कलावंताचा 'दैवी असंतोष' (Divine Discontent) म्हणत असावेत. जातिवंत कलावंत सदैव तो असंतोषानें पछाडलेला असतो. जीवन, प्राप्त परिस्थिति, चालू समाजरचना, प्रचलित नीतिकल्पना,—प्रत्येक गोष्टीविषयीं तो असंतुष्ट असतो. आणि त्याच्या या मन पोखरणाऱ्या तीव्र असंतोषांतून

सुंदर सुंदर कलाकृति निर्माण होतात. स्वतःच्या कलाकृतीबद्दलसुद्धां कलावंताचें मन कधीं संतुष्ट नसतें. रंगाचें आणखी एक मिश्रण साधलें असतें तर, अर्थाची आणखी एक छटा व्यक्त करतां आली असती तर, भावनेचा आणखी थोडा आवेग दाखवितां आला असतां तर, असें त्याला एकसारखें वाटत राहतें. आपल्या कलाकृतीचें जें सुंदर रूप आपण कल्पनेनें मनाशीं रंगविलें होतें त्यापेक्षां प्रत्यक्ष हातून निर्माण झालेली कलाकृति रेसभर उणी पडत आहे ही हुरहूर त्याला एकसारखी व्यग्र करीत असते. आणि जोंवर ही असंतुष्टता त्याच्या ठायीं असते तोंवरच उत्तमोत्तम कलाकृति त्याच्या हातून निर्माण होत राहतात. तो संतुष्ट झाला कीं त्याच्या कलेची प्रगति थांबलीच म्हणून समजावें. 'संतुष्ट कलावंत' हें वदतो व्याघाताचेंच उदाहरण म्हणावयास हवें.

मनुष्य असा सदैव असंतुष्ट कां असतो ? मला वाटतें, मनुष्याचें मन हें स्वभावतः ऊर्ध्वगामी असावें. आहे त्यापेक्षां अधिक वरच्या पातळीवर जाण्याची त्याची धडपड सदैव चालली असावी. आणि त्यामुळेंच कोणत्याहि गोष्टीविषयीं पुरतें समाधान त्याला कधीं वाटत नसावें. आपणांपैकीं प्रत्येकांत दैवी आणि पाशवी अंश आहे असें आपण म्हणतों. ज्या ज्या वेळीं आपण असंतुष्ट होतों त्या त्या वेळीं आपल्यामधला दैवी अंश प्रकट होण्यासाठीं, स्वतःचें आस्तित्व प्रस्थापित करण्यासाठीं धडपडत असावा. प्राप्त परिस्थितींत संतुष्ट राहणें ही जर पाशवी—म्हणजे पशूलाच शोभणारी, प्रगतिपराङ्मुख वृत्ति असेल तर प्राप्त परिस्थितींत संतुष्ट न राहतां जवळ आहे त्यापेक्षां अधिक कांहींतरी मिळविण्यासाठीं आतुर होणें हें दैवी वृत्तीचें लक्षण मानावयास हवें.

'चेतः समुत्कण्ठते' या शब्दसंहतींत मानवी जीविताच्या शोकपरतेचें रहस्य सांठविलेलें आहे असें मीं प्रथम म्हटलें, पण आतां मला वाटतें 'चेतः समुत्कण्ठते' ही जाणीव हेंच साऱ्या कला, शास्त्र, तत्त्वज्ञान यांचें उगमस्थान आहे आणि पर्यायानें मानवाच्या आधिभौतिक आणि आत्मिक उन्नतीचाही तोच महामंत्र आहे.

* * *

## ८ : : बेला फुले आधी रात

कांहीं दिवसापूर्वींची गोष्ट. मी आमच्या परिचयांच्या एका साहित्यिकांकडे त्यांना भेटण्यासाठीं म्हणून गेलें होतें. बराच वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर सध्यां नवीन वाचन कुणाचें काय चाललें आहे असा प्रश्न निघाला. त्यावर हल्लीं आपण हिंदी भाषेंतलीं लोकवाङ्मयावरचीं पुस्तकें वाचीत आहोंत असें त्या साहित्यिकांनीं उत्तर दिलें. त्यांच्या समोरच्या मेजावर कांहीं पुस्तकें पडलेलीं दिसत होतीं. त्यांतलें एक पुस्तक मी सहज हातीं घेऊन पाहूं लागलें. पुस्तकाचें नांव होतें 'बेला फूले आधी रात' मला तें नांव फार आवडलें. मी कुतूहलानें विचारलें 'कसलं पुस्तक आहे हें ?'

'ती एक कादंबरी आहे' लेखक महाशय म्हणाले. 'लेखकाचं नांव देवेंद्र सत्यार्थी. मी अजून तें पुस्तक कांहीं वाचलें नाहीं. पण मला तें वाचायची घाईहि नाहीं. तुम्हांला हवं असेल तर घेऊन जा तें पुस्तक. वाचून झाल्यावर सवडीनं धाडून द्या म्हणजे झालं.'

मी हातांतलें पुस्तक चाळल्यासारखें केलें आणि मग तें पुन्हां मेजावर ठेवून देत म्हटलें, 'सध्यां नको हें पुस्तक मला.'

'कां हो ? न्या ना. खरंच न्या. मला घाई नाहीं त्याची.'

'छे ! हल्लीं नकोच हें मला. नेईन पुढं-मागं केव्हांतरी.' किंचित् हंसून मीं म्हटलें.

त्यावर ते साहित्यिक कांहीं बोलले नाहींत. पण त्यांच्या ओठांवर उपरोधिक स्मिताची एक अस्फुट रेषा मात्र उमटल्याचा मला भास झाला. त्यांच्या मनांत आलें असेल, या बाईला हिंदी कळतच नसेल मुळीं. आणि तें आपलें अज्ञान मुकाट्यानें कबूल करण्याऐवजीं तूर्त आपल्याला हें पुस्तकच वाचायला नको असें ही सांगतें आहे.

त्यांचा तो गैरसमज होता. कारण मला वाचण्यापुरतें हिंदी समजतें. पण मी तो गैरसमज दूर करण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. 'बेला फूले आधी रात' हें पुस्तक त्यादिवशीं मी वाचावयाला घेतलें नाहीं याचें खरें कारण फार निराळें होतें. आणि तें कारण थोडक्यांत त्या साहित्यिकांना सांगतां येण्याजोगें नव्हतें. म्हणून त्यांचा मजविषयीं झालेला गैरसमज पत्क-रूनहि मी गप्पच बसलें.

—त्या दिवशीं तर तें पुस्तक मी वाचायला घेतलें नाहींच, पण यापुढेंहि तें पुस्तक कधींच वाचायचें नाहीं असें मीं मनाशीं ठरवून टाकलें आहे.

कां तें सांगतें.

'बेला फूले आधी रात' हें त्या पुस्तकाचें नांव फार सुंदर आहे. त्याचा मराठींत अर्थ सांगावयाचा झाला तर तो असा सांगता येईल. 'मोगरा अर्ध्या रात्रीं फुलतो' इतकें सुंदर नांव दुसरें कोणतें असूं शकेल काय? हें नांव वाचलें म्हणजे काळोख्या रात्रीं फुलून आसमंतांत आपला सुगन्ध उधळ-णाऱ्या पांढऱ्याशुभ्र टपोऱ्या मोगऱ्याच्या फुलांचें एक अस्पष्ट रमणीय चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें रहातें. या चित्राची माझ्या मनांवर विलक्षण मोहिनी पडलेली आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचलें तर कदाचित् ती मोहिनी नष्ट होईल असें मला भय वाटतें. पुस्तकाच्या नांवाचा आणि पुस्तकाच्या आंतील विष-याचा फारसा संबंध असतोच असें नाहीं. कित्येकदां तर त्या दोहोमध्यें संपूर्ण विसंगतीहि असते. 'बेला फूले आधी रात' या पुस्तकाच्या बाबतींतहि मला तोच अनुभव येणार नाहीं कशावरून? पुस्तकाच्या नांवांत जी 'मोगऱ्याचीं' फुलें उमललीं आहेत त्यांचा पुस्तकांत कुठें मागमूसहि लागा-यचा नाहीं. उलट येथें एकाद्या रूक्ष राजकीय मतपंथाची अगर एकाद्या जटिल सांस्कृतिक समस्येची तर्ककर्कश चर्चाच आढळेल, असेंहि होणें अगदीं

शक्य आहे. अर्थात् ही चर्चा वाचली तर त्यामुळें माझें मोठेंसें नुकसान होईल असें नव्हे. झाला तर माझा फायदाच होईल. माझ्या ज्ञानांत त्यामुळें भर पडेल. आणि हल्लीं एकाद्या ठिकाणी राजकीय अगर सांस्कृतिक विषयांवर चर्चा चालली असतांना माझ्या अज्ञानामुळें मला जें मौन पत्करावें-लागतें तसें तें यापुढें पत्कारावें न लागतां तेथें मीहि एकादें वाक्य अधिकार-वाणीनें बोलूं शकेन. हें सारें खरें, पण हे सर्व फायदे गृहित धरूनसुद्धां त्यासाठीं 'बेला फूले आधी रात' हें पुस्तक वाचावें असें मला मुळींच वाटत नाहीं. एकतर वर सांगितलेलें सारें ज्ञान आपल्याला मिळावें असें आधीं मला मुळीं वाटतच नाहीं. दुसरें म्हणजे तें मिळवावेंसें वाटलें तरीसुद्धां, त्यासाठीं, त्या विषयांची माहिती देण्यासाठींच जाणून बुजून जीं शास्त्रीय पुस्तकें लिहिलीं. गेलीं आहेत त्यांच्याकडे मी वळेन. 'बेला फूले आधी रात' हें सुंदर आणि काव्यमय नांव धारण करणाऱ्या पुस्तकांतून तें रूक्ष तात्त्विक ज्ञान मला नको. अशा मोहक नांवांचीं पुस्तकें कुणी शास्त्रीय ज्ञानासाठीं कां वाचतें ?

अर्थात् हें सारें माझें केवळ तर्कटहि असेल. हिंदी वाङमयाशीं माझा फारसा परिचय नाहीं. त्यामुळें देवेंद्र सत्यार्थी या लेखकाची वाङमयीन महा-त्मता कोणत्या प्रकारची आहे या विषयीं मला कांहींच सांगतां यावयाचें नाहीं. त्यांच्या लेखनाची वैशिष्टयेंहि मला ठाऊक नाहींत. 'बेला फूले आधी रात' या त्यांच्या पुस्तकाचा विषय पुस्तकाच्या नांवाशीं अगदीं सुसंगत असा काव्यमय असण्याचाहि संभव आहे. पण तो संभव गृहित धरूनसुद्धां तें पुस्तक वाचायला मी तयार नाहीं. कारण तो संभव चुकीचा ठरला तर–हो. उगीच विषाची परीक्षा पहा कशाला ?

कोणत्याहि सौंदर्याच्या फार जवळ जाऊं नये असेंच मला वाटतें. दुरून जें सुंदर दिसतें, लोभनीय दिसतें, आकर्षक दिसतें तें जवळून तसें दिसेलच असें नाहीं. माधव ज्यूलियनांच्या एका कवितेंतील नायक आपल्या वल्लभेला म्हणतो, " दुरुनी दिसतेस देवता ! जवळूनी दिसशील काय गे ? " त्या नायकाला पडलेलें हें भय सौंदर्यानें लुब्ध होणाऱ्या प्रत्येक रसि-काला पडलेलें असतें. सौंदर्य हें रातराणीच्या सुगंधासारखें असतें. दंव बिंदू-सारखें असतें. रातराणीच्या फुलांचा दुरून वाऱ्यावर तरंगत येणारा सुवास किती मोहक असतो ! सकाळच्या वेळीं गवताच्या पात्यांवर चमकणारें दंव

बिंदु किती सुंदर दिसतात ! पण रातराणीच्या फुलांचा जवळून वास घेऊं लागलें तर लौकरच डोकें सुन्न होऊन जातें. आणि दंवाचें बिंदु हातांत वेचून घ्यायला जाऊं म्हटलें तर हात ओले होण्याखेरीज दुसरें कांहींच पदरांत पडत नाहीं. सौंदर्याशीं फार लगट करावयाला गेलें म्हणजे हा असा मनोभंग होतो. त्यापेक्षां सौंदर्याच्या फारसें जवळच न गेलें तर काय बिघडलें ?

सौंदर्याच्या संन्निध गेलें म्हणजे कशी निराशा होते याचा मला गाण्यांच्या बाबतींत फार वेळां अनुभव आलेला आहे. कित्येक वेळां असें होतें. चित्रपटांतल्या एकाद्या गीताची एकादी अर्धवट ओळ कुणी गुणगुणतांना आपण ऐकलेली असते. किंवा रेडिओंतून ती आपल्या कानांवर पडलेली असते. त्या अर्धवट ओळींतल्या कल्पनेचा वा भावनेचा सुगंध एकदम आपल्या मनांत घुसतो आणि आपल्या चित्तवृत्ति धुंद, बेभान करून सोडतो. एक अस्पष्ट मधुर चित्र आपल्या डोळ्यापुढें उभें राहतें. त्या चित्रांतल्या रेषा आपण कल्पनेनें पुऱ्या करतों. त्या चित्राचे रंग आपण आपल्या मना प्रमाणें भरतों. आणि अशारितीनें आपण पुरें केलेलें तें चित्र आपल्याला अत्यंत रम्य दिसतें. पण एकादेवेळीं नुसत्या या चित्राच्या सौंदर्यावर आपली तृप्ति होत नाहीं. तर हें गाणें मूळ ज्या चित्रपटांत आहे तो चित्रपट प्रत्यक्ष जाऊन पाहण्याची आपल्याला दुर्बुद्धि सुचते. आणि मग–मग काय होतें तें सांगायलाच कां हवें ? चित्रपटांत तें गाणें अशा चमत्कारिक ठिकाणीं अशा विचित्र सन्दर्भांत वापरलेलें असतें कीं त्या गाण्याची अर्धवट ओळ ऐकल्यामुळें आपल्या मनांत जें एक रमणीय चित्र उभें राहिलेलें असतें आणि ज्यावर आपण कल्पनेनें अनेक नयनमनोहर रंग चढविलेले असतात तें चित्र क्षणार्धांत कोसळून खालीं पडतें. आणि त्या मोडक्या तोडक्या चित्राचें फुटलेले तुकडे पदरांत बांधून आपण खिन्न मनानें घरीं परतये तों. मला तरी असा अनुभव फार वेळां आलेला आहे. ‘जवाब’ चित्रपटाच्या वेळचीच गोष्ट सांगतें. ‘जवाब’ मधलें काननबालेचें एक फार सुंदर गाणें आहे. ‘उडता हुवा ये पंछी भूलेसे इधर आया। अनजानसे इस घर को अपनाहि घर बनाया !’ असा त्या गाण्याचा आरंभ आहे. आणि ‘ऐ चाँद छुपना जाना’ हें त्याचें ध्रुपद आहे. मीं हें गाणें रेडिओवर जेव्हां प्रथम ऐकलें तेव्हां तें मला इतकें आवडलें होतें म्हणून सांगूं ? पण गाण्याच्या लोभानें मी जेव्हां ‘जवाब’

पहायला गेलें तेव्हां माझी अगदींच निराशा झाली. निराशा चित्रपटाबाबत झाली नाहीं तर चित्रपटांत मला आवडलेलें गाणें ज्या विशिष्ट ठिकाणीं आणि ज्या विशिष्ट रीतीनें टाकलेलें आहे त्याबद्दल झाली.

तेव्हांपासून मी ठरवून टाकलें आहे, चित्रपट बघायला जायचें असेल तर तो कधीं गाण्यासाठीं बघूं नये. गाण्यासाठीं बघायचाच असेल तर त्या गाण्यांभोंवतीं कल्पनेनें आधीं स्वप्नसृष्टि निर्माण करूं नये आणि स्वप्नसृष्टि निर्माण केलेली असलीच तर तिचा पडताळा चित्रपटांत घेतां येईल अशी अपेक्षा मनाशीं बाळगूं नयें. कारण चित्रपटांतील गीतांभोंवतीं आपण जे मधुर कल्पनाजाल विणतों त्याचें प्रत्यक्ष चित्रपटांत प्रत्यंतर आणून देणारा दिग्दर्शक अजून जन्माला यावयाचा आहे.

सैगलचे कितीतरी प्रसिद्ध चित्रपट या कारणामुळेंच मी अजून पाहिलेले नाहींत. सैगलचीं गाणीं सर्वांनाच आवडतात तशीं तीं मलाहि आवडतात. तीं गाणीं त्यानें ज्या चित्रपटांत गाइली आहेत ते चित्रपटहि फार नामांकित आहेत. पण सैगलच्या कांही गाण्यांनीं माझ्या मनांत एक अशी अद्‌भुतरम्य सृष्टि निर्माण झालेली आहे कीं ती सृष्टि कोणत्याहि कारणामुळें उध्वस्त होऊं द्यावयास मी तयार नाहीं. उदाहरणार्थ ही पुढील गीतपंक्ति पहा. ‘सोजा राजकुमारी सोजा’ सैगलच्या दर्दभरी आवाजांत ज्या ज्या वेळीं हें गाणें मी रेडिओवर ऐकतें त्या त्या वेळीं जगांतला सनातन वल्लभ आपल्या सनातन प्रेयसीचें शिर अंकावर घेऊन तिला हें गीत गात आहे असें मला वाटतें. हें एक दुसरें गाणें पहावें, ‘बाबुल मोरा नैहर छूटा न जाय’ याचा अर्थ असा : हे प्रिया, माहेर माझ्यानें सोडवत नाहीं. ही भैरवी मी ऐकली म्हणजे माझ्या मनांत येतें, हें जग सोडून परमेश्वराकडे जावयास निघालेला आत्मा व्याकुळ होऊन म्हणत आहे, ‘प्रभो, मला तुझ्याकडे यावयास हवें खरें, पण कांय करूं ? या सुंदर जगाचा मोह मला सुटत नाहीं. हें ममतेचें माहेर माझ्यानें सोडवत नाहीं. बाबुल मोरा, नैहर छुटा न जाय ! सैगलप्रमाणें पंकज मलीकचीहि कितीतरी गीतें मनाला चटका लावून डोळ्यापुढें रम्य सृष्टि निर्माण करतात. ‘पिया मिलनको जाना’ हें त्याचें अंतरगीत ऐकलें म्हणजे मीलनाची आशा बाळगून युगानुयुगें प्रियकराकडे जात असलेल्या अभिसारिकेच्या हृदयांतील आकांक्षाच मूर्तरूप धारण करून आपल्यापुढें

उभ्या आहेत असें वाटूं लागतें. हीं सर्व गीतें माझ्या डोळ्यांपुढें सुंदर सुंदर चित्रें रंगवितात, कल्पनेच्या आणि भावनेच्या मधुर सुगंधानें तीं माझ्या चित्ताला धुंद करून सोडतात. या धुंदीवर माझा जीव लुब्ध झालेला आहे. चित्रपट प्रत्यक्ष पाहून त्यांतून हीं गातें ऐकलीं–तर कदाचित् ही धुंदी नष्ट होईल असें मला भय वाटतें. व त्यामुळेंच हे चित्रपट बघण्याची अनेकदां संधि आलेली असतांहि ते पहाण्याचें मी टाळलेलें आहे. ते चित्रपट न पाहिल्यामुळें माझ्या सुखांत खूप मोठी उणीव राहिलेली आहे हें मला पटतें. पण ती उणीव भरून काढण्यासाठींदेखील हे चित्रपट मी कधीं पहाणार नाहीं.

हें असें कां होतें ? एकाद्या सौंदर्याचें जवळून दर्शन घेतांना किंवा त्या सौंदर्याचा तपशील समजावून घेतांना आपल्या पदरीं निराशा कां पडते ? मला वाटतें, याचें कारण थोडेंसें असें असावें. सौंदर्याचा रूक्ष तपशील जोंवर आपल्याला कळलेला नसतो तोंवर त्यासंबंधीं आपण हव्या तेवढ्यास्वर आणि मनोहर कल्पना लढवूं शकतो. त्या कल्पनांना पायबंद घालण्याचें आपणांला कांहीं कारण असत नाहीं. किंवा तसें करण्याची आपणांला अवश्यकताहि भासत नाहीं. पण एकदां कां त्या सौंदर्याचें नांवगांव कळलें, त्या संबंधींचा बाकीचा रुक्ष आणि काव्यहीन तपशील कळला कीं त्या संबंधीं कल्पनाजाळ विणण्याचें आपलें स्वातंत्र्य तात्काळ नष्ट होतें. तें सौदर्य वास्तवाच्या चौकटींत बंदिस्त होऊन पडतें. वास्तवसृष्टीचे सारे नियम त्याला लागूं होतात. वास्तवसृष्टींतील जरामरणाची उपाधि पाठीमागें कायमची लागून रहाते. आणि मग कल्पनेनें त्याच्या देहावर आपण जीं अनेक सुंदर आभरणें चढविलेलीं असतात तीं सारीं एकामागून एक गळून पडतात. त्यामुळें त्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या आपल्या शक्तींनाही एकदम मर्यादा पडतात. ‘मोना लिसचें’स्मित अत्यंत सुंदर समजलें जातें. त्याचें रहस्य हेंच आहे असें मला वाटतें. त्या स्मिताचें कारण आपणांला ठाऊक नाहीं, त्याच्या पाठीमागचें रहस्य आपल्याला अवगत नाहीं म्हणून तें स्मित वर्षानुवर्षें आपल्याला लुब्ध करीत आहे, मोहवीत आहे. आपल्या गूढतेमुळें तें जणूं आपल्या कल्पनाशक्तीला एकसारखें चाळवतें, खिजवितें; तिला आव्हान देतें. ‘ काढ माझा अर्थ शोधून ’ असें म्हणतें. हें अमर चित्र काढलें जात असतांना मोना लिसाच्या मनांत कोणते विचार होते याचा जर उद्यां शोध लागला तर मला वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१६२ वि: निबंध
क्रमांक १३०५ नों: दि: ६।२।६०


आज आहे त्याच्या शतांशानेंहि या चित्राचें आपणांला आकर्षण राहणार नाहीं. चित्राचीच गोष्ट कशाला, वाङ्मयांतील ज्या निरनिराळ्या कलाकृति आहेत त्यांच्या संबंधानेंहि आपणांस असेंच म्हणतां यावयाचें नाहीं कां? त्या कलाकृतींच्या पाठीमागचा रुक्ष तपशील आपणांस कळला कीं त्या कृतींमधलें केवढें तरी सौंदर्य खाडकन् कमी होतें. इब्सेनला आपल्या 'डॉल्स् हाऊस्' या नाटकाची मध्यवर्ती कल्पना, स्वत:ला सुंदर कपडे पाहिजे होते म्हणून चेकवर खोटी सही करणाऱ्या एका रंगेल शौकीन स्त्रीवरून सुचली. हा तपशील कळला म्हणजे क्षणभर कां होईना आपल्याला कसेंसेंच वाटतें कीं नाहीं? कलास्वाद घेतांना होणारी मनाची एकतानता क्षणभर तरी भंग पावतेच कीं नाहीं? असें होऊं नये हें खरें, पण असें होतें हेंहि तितकेंच खरें, मग अशा रीतीनें सौंदर्यास्वादांत उणेपणा आणणारा सौन्दर्या-संबंधींचा तो रूक्ष तपशील हवा कशाला?

निदान मला तरी असा तपशील कळण्याबद्दल फारशी उत्सुकता वाटत नाहीं. 'बेला फूले आधी रात' हें पुस्तक मी कधीं वाचणार नाहीं त्याचें कारण हेंच आहे. त्या नांवांत जें सौंदर्य मला प्रतीत होतें त्यावरच मी संतुष्ट आहें. त्या सौंदर्याचा अधिक पाठलाग करण्याची, त्याला स्पर्श करून पाहण्याची आणि कदाचित् संभवनीय असलेली निराशा पदरीं पाडून घेण्याची माझी मुळींच तयारी नाहीं.

मला माहीत आहे. कोणी यावर म्हणेल कीं हा निव्वळ भित्रेपणा आहे. वास्तवाकडे डोळे उघडून पाहण्याची, त्याचें दर्शन घेण्याची ताकद नसल्यामुळें कल्पनारम्य सृष्टींत पळून जाण्याची ही प्रवृत्ति आहे.

—होय हा भित्रेपणा आहे हें मला कळतें व तो फारसा स्पृहणीय नाहीं हेंही मला कळतें. पण माझा स्वभाव आहे हा असा आहे. आतां त्याला काय करायचें? शिवाय भीतीमध्यें तरी येवढें लज्जास्पद असें काय आहे? तुम्ही मानसशास्त्रज्ञांना जाऊन विचारा. भीति ही एक अत्यन्त संरक्षक व म्हणून उपकारक भावना आहे असेंच ते तुम्हाला उत्तर देतील!

* * *

# १ : : वाढलेलीं मुलें

'बालादपि सुभाषितं ग्राह्यं ' या म्हणीचा कधीं कधीं आपणाला अगदीं अनपेक्षित रीतीनें प्रत्यय येतो. आमच्या चाळींतल्या दोनतीन लहान मुली एकदां आमच्याकडे आल्या होत्या. त्या आपापसांत गप्पा मारीत खेळत होत्या. मी नांवाला हातांत एक पुस्तक धरलें होतें, पण खरें म्हणजे त्यांचीं बोलणीं मी ऐकत होतें. मात्र माझें लक्ष त्यांच्याकडे आहे असें त्यांना जाणवूं नये म्हणून मी वाचनाचें ढोंग करीत होतें. कारण मी त्यांचें बोलणें ऐकत आहें असें जर त्यांच्या ध्यानांत आलें असतें तर त्या लाजून बोलावयाच्या थांबल्या असत्या. तें तर मला व्हायला नको होतें. म्हणून मी पुस्तकाआड तोंड लपवलें होतें. मी वाचनांत गर्क झालें आहें अशा खात्रीमुळें त्या आपापसांत नि:शंकपणें बोलत होत्या.

बोलतां बोलतां कशी कोण जाणें, त्यांतली एक मुलगी दुसरीला म्हणाली, ' अग, तुला सांगूं का ? लहान मुलं मोठीं झालीं कीं त्यांचींच मोठीं माणसं होतात. '

दुसरीनें आपले डोळे नवलानें विस्फारित केले. कुतूहलानें तिची जिवणी वर्तुळाकार झाली. या नव्या ज्ञानाची नीट जाणीव करून घेत ती क्षणभर स्तब्ध राहिली आणि मग जरा वेळानें कांहींशा आश्चर्यानें, कांहींशा अविश्वासानें ती आपल्या मैत्रीणीस विचारूं लागली, ' सगळीं मोठीं माणसं आधीं लहान लहान मुलं होतीं ?'

'मग काय तर ?'

'अगदीं सगळीं सगळीं ?'

'हो हो हो ! अगदीं सगळीं ?'

'आमचे आजोबासुद्धां ?'

'हो. आजोबासुद्धां.'

'अय्या !' दुसरीला एकदम हंसू आलें. 'म्हणजे आजोबासुद्धां एकदां आमच्या बाळ्यासारखी निळी चड्डी घालीत असले पाहिजेत. नाहीं का ग ?' डोळे मोठे करून ती म्हणाली.

'हो तर काय !'

'अन् शाळेंत जातांना बाळ्यासारखेच रडत होते कां ग ते ?'

'कुणाला ठाऊक !' पहिली गंभीरपणें म्हणाली, 'पण बहुतेक रडत असतीलच. लहान मुलांना शाळेला जायला कुठं आवडतं ?'

तिसरी मुलगी इतका वेळ बसून हें संभाषण ऐकत होती. आतां ती एकदम म्हणाली, 'ही नीला म्हणते ना, तें बरोबर आहे. सगळीं मोठीं माणसं आधीं लहान मुलंच असतात. माझ्या आजोळीं ना, भिंतीवर एक फोटो लावला आहे. त्यांत आई, मावशी न् बन्यामामा तिघं जणं आहेत. त्यांत तीं लहान लहान मुलंच आहेत. आईनं न् मावशीनं परकर-पोलकीं घातली आहेत. त्यांच्या दोन दोन वेण्या आहेत. अन् बन्यामामानं अर्धी विजार न् रेघारेघांचा सदरा घातला आहे.'

हें सारें वर्णन ऐकून दुसऱ्या दोघीजणीं खदखदून हंसल्या. कारण आतां जी मुलगी बोलली--तिचें नांव उषा--तिची आई खूप लठ्ठ आहे. तिचेंच परकर-पोलका घातलेलें चित्र त्यांनीं कल्पनेनें आपल्या डोळ्यांपुढें उभें केलें होतें कीं काय कुणाला ठाऊक ! नीला बरीच धिटुकली आहे. ती खदखदा हंसत म्हणाली, "अय्या ! उषाच्या आईला परकर-पोलका कसा गंमतीदार दिसेल नाहीं ?'

उषाचें तोंड गोरेंमोरें झालें. ती एकदम म्हणाली, 'आई छान दिसतें बरं कां फोटोंत ! ती कांही लठ्ठ नाहीं आहे. त्यांत अन् परकर-पोलकं छान दिसतंय् तिला.'

त्यावर दुसऱ्या दोघीजणी हंसावयाच्या थांबल्या आणि मग एवढीशी, सडसडीत, दोन वेण्या घातलेली आणि परकर–पोलक्यांत छान छान दिस- णारी उपाची आई त्यांनीं कल्पनेनें आपल्या डोळ्यांपुढें उभी केली. कांहीं वेळ त्या सगळ्याच जणी अगदीं शांत बसून राहिल्या होत्या. आज शरीरानें अस्ताव्यस्त वाढलेलीं, मोठे कपडे अंगावर घालणारीं, लहान मुलांना धाकांत ठेवणारी अन् स्वत: सर्व तऱ्हेच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेणारीं मोठीं माणसें एके काळीं आपल्यासारखींच लहान मुलें होतीं, त्यांना मनाविरुद्ध आंघोळी कराव्या लागत होत्या, शाळेला जावें लागत होतें, मास्तरांनीं दिलेला गृह- पाठ करून न्यावा लागत होता आणि आजारी पडल्यावर कडू औषधें घ्यावीं लागत होतीं. ही कल्पना त्यांना जेवढी विस्मयकारक वाटली तेवढांच तिच्या योगानें त्यांच्या मनांतला एक कोपरा सुखावला देखील. सर्व मोठीं माणसें एकेकाळीं आपल्यासारखींच लहान मुलें होतीं, या जाणिवेनें आपल्या अगतिकतेची कांहींशीं भरपाई झाल्यासारखें त्यांना वाटलें आणि त्याबरोबर एरवीं शत्रूंप्रमाणें भासणाऱ्या मोठ्या माणसांबद्दल त्यांना थोडीशी सहानुभूति देखील वाटूं लागली. थोडा वेळ त्या तिघी जणी या नव्या जाणीवेचें सुख घेत राहिल्या आणि मग चाळींतले वेगवेगळे लोक लहान असतांना कसे दिसत असतील, त्यांचे कपडे कसे असतील, पतंग, गोट्या, सागरगोटे यांपैकीं कोणते खेळ कोणाला आवडत असतील, लिमलेटची गोळी कुणाला प्रिय असेल नि चाकोलेटचा हट्ट घेऊन कोण बसत असेल यावर त्यांनीं बरीच चर्चा केली. मी त्यांचें बोलणें ऐकत होतें आणि त्यांच्या स्वैर, अबोध कल्पना- तरंगांचीं मला मौजहि वाटत होती. जरा वेळानें त्या तिघींना कंटाळा आला. मग त्या घरीं जावयाला निघाल्या पण जाण्यापूर्वीं आपल्या लाभलेल्या ज्ञानाची माझ्याकडूनहि एकदां नक्की खात्री पटवून घ्यावी, असें त्यांच्या मनांत आलें कीं काय कोण जाणे. कारण त्या तिघीजणी माझ्याजवळ आल्या. आणि धाकटी नीला माझ्या मांडीवर आडवी पडत मला म्हणाली, 'सगळीं मोठीं माणसं आधीं लहान मुलंच असतात किनई ?'

'छे ! मुळींच नाहीं.' मी मुद्दामच म्हणालें.

माझ्याकडून जणुं त्या तिघींनीं याच उत्तराची अपेक्षा केली होती. कारण मी नकारार्थी उत्तर देतांच तिघी जणी टाळ्या पिटीत ओरडत

म्हणाल्या, ' हां. खोटं—खोटं. आम्हांला माहीत आहे. सगळीं मोठीं माणसं मुळीं आधीं लहान मुलंच असतात.'

'खरं ?' आश्चर्याचा आविर्भाव करीत मी म्हणालें ' मला नव्हतं हें माहित.'

'खोटं. सगळं खोटं.' त्या पुन्हा माझ्याभोंवतीं नाचत म्हणाल्या, 'तुम्हाला ठाऊक नसायला काय झालं ? आम्हाला उगीच फसवायचं, माहीत आहे आम्हांला.'

आणि मग अगदीं निःशंक होऊन त्या तेथून निघून गेल्या. मोठ्या माणसांच्या स्वभावांतले बारकावे त्यांना चांगले माहीत होते. मोठीं माणसें खोटें बोलतात हा त्यांचा नेहमींचा अनुभव होता. त्यामुळें मीं ज्या अर्थीं त्यांच्या विधानाला विरोध केला होता त्या अर्थीं तें सत्य असलें पाहिजे याबद्दल आतां त्यांना मुळींच संशय उरला नाहीं.

त्या तिघीजणी निघून गेल्या तरी त्यांचे शब्द अजूनहि माझ्या मनांत घुमत होते. सगळीं मोठीं माणसें आधीं लहान मुलें असतात. लहान मुलें मोठीं झालीं कीं त्यांचींच मोठीं माणसें होतात !

खरें म्हणजे त्या मुलींनीं जें सांगितलें तें मला माहित नव्हतें थोडेंच ? पण आज तीन लहान मुलींच्या तोंडून जीवनांतलें तें विशिष्ट सत्य ऐकल्या-वर माझ्या मनाला तात्काळ एक वेगळाच साक्षात्कार झाला. जगाकडे, जीवनाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोनच जणूं पालटून गेला. माझ्या भोंवतालीं वावरणाऱ्या वेगवेगळ्या माणसांकडे मी या नव्या दृष्टिकोनांतून पाहूं लागलें आणि आतांपर्यंत न उमगलेल्या कित्येक गोष्टींचा, न उलगड-लेल्या अनेक स्वभावदोषांचा मला आतां सहजासहजीं अन्वय लागला.

माझी ती एक मैत्रीण,—तिचा नटवेपणा, कोठेंहि गेलें तरी सर्वांच्या कुतूहलाचें, जिज्ञासेचें व कौतुकाचें आपणच एकमेव स्थान व्हावें यासाठीं चाललेली तिची धडपड, इतरांचें बोलणें पार बुडवून टाकणारा तिचा अस्ख-लित आणि उच्च कण्ठस्वर—मला तिच्या त्या हव्यासाचा अर्थ कधीं कळतच नसे. पण आतां ती माझ्यापुढें एकदम बालरूप घेऊनच मुळीं उभी राहिली. अरे ! ही तर अगदीं अल्लड, निरागस छोकरी आहे. जरा हौशी, जरा आनंदी. नाविन्याची खूप आवड असलेली. भोंवतालच्या माणसांवर मना

पासून प्रेम करणारी आणि त्यांचेंहि प्रेम नि सद्भावना आपणाला मिळावी अशी आशा बाळगणारी. हो. असेंच असलें पाहिजे. आतां मला माझ्या त्या मैत्रिणीच्या वागण्यांत कांहींच हास्यास्पद किंवा दोषास्पद दिसेना. उलट मला तिची कांहींशीं करुणाच आली. मला अजूनहि तिचें बालरूपच डोळचां-पुढें दिसत होतें. भडक फुलाफुलांचा झगा घातलेल्या आणि आनंदानें खिदळणाऱ्या त्या छोटचा मुलीला जवळ घेऊन मीं प्रेमानें तिच्या मुखा-वरून हात फिरवला.

आतां माझ्याभोंवतीं मला कुणी प्रौढ माणूस दिसेचना. सारी सृष्टि मला गोजिरवाण्या लहान लहान मुलांनींच भरून गेलेली दिसली. एका लहान मुलाच्या निळचा चड्डीचे खिसे गच्च भरून फुगले होते. त्यानें आपल्या हातांतहि खूप वस्तू धरून ठेवल्या होत्या. तो बाजूला उभा राहिला होता. आणि आपली दौलत उराशीं घट्ट पकडून येणाऱ्या जाणाऱ्या मुलांकडे तो संशयानें, अविश्वासानें बघत होता. मी त्याच्याजवळ जाऊन उभी राहिलें. त्याच्याजवळच्या वस्तू पाहूं लागलें. फुटक्या कांचा, खिळे, मोडकी शिट्टी, रंगीबेरंगी मणी अशा त्या वस्तू होत्या. आणि त्या तो जिवापाड जपत होता मी मनाशीं म्हटलें, याचें कांहींतरी कोणी पळवलें असेल. अन् तेव्हांपासून याच्या मनांत इतरांविषयीं असा अविश्वास निर्माण झाला असेल. मीं त्याच्या रागीट मुद्रेकडे पाहिलें. त्याला जवळ ओढून हृदयाशीं धरलें आणि त्याच्या कानांत हळूच सांगितलें, 'कशाला हें सारं ओझं जपून ठेवलं आहेस तूं ? दे सारं फेकून नि जा आपला खेळायला.'

माझे शब्द ऐकल्यावर त्यानें क्षणभर विस्मित होऊन माझ्याकडे पाहिलें. दुसऱ्याच क्षणीं त्याच्या मुद्रेवर निर्भर स्मित उमललें. खिशांतल्या वस्तू त्यानें भराभर काढून फेकून दिल्या आणि उडचा मारीत तो खेळायला निघून गेला. आतां मला त्याची ओळख पटली. हे तर आमचे एक लोभी, हव्यासी, चिक्कू नातेवाईक. त्यांच्या चिक्कूपणाचें नि पैशांच्या हव्यासाचें रहस्य आतां मला उलगडलें.

मग आल्यागेल्याजवळ आपल्या दुखण्याचें रडगाणें गाणाऱ्या ओळ-खीच्या एका बाईच्या जागीं खेळतां खेळतां गुडघा फुटलेली नि बाजूला उभी राहून रडणारी लहान मुलगी मला दिसूं लागली. तिला बिचारीला जवळ

घेऊन कोणी तिचा गुडघा कुरवाळलाच नव्हता. तिच्या डोळ्यांतलें पाणी कुणीं पुसलेंच नव्हतें. तेव्हांपासून ती अशीच सारखी रडत आहे आणि प्रत्येकाचें आपल्याकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. जगांतल्या प्रत्येक माणसाला धास्तावून असलेला, स्वत:बद्दल पराकाष्ठेचा न्यूनगण्ड बाळगणारा आणि आपली भित्री नजर खालीं वळवून डोळ्यांच्या कोंपऱ्यांतूनच तुमच्याकडे हलकेच बघणारा हा आमच्या परिचयाचा एक पोक्त माणूस पाहा. माझ्या कल्पनेंत हा लहानसें मूल होऊन साऱ्या गर्दीपासून दूर एकाकीं उभा आहे. मुलांचा खेळ कसा रंगांत आला आहे. पण याला कोणी खेळावयास घेत नाहीं. तो जवळ आला कीं सारे हिडीसफिडीस करतात. मुलें निष्पाप, निरागस असतात ही आपली एक भोळी समजूत आहे झालें. मुलांच्या-इतकी क्रूरता कोणीच कधीं दाखवीत नसेल. आणि अजाणपणानें त्यांच्या त्या क्रूरतेला एक वेगळेंच लखलखीत पाणी चढवलेलें असतें. तीं सारीं मुलें निष्ठुरपणें या एकट्याला दूर ठेवीत आहेत. तेव्हांपासूनच यांचें मन असें भित्रें होऊन गेलें आहे. जगांतील साध्यासुध्या, अव्याज आनंदावरचा नि सुखावरचा आपला हक्क त्यानें केव्हांच काढून घेतला आहे. इतर लोक सुख भोगीत असतां आपण मात्र तें सारें फक्त लांबूनच पाहावयाचें, आणि त्यांतच आपण आनंद मानावयाचा या सत्याचा त्यानें केव्हांच निमूटपणें स्वीकार केला आहे. आणि जगापासून तो असा दूर दूर राहात आहे. आतां ही दुसरी एक माझी मैत्रिण पाहा. रूपानें अप्रतिम सुंदर. तिचें हें बालरूप पाहा. या इतक्या लहान वयांतहि हजारपांचशांत उठून दिसणारें तिचें सौंदर्य पाहा. या सौंदर्याचें सर्वांनीं इतकें कोडकौतुक चालवलें आहे कीं तिला त्या कौतुकावांचून क्षण-भरहि चैन पडत नाहीं. मी जगांत हवें तसें वागावें आणि सर्वांनीं मला स्तुतीचा कारभार बिनतक्रार देत जावा हें एकच सत्य बिचारीला लहानपणीं कळलें आणि तें एकच सत्य उरांत बाळगून ती लहानाची मोठी झाली. पण जीवनकलहाच्या तीव्रतेंत कोणालाहि वाजवीपेक्षां अधिक कांहीं मिळूं शकत नाहीं आणि शरीर सौंदर्य मानसिक व आत्मिक उणीवांची भरपाई करूं शकत नाहीं हें तिला बिचारीला आजहि उमगत नाहीं. यामुळें ती कायमची दु:खी झाली आहे आणि जन्मभर तिला सतत अपेक्षाभंगाचें दु:ख सहन करावें लागणार आहे !

हा आणखी एक वेडा माणूस पाहिलांत कां ? व्यवहार चतुर जगांत हा अव्यवहारी, मूर्ख, निर्बुद्ध ठरला आहे. कारण याची जगण्याची रीत जगाच्या ठरीव चौकटींत बसूं शकत नाहीं. याला पैसा सांभाळतां येत नाहीं. वरिष्ठांची हांजीहांजी करतां येत नाहीं, श्रीमंतांपुढें समयसूचकतेनें बोलून त्यांचे गोडवे गातां येत नाहींत, आणि मनांत असेल तें लपवून बाहेर वेगळेंच बोलण्याची कलाहि त्याला अवगत झालेली नाहीं. त्याच्या वागण्याचा अर्थच कोणाला कळत नाहीं.. मलाहि तो कधीं कळत नव्हता. पण आज मी त्याचें छोटेसें रूप अचानक पाहिलें. हा लहान मुलगा किती विलक्षण दिसतो आहे. हा मध्येंच फुलपांखरांमागें धांवतो. मध्येंच रस्त्याच्या कडेला उमललेलें लहानसें फूल पाहून गहिंवरतो. जखमी कुत्र्यामांजरांना हा उराशीं धरून कुरवाळतो आणि घाणेरड्या पोरांत हा निःशंकपणें खेळतो. इतक्या बालवयांतसुद्धां 'शहाण्या' मुलांच्या उपहासाला हा पात्र ठरत आहे तर प्रौढ वयांत त्याचें सर्वत्र हंसूं झाल्यास त्यांत नवल काय ?

खरेंच, सर्व मोठीं माणसें हीं एके काळीं लहान मुलें होतीं, आणि लहान मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांचींच मोठीं माणसें होतात हें अगदीं खरें ! माझ्याभोंवतीं गोळा झालेल्या त्या लहान बालकांच्या गर्दींत माझ्या परिचयाच्या कितीतरी मोठ्या माणसांचे चेहरे मीं ओळखले.

पण त्या साऱ्या गडबडींत मी स्वतः कुठें होतें नि मी कशी दिसत होतें हें बघायचें मात्र मी विसरूनच गेलें.

* * *

## १० : : मांजरें

लहानपणच्या वेगवेगळ्या आठवणी जेव्हां माझ्या मनांत दाटून येतात तेव्हां त्यांतल्या प्रत्येक आठवणीशीं एकादें मांजर खेळत आहे असें मला दिसतें. मांजरांचा व माझा ऋणानुबंध केवळ या जन्मींचाच नाहीं तर त्यांचें व माझें जन्मजन्मान्तरींचें नातें आहे असेंही कधींकधीं मला वाटूं लागतें. मांजरांबद्दलची आपली आवड नाहींशीं झाली आहे असें एखादे वेळीं माझ्या मनांत येतें व मी सुटकेचा निःश्वास टाकतें. कारण मांजरांचें एवढें प्रभुत्व आपल्यावर असावें हें मला (खरें सांगायचें तर) आवडत नाहीं. कधींकधीं दहाबारा महिने माझें जीवन संपूर्णपणें निर्मार्जार असतें. मला आनंद होतो. मांजरांच्या तावडींतून मी कायमची सुटलें असें मला वाटूं लागतें. 'मांजरें लुच्चीं असतात. त्यांच्यांत कुत्र्याचें इमान, घोड्याचा शहाणपणा किंवा गायीचा ममताळूपणा औषधालाहि नसतो, इत्यादि लौकिक समजुती मोठ्या आवेशानें मी बोलून दाखवूं लागतें. व एकंदरीनें मी आतां शहाणी झालें असें भोंवतालच्या लोकांना वाटूं लागतें. पण तेवढ्यांत एखादे दिवशीं रस्त्याच्या कडेला, चाळीच्या भिंतीवर किंवा दोन चाळींच्या मधल्या अरुंद बोळांत एकादें मळकें मांजर मला अकस्मात् दिसतें. आपल्या हिरव्या (किंवा मार्जार-परत्वें पिवळ्या किंवा घाऱ्या) डोळ्यांची स्थिर नजर लावून तें माझ्या-कडे रोखून पाहूं लागतें. माझीं पावलें अडखळून थांबतात. भारल्यासारखी

मी तेथेंच थबकून उभी राहतें. मांजराच्या जादूचा अंमल माझ्यावर चढूं लागतो आणि मग पुन्हां एकदां आपल्या चार पायांनीं मांजर माझ्या आयुष्यांत प्रवेश करतें.

आजवर मी कितीं मांजरें पाळलीं असतील याला कांहीं सुमारच नाहीं बाकीं, मांजर आपण पाळतों हें म्हणणेंहि तितकेंसें खरें नव्हे. मांजरच आपल्याला पाळीत असतें. एकाद्या मांजरानें तुमच्याकडे येऊन तुमच्या घराचा, दुधाच्या बशीचा नि तुमच्या मनाचा ताबा घ्यायचें ठरवलें म्हणजे तुम्ही सर्वस्वी अगतिक होतां. मग त्या मांजराला विरोध करण्याऐवजीं त्याला आपला ताबा घेऊं देणें हेंच शहाणपणाचें ठरतें. मी आतांपर्यंत जीं जीं मांजरें पाळलीं त्यांत मीं आवर्जून पाळावयाला म्हणून घेतलेंली मांजरें फारच थोडीं असतील. बहुतेक मांजरें स्वतःच्या इच्छेनेंच मजकडे आलीं. कांहीं दिवस राहिलीं आणि पुन्हां लहर फिरली तेव्हां निघून गेलीं. मांजरें पराकाष्ठेचीं स्वेच्छ असतात. एकदां कां त्यांचें घरावरून मन उडालें कीं मग कांहीं केल्या तीं तेथें राहतच नाहींत. एक दिवस आपलीं उठतात आणि सर्वस्वाचा त्याग करून जाणाऱ्या सिद्धार्थाप्रमाणें कुठेंतरी दूर निघून जातात.

मांजराइतका स्वयंतुष्ट आणि आत्मकेंद्रित प्राणी दुसरा कोणताहि नसेल. आपलें एक कल्पनारम्य विश्व निर्माण करून त्यांतच सदैव रंगून जाणाऱ्या षोडशवर्षीय कुमारिकेइतकेंच मांजरहि आत्मरत असतें. दूध प्याल्यानंतर तें आपल्या पंजानें आपलें तोंड पुसून साफ करीत असतें किंवा अंग सैल सोडून, डोळे अर्धवट किलकिले करून तें जेव्हां आरामशीरपणें पहुडलेलें असतें, तेव्हां त्याचें स्वतःवरचें प्रेम आणि स्वतःबद्दलची संतुष्टता त्याच्या तोंडावरून ओघळत असते जणूं कांहीं ! मांजराला आपल्या रूपाचा गर्व असतो असें म्हटलें तर कोणाला तें कदाचित् खोटें वाटेल. पण मांजरें आरशापुढें बसून कितीतरी वेळ अंग चाटीत व माना मुरडीत राहातात हें मीं स्वतः पाहिलें आहे. स्त्रियांनीं हा गुण मांजरांकडूनच उचललेला आहे कीं काय नकळे !

लहाणपणीं मांजराच्या तोंडावर जे समजूतदारपणाचे तल्लख भाव दिसतात ते अन्यत्र कुठेंच पहायला मिळणार नाहींत. अशा पिलाच्या तोंडाकडे पाहतांना मला वाटतें कीं याला समजत नाहीं असें जगांत कांहींहि

नसेल ! मांजराच्या लहानग्या पिलांच्या पुढ्यांत एकादा कागदाचा बोळा किंवा लहानसा चेंडू ठेवावा आणि मग आपण दुरून त्याच्याकडे बघत बसावें. तें पिलूं प्रथम लांबून सावधगिरीनें त्या वस्तूकडे बघत रहातें. कान टवकारून व डोळे अर्धवट किलकले करून तें तिचा नीट अंदाज घेतें. लौकरच त्याच्या रक्तांतल्या नैसर्गिक शिकारी प्रवृत्ति जाग्या होतात. जगांतला सारा धूर्तपणा त्याच्या थरथरणाऱ्या नाकपुड्यांच्या टोकाशीं येऊन बसतो. त्याचे डोळे क्रूरपणें चमकूं लागतात. तें आपलें पोट भुईसपाट टेकवतें. शेपटी ताठ करून व पुढले दोन्ही पंजे लांब करून तें शिकारीचा पवित्रा घेतें आणि मग डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों विजेच्या चपळाईनें तें पुढ्यांतल्या वस्तूवर झेंप घेतें. पण तेवढ्यांत काय होतें कोण जाणे ! दुसऱ्याच कुठल्या-तरी वस्तूकडे त्याचें चित्त आकृष्ट होतें. एकदम उलटें कोलमडून तें मागें पडतें आणि मग वेड्यासारखें तिरपें हेलपाटत दूर कुठें तरी निघून जातें.

शरीरांतले स्नायू हलके सोडून आळस देणारें मांजर पाहिलें म्हणजे दोन्ही बाहु मस्तकावर उचलून धरून आणि सर्वांगाला ठिकठिकाणीं आकर्षक बांक देऊन लाडिकपणें 'दमलें बाई !' असें म्हणणाऱ्या एकाद्या 'अलस-लुलितमुग्धा' मदालसेचेंच स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. शरीरांतला स्नायू न् स्नायू सैल सोडतांना, पाठीची कमान करून आळस देतांना, मान मुरडून अंग चाटतांना किंवा पंज्याच्या टोकानें ओठ पुसून साफ करतांना मांजराच्या शरीराला असे मजेदार बांक पडतात, त्याच्या अवयवांची अशी चित्तवेधक हालचाल होते आणि त्याच्या मऊसूत रेशमी केसांवर उठणाऱ्या लाटांत रंगीबेरंगी चमकदार छटांची अशी भुरळ पाडणारी सरमिसळ होते कीं कांहीं विचारूं नये. अशा वेळीं मांजरांचा मोह न पडणें केवळ अशक्य आहे. मांजरांचा कमालीचा तिटकारा करणारीं माणसें-सुद्धां अशाच एकाद्या गाफील क्षणीं अचानक मांजराच्या प्रेमांत पडतात आणि मग त्या बंधनांतून त्यांची जन्मभर सुटका होत नाहीं.

मांजराच्या देखणेपणाला अभिजात खानदानीची पार्श्वभूमि असते. त्याचें मऊसूत रेशमी अंग, त्याचे पाणीदार तल्लख डोळे, त्याची लालचुटुक पातळ जीभ, नाकाचा लालबुंद ओला शेंडा किंवा नरमगरम लाल तळवे—कांहींहि बघा, त्यांत रखरखीत, ओबडधोबड, गांवरान असें कांहीहि तुम्हांला

कुठें चुकूनसुद्धां दिसावयाचें नाहीं. पिढ्यान् पिढ्या वैभवांत वाढून जोपासलें गेलेलें अभिजात देखणेंपण असावें तसें मांजराचें देखणेंपण असतें. निदान मी तरी अद्याप एकहि कुरूप मांजर पाहिलेलें नाहीं.

मी आजवर जीं जीं मांजरें पाहिलीं किंवा पाळलीं त्यांमध्यें कोणत्याहि एका मांजराचा स्वभाव दुसऱ्यासारखा मला आढळून आला नाहीं. चतुराई, लुच्चेगिरी, लाघवीपणा, स्वयंमन्यता हे कांहीं गुण साऱ्या मांजरांत सामान्य असतात असें म्हणतां येईल. पण याखेरीज केवढी तरी स्वभाव भिन्नता त्यांच्या ठायीं आढळून येते. मीं पाहिलेल्या मांजरांमध्यें खुनशी, मवाली, गुंड दादासारखा दिसणारा लठ्ठ बोका आहे; त्याप्रमाणें कुलीन सात्त्विक, लेकुरवाळ्या स्त्रीसारखी अपत्यवत्सल भाटीहि आहे. अत्यंत खेळकर, मिष्किल आणि विनोदी मांजरें मी पाहिलीं आहेत त्याप्रमाणें जीवनाबद्दल अत्यंत गहन विचार करून ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या या निर्णयापर्यंत येऊन पोहोंचलेलीं स्थितप्रज्ञ मांजरेंहि मीं पाहिलीं आहेत. भित्रेपणा, लोचटपणा, क्रूरता, आळस, चैनीची आवड, दुसऱ्यावर अधिकार गाजवण्याची प्रवृत्ति, सुखलोलुपता अशा कितीतरी भिन्न भिन्न स्वभावाच्या छटा वेगवेगळ्या मांजरांमध्यें मला आढळून आल्या आहेत. यामुळें प्रत्येक मांजर हें आपापल्या परीनें आपल्या कुतूहलाचा, जिज्ञासेचा व संशोधनाचा विषय होऊं शकतें. कितीहि मांजरें आपण पाळलीं तरी मांजर हें संपूर्णतः आपल्याला कळलें असें कधींच होऊं शकत नाहीं. प्रत्येक मांजरामध्यें नवीन असें कांहींतरी आपल्याला आढळतेंच आढळतें. इतकेंच नव्हे तर एका मांजरामध्यें सुद्धां सतत नवनवीन असें कांहीतरी आपणाला सांपडत राहतें.

नियतीप्रमाणें मांजराचे मार्गदेखील अतर्क्य, अनाकलनीय असतात. मांजर अमुक प्रकारें कां वागतें हें आपल्याला कधींच कळत नाहीं. तें चोरपावलांनीं घरांत कसें व कुठून येतें तें कळत नाहीं. मध्येंच गूढ तंद्रींत तें कां बुडून जातें हें कळत नाहीं आणि आपल्या मांडीवर वेटोळें घालून सुखासीनपणें गुरगुरत बसलेलें असतांना तें एकदम उठून ताडकन् उडी मारून कां पळून जातें हें तर कधींच उमगत नाहीं. अज्ञाताची हांक प्रतिभावन्तांना देखील क्वचित् ऐकावयाला येते. मांजरांना मात्र ही हांक नेहमीं ऐकूं येते व

एकदां ती हांक कानीं पडली कीं मग कोणीहि त्यांना अडवूं शकत नाहीं. मांजरें मला आवडतात याचें सर्वांत मोठें कारण मांजराच्या ठायीं असणारी ही अनिश्चितता, गूढता होय. कुत्र्याचें तसें नसतें. त्याचा आणि आपला परिचय झाला कीं अल्पावधींतच त्याच्या स्वभावांतले सारे बारकावे, साऱ्या खांचाखोंचा आपल्याला कळून चुकतात. त्यामध्यें नवीन शोधून काढण्याजोगें असें कांहीं राहत नाहीं. आपल्या भावना लपविण्याचे कामीं तर कुत्रें अगदींच दुबळें असतें. त्याच्या मनांतले भाव त्याच्या भाबड्या चेहऱ्यावर अगदीं स्पष्ट उमटलेले दिसतात. आणि त्याच्या अंतरंगांत काय चाललें आहे हें कोणालाहि तत्काळ कळूं शकतें. मांजराच्या मनांतला भाव आपणाला असा कधींच कळावयाचा नाहीं. आपल्या भावना लपविण्याचे कामीं मांजराइतका वस्ताद प्राणी शोधूनहि सांपडावयाचा नाहीं. चारी पाय जमिनीला टेकवून आणि शेपटीचा त्याभोंवतीं विळखा घालून मांजर जेव्हां शांतपणें डोळे मिटून वसलेलें असतें त्यावेळीं त्याच्या मनांत काय चाललें असेल याचा मला कधींच तर्क करतां येत नाहीं. आणि मग त्या मांजराचें मला भय वाटूं लागतें. मला आठवतें, एकदां मी लोकल गाडींतून प्रवास करीत असतां एका भिंतीवर एक मांजर अगदीं निश्चल वसलेलें मीं पाहिलें. त्याचा रंग काळाभोर आणि डोळे हिरवेगार होते. संध्याकाळची वेळ होती. अंधार झपाट्यानें दाटत चालला होता. वातावरण कातर, व्याकुळ झालें होतें. अशा वेळीं त्या वाढत्या काळोखांत, डोळे अज्ञातांत कुठें तरी खिळवून निश्चल बसलेलें तें काळें मांजर मीं जेव्हां पाहिलें तेव्हां माझ्या काळजांत अबोध भीतीचा एक शहारा उमटून गेला. भिंतीवर स्तब्ध बसून राहिलेल्या त्या मांजरामध्यें कांहींतरी गूढ, भीतिदायक आणि तरीहि आकर्षक अशी जादू होती खास ! तो विलक्षण अनुभव मी अद्यापहि विसरलें नाहीं. इंग्रजी साहित्यांत काळें मांजर हें चेटकिणीचें हस्तक कां मानलेलें आहे याचा त्याक्षणीं मला उलगडा झाला.

माणसें मांजरांवर आत्यंतिक प्रेम तरी करतात किंवा त्याचा पराकाष्ठेचा द्वेष तरी करतात. पण प्रेमाची म्हणा कीं द्वेषाची म्हणा, कांहीं ना कांहीं तीव्र प्रतिक्रिया तुमच्या मनांत निर्माण केल्याखेरीज मांजर राहत नाहीं. इतर प्राण्यांप्रमाणें मांजराला डावलून जाणें, त्याच्याकडे दुर्लक्ष करणें तुम्हांला

शक्यच नसतें. मांजर पाहिल्यावर तुम्ही एक तर त्याला जवळ घेऊन प्रेमानें कुरवाळलें तरी पाहिजे नाहींतर हातांत काठी किंवा धोंडा घेऊन संतापानें त्याच्यामागें तरी लागलें पाहिजे असें मांजराचें कांहीं चमत्कारिक सामर्थ्य असतें. तें तुमच्या पुढ्यांत आलें कीं तुम्हांला जणूं खिजवून म्हणत असतें, 'माझ्यावर प्रेम तरी करा किंवा माझा द्वेष तरी करा. माझी उपेक्षा मात्र तुम्ही करूं शकत नाहीं. नव्हे, ती तुम्हांला करतांच यावयाची नाहीं!'

आणि म्हणूनच कधीं कधीं मला वाटतें कीं माणसांचे गरीब–श्रीमंत, सज्जन–दुर्जन, नीतिमान्–अनीतिमान् हे सारे भेद खोटे आहेत. खरा भेद एकच, आणि तो म्हणजे मांजरें ज्यांना आवडतात ते व मांजरें ज्यांना आवडत नाहींत ते––यांच्यामधला. हिशेबीपणा व बेहिशेबीपणा, स्वास्थ्य-प्रियता व अनिश्चिततेचें आकर्षण यांमधला तो भेद आहे. मांजरें ज्यांना आवडत नाहींत तीं माणसें जीवनाकडे पाठ फिरवणारीं असतात. याउलट मांजरें ज्यांना आवडतात तीं माणसें जीवनाचा हौसेनें स्वीकार करणारीं असतात. कारण जीवन हें देखील गूढ, रहस्यमय, आकर्षक पण अनिश्चित, प्रतिसाद न देणारें व कधीं कधीं क्रूर अन् फसवें देखील असतें...

* * *

# ११ : : हरवलेलें घर

मुंबईच्या फोर्ट विभागांतील क्रॉस मैदानावर आमच्या कॉलेजमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यामध्यें क्रिकेटचा सामना सुरू होता. ऐन दुपारची वेळ. माथ्यावर ऊन नुसतें रणरणत होतें. वरच्या निळयाझार पोकळीकडे नजर टाकली तर डोळे दिपून जात होते. आमच्या विद्यार्थ्यांच्या चीत्कारांनीं भोंवतालचें वातावरण जिवंत झालें होतें. पण जनसम्मर्दाचा कोलाहल अगदीं दूर राहिला होता.

प्रेक्षकांसाठीं उभारलेल्या तात्पुरत्या सांवलीच्या जागीं इतर मंडळी-बरोबर मी बसलें होतें. मॅच रंगांत आली असली पाहिजे. कारण विद्यार्थी खूपच आरडाओरडा करीत होते. मला क्रिकेटमधलें कांहींच कळत नाहीं. त्यामुळें समोरच्या खेळाकडे माझें मुळींच लक्ष नव्हतें. तें एका वेगळ्याच गोष्टीनें वेधून घेतलें होतें. समोरचें मैदान जमिनीबरोबर कापलेल्या अर्धवट हिरव्या, अर्धवट पिवळ्या हिरवळीनें आच्छादलेलें होतें. आणि जमिनीपासून थोडासा वर, अधांतरीं, झगझगीत हिरव्या निळ्या रंगाचे पंख असलेला, भुंग्यासारखा दिसणारा एक कीटक हवेंत तरंगत होता. ती कुंभारीण होती, एखाद्या वेगळ्या जातीची माशी होती कीं भुंगी होती कुणाला ठाऊक. पण कुणीहि असली तरी ती मादी होती, स्त्री होती, नर नव्हता एवढें मात्र खरें. कारण जमिनीच्या पोटांत असलेलें आपलें बीळ सजविण्याचा तिचा उद्योग

चालला होता. मध्येंच ती दूर जाई, तोंडांत एक लहानसें हिरवें पान घेऊन येई आणि मग बिळाच्या वरच्या बाजूला कांहीं वेळ हवेंत गोल गोल गिरक्या घेऊन नंतर ती बिळांत शिरे. जरा वेळानें ती बिळांतून वर येई. पुन्हां हवेंत सूर मारून दूर निघून जाई. तोंडांत एक हिरवें पान घेऊन येई. गोल गोल फिरून बिळांत शिरे. ही तिची क्रिया अगदीं अविरत चालली होती आणि तिनेंच माझें लक्ष वेधून घेतलें होतें. तिच्या बिळाचा अंतर्भाग मला अर्थातच दिसत नव्हता. पण कल्पनेनें मी तो नजरेसमोर आणून बघत होतें. त्या बिळांत कदाचित् अंडीं असतील. एका बाजूला धान्यकणांचा सांठा असेल. कीटकसृष्टींतील त्या मादीचा घरसंसार तेथें थाटलेला असेल. आणि आपल्या अंड्यांतून पिलें जेव्हां बाहेर येतील तेव्हां त्यांना कुरतडण्यासाठीं म्हणून हीं हिरवीं कोवळीं पानें ती बिळांत साक्षेपानें जमवून ठेवीत असेल. कदाचित् अंड्यांतून तिचीं पिलें नुकतींच बाहेर आलीं असतील. आणि त्यांना निजायला खेळायला मऊ अंथरुण हवें म्हणून त्यांच्या या प्रेमळ मातेनें हा हिरवागार बिछाना तेथें अंथरण्याचें कार्य चालविलें असेल. कदाचित् अजून तिनें अंडीं घातलेलींहि नसतील. आणि एखाद्या संसारदक्ष गृहिणी-प्रमाणें ही भविष्यकाळाची तरतूदच ती करून ठेवीत असेल; वस्तुस्थिति काय असेल कोण जाणें. पण त्या कीटकीचें कार्य अगदीं निरलसपणें, विल-क्षण चिकाटीनें आणि एकनिष्ठ वृत्तीनें चाललें होतें यांत मात्र शंका नाहीं. पानामागून पानें ती तोंडांत धरून आणीत होती. बिळांत नेऊन ठेवीत होती. पुन्हां परत येत होती. तिचा हा क्रम अविरत चालला होता आणि त्या जबाबदार, कष्टाळू, दक्ष गृहिणीकडे मी भान विसरल्यासारखी नजर खिळ-वून बघत होतें.

एकाएकीं विद्यार्थ्यांचा मोठा ओरडा माझ्या कानांवर आला. मी दचकून वर पाहिलें. कोणीतरी चांगला खेळाडू 'आउट' झाला होता. तो हंसत हंसत क्रीडांगणावरून आम्हीं बसलों होतों तेथें आला. त्याच्याबरोबर मुलांचा मोठा थोरला घोळकाहि आला. आणि बघतां बघतां माझ्यासमोर मुलांची ही गर्दी जमली. माझा जीव भयभीत झाला, गलबलून गेला. जमिनीं-तल्या बिळाची ती कष्टाळू मालकीण हिरवें पान आणण्यासाठी गेली होती. आणि हीं आमचीं मुलें नेमकीं तिच्या बिळाजवळच गर्दी करून उभीं

होतीं. पायमोजे, बूट चढवलेले त्यांचे पाय मला एकाएकी राक्षसांच्या पावलासारखे अवजड वाटूं लागले. मोठ्या थोरल्या पायांचें एक जंगलच तेथें उभें झालें होतें. आणि या जंगलांत माझ्या त्या मैत्रिणीचें घर कुठें हरवूनच गेलें होतें. माझे प्राण व्याकुळ झाले. आतां ती कीटकी परत आल्यावर तिला आपलें घर कसें सांपडणार ? माझ्या मनांत आलें, मुलांना ओरडून सांगावें, 'अरे, तुम्ही तिथें उभे राहूं नका. तिथें जमिनींत एक चिमुकलें घर आहे. त्या घरांत एक संसार थाटलेला आहे. तेथें कदाचित् अंडीं असतील. कदाचित् छोटीं छोटीं बाळेंहि तेथें खेळत असतील. त्यांची आई, त्या संसाराची मालकीण आतां बाहेर गेली आहे. हिरवीं पानें आणून संसाराची तरतूद करण्यासाठीं ती गेली आहे. तुम्ही असे तिच्या घरावर उभे राहिलांत तर तिला घर कसें सांपडणार ?' माझ्या मनांत अशीं असंख्य वाक्यें दाटून आलीं. पण माझ्या तोंडून एकहि शब्द बाहेर फुटेना. मात्र अत्यंत उत्सुक होऊन मी समोर बघत राहिलें. जरा वेळानें तोंडांत हिरवें पान धरून ती कीटकी परत आली. आणि माझी भीति खरी ठरली. तिच्या बिळाभोंवतीं मुलांची गर्दी उभी होती. तिला आपलें घर सांपडेना. ती वेड्यासारखी गोल गोल फिरूं लागली. मुलांच्या डोक्यावरून, त्यांच्या भोवतीभोंवती, त्यांच्या पायांमधून ती गरगरत राहिली. कधीं कधीं ती अगदीं जमिनीसरपट जाई. पण बीळ दिसलें नाहीं कीं ती फिरून वर येई. आणि वेड्यासारखी हवेंत सूर मारीत फिरूं लागे. तिच्या भ्रमणाचा वेग वाढला. हवेवर अधिकाधिक वर्तुळें रेखीत ती विलक्षण गतीनें फिरूं लागली. तिला भोवंड येईल कीं काय असें मला भय वाटूं लागलें. तिच्या दुःखाची मला कल्पनाच करवेना. माझ्या मनांत आलें, तिला आतां आपलें घर कदाचित् कधींच सांपडणार नाहीं. एखाद्या मुलाच्या बुटाच्या अवजड भाराखालीं जमिनींतलें तें नाजुक बीळ दबून चिरडूनहि गेलें असेल. कदाचित् आंतल्या पोकळींत बीळ सुरक्षित राहिलें तरी बिळाचें तोंड मातीनें भरून बंद झालें असेल आणि आंतला संसार आंत कोंडून गेला असेल. इकडे ती मादी फिरतच होती. माझी सर्व उत्कंठा डोळ्यांत येऊन बसली. छातीचे ठोके देखील क्षणमात्र थांबले. ती कीटकी अन् तिचें हरवलेलें, कदाचित् कायमचें नष्टप्राय झालेलें बीळ याखेरीज मला दुसरें कांहीं दिसेना कीं सुचेना. मला वाटलें,

एकाद्याचें घर असें क्षणात नाहींसें होणें, एकाद्याचा संसार क्षणांत उध्वस्त होणें ही केवढी भयानक गोष्ट आहे ? पण त्याहिपेक्षां भयानक हें होतें कीं काय झालें आहे हें मी त्या कीटकसृष्टींतल्या गृहिणीला सांगू शकत नव्हतें. कदाचित् तिचें वीळ सुखरूप असेलहि. प्रयत्न केला असता तर मी तें शोधून काढूं शकलें असतें. आणि तिला पुन्हां तिच्या घरांत मी सोडूनहि दिलें असतें. पण तें शक्य नव्हतें. तिची आणि माझी सृष्टि वेगळी होती. तिची आणि माझी भाषा वेगळी होती. आम्हां दोघींत एकमेकींना जोडणारा कसलाहि दुवा नव्हता, माझी सहानुभूति, माझें साहाय्य तिच्यापर्यंत पोंचविण्याचें कोणतेंहि साधन मला उपलब्ध नव्हतें. तिचें असीम दुःख, तिच्या अपार यातना दुरून नुसत्या बघत राहाणें आणि जागच्या जागीं तळमळत रहाणें याखेरीज दुसरें कांहींही करणें माझ्या हातीं नव्हतें. किती भयंकर होतें हें सारें ! आणि तरीहि किती अपरिहार्य होतें !

माझ्या मनांत आलें, माणसाला दुसऱ्याच्या दुःखाची जाणीवही नाहीं, दुसऱ्याबद्दल त्याला सहानुभूति वाटत नाहीं असें आपण म्हणतों पण तें तितकेंसें खरें नाहीं. सहानुभूति वाटत असूनहि दुसऱ्यासाठीं आपण कांहीं करूं शकत नाहीं ही खरी वस्तुस्थिति आहे. माणसाचें दुर्दैव हें आहे. परमेश्वरानें माणसाला सर्वांत मोठा शाप या एकाकीपणाचा दिला आहे. इतकीं माणसें जगांत आहेत पण प्रत्येकजण एका स्वतंत्र व शून्य अशा विश्वात राहात आहे. एकाद्या आकाशस्थ ग्रहावर एकट्यानेंच राहावें तसा आपल्यापैकीं प्रत्येकजण एकटा आणि एकाकी आहे. मेघदूतावर टीका लिहितां कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथांनीं म्हटलें आहे, ' रामगिरी पर्वतावर विरहावस्थेंत दुःख अनुभवणारा एकाकी यक्ष हें आजच्या युगांतल्या मानवाचें प्रतीक आहे. आज आपणांपैकीं प्रत्येकजण त्या यक्षासारखा एका शून्य, निर्मनुष्य पर्वतावर एकटा उभा आहे. सुख, समृद्धि, विलास आणि आनंद यांनीं भरलेल्या अलका नगरीपासून प्रत्येकजण दूर फेंकला गेला आहे.' रवीन्द्रनाथांचे हे शब्द एकापेक्षां अधिक अर्थांनीं सत्य आहेत. विरही यक्षाला निदान मेघाबरोबर तरी आपल्या प्रियेला संदेश धाडण्याची सोय होती. निदान मधुर स्मृतींच्या दुव्यानें तरी तो आपल्या वियुक्त सखीशीं जोडला गेला होता. आजचा मानव हा अगदीं संपूर्णपणें एकाकी आहे. आणि या एकाकीपणाचें दुःख

जन्मभर भोगीतच त्याला शेवटीं काळाच्या पडद्याआड जावयाचें आहे. भोंवतालच्या जीवनाशीं, तेथें वावरणाऱ्या इतर माणसांशीं त्याला जोडणारा एकहि दुवा त्याच्याजवळ नाहीं.

माझी नजर समोर गेली. ती कीटकी अजूनहि गरगरत होती. तिच्या भ्रमणाला आतां एक विचित्र वेग आला होता. वेडावल्यासारखी–कावल्यासारखी ती फिरत होती. मध्येंच ती वर जाई. मध्येंच ती खालीं येई. एकदां तर ती बाजूच्या हिरवळीवरहि दोन वर्तुळें घेऊन आली. आपण जागा चुकलों कीं काय अशी तिला क्षणभर शंका आली असावी. पण ती शंका फार काळ टिकली नाहीं. मुलांचा घोळका उभा आहे तेथेंच कुठेंतरी खालीं आपलें घर आहे याबद्दल तिची खात्री होती. आणि म्हणून चिकाटीनें ती पुन्हां तेथेंच फिरत राहिली.

आतां त्या कीटकीच्या जागीं मला मी पाहिलेलीं वेगवेगळीं माणसें दिसूं लागलीं. माझ्या परिचयाच्या एक बाई–त्यांचा जन्मभर असाच समज होता कीं भोंवतालचीं माणसें आपल्याला फसवीत आहेत नि आपला फायदा घेण्यासाठीं तीं टपून राहिलीं आहेत. वस्तुस्थिति तशी नव्हती. पण या गैरसमजाचें एवढें अभेद्य कवच त्या बाईनीं आपल्या अंगावर चढवलें होतें कीं, याचा भेद करून कोणीहि त्यांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोंचूं शकला नाहीं. थंडीच्या दिवसांत गरम पांघरूण अंगाभोंवतीं जसें गुरफटून घ्यावें तसा जगाबद्दलचा अविश्वास जन्मभर त्या बाईनीं आपल्या भोंवती घट्ट गुंडाळून धरला होता आणि तो अविश्वास उराशीं धरूनच त्यांनीं अखेर जगाचा निरोप घेतला. जगांतलें औदार्य, जगांतला सद्भाव, जगांतला चांगुलपणा त्यांना अखेरपर्यंत कधीं दिसूंच शकला नाहीं. किती भयंकर दुर्भाग्य हें ! ही कीटकी जसें आपलें बीळ हरवून बसली आहे तसें कांहींतरी मोलाचें, कांहींतरी सुंदर त्या बाई हरवून बसल्या होत्या. आणि त्यांचें चुकलेलें घर कधींहि कोणी त्यांना दाखवून देऊं शकलें नाहीं.

कॅन्सरच्या रोगानें पीडित झालेले दुसरे एक परिचित गृहस्थ मला आठवले. प्राणांचा कणाकणानें अपहार करणाऱ्या त्या भयानक रोगाच्या वेदना ते एकट्यानें सहन करीत होते. त्यांच्या त्या दुःखांत कोणीहि त्यांचें सहभागी होऊं शकत नव्हतें. त्यांची पत्नी–तिचें आपल्या पतीवर इतकें प्रेम

होतें कीं, त्यांच्यासाठीं प्राण द्यावयाचे असते तरी क्षणभरहि मागेंपुढें न बघतां तिनें ते आनंदानें दिले असते. पण तिनें प्राण देऊन नवऱ्याच्या यातना टळत नव्हत्या. त्यानें वेदनेनें तळमळावें आणि तिनें तें सारें मुकाट्यानें बघत राहावें हेंच त्या दोघांचेंहि भागधेय होतें. पतीच्या यातना ती पत्नी कमी करूं शकत नव्हती. आणि तिचें असहायतेचें दुःख पतीहि कमी करूं शकत नव्हता. अशा वेळीं मनांत येतें, मनोमीलन, आत्म्याचें मीलन, बहिश्चर प्राण, दोन देहांत एक आत्मा हे शब्द आपण वापरतों खरे, पण किती अर्थशून्य आहेत ते ? प्रत्येक जीव वेगळा. प्रत्येक देह वेगळा. प्रत्येकाचें सुखदुःख वेगळें आणि प्रत्येकाची नियति प्रत्येकानें भोगावयाची !

मला आणखी एक आठवण आली ती मी पाहिलेल्या एका लहान मुलाची. तें मूल एकदां रडत होतें. रडून रडून त्यानें आकांत मांडला होता. शेवटीं त्याचें तोंड लालभडक झालें, श्वास कोंडून त्याचा प्राण जावयाची वेळ आली तरी तें कां रडत होतें हें इतरांना कळेना आणि आपल्याला काय होत आहे हें त्या लहान अर्भकाला इतरांना समजावून सांगतां येईना. घरांतलीं सारीं माणसें हतबुद्ध होऊन नुसतीं उभीं होतीं. आई रडत होती आणि आपलें असह्य दुःख तें मूल एकटेंच भोगीत होतें. त्या दुःखाला वाचफोडावी हें सामर्थ्य त्याच्याजवळ नव्हतें आणि तें मुकें दुःख दूर करण्याचें सामर्थ्य इतरांजवळ नव्हतें !

अशा कितीतरी आठवणी मला येत होत्या. फार वर्षांपूर्वी वाचलेली एक कवितापंक्ति माझ्या मनांत जागी झाली. " आलों मी एकला । जाणार एकला । एकान्त येथला कां न साहे ? " पण हा एकांत सहन होत नाहीं हें मात्र खरें. म्हणूनच प्रत्येकजण आपल्या सुराला जुळेसा सूर शोधीत जगांत हिंडत असतो. कधीं समानशील जीव भेटतातहि. कधीं सुराला सूर जुळतोहि- पण पुन्हां दोन्ही सूर स्वतंत्रच असतात. दोन जिवांची नियति भिन्नच असते. आणि आपापल्या अभेद्य कवचांत राहूनच प्रत्येकजण दुसऱ्याला स्पर्श करण्याची धडपड करीत असतो. पण शेवटीं प्रत्येकजण एकटाच असतो. प्रत्येकाला आपला मार्ग एकट्यालाच चालून जावयाचें असतें. माणसाचा हाच सर्वांत मोठा शाप आहे. --मी समोर पाहिलें. ती कीटकी अजूनहि आशेनें बिळाभोंवतीं घिरट्या घालीत फिरत होती !

* * *

## १२ : : मनांतली बाग

माझ्या मनांत एक बाग आहे. ही बाग कधीं सुकत नाहीं; कधीं कोमेजत नाहीं. तिला पाणी घालावें लागत नाहीं कीं वाऱ्यावादळापासून तिला जपावें लागत नाहीं. ही बाग सर्वसामान्य बागा असतात तशी नाहीं. येथें फुलझाडें थोडीं. इतर झाडेंच जास्त आहेत. त्या झाडांनाहि कांहीं प्रमाण नाहीं. कोणत्याहि झाडाशेजारीं कोणतेंहि झाड आपलें ऐसपैस वाढलें आहे. कडूलिंबाच्या झाडानें बाभळीला आपल्या कुशींत घेतलें आहे आणि काजूच्या झाडाकडे बघून गुलाबाचें रोपटें गुलाबी स्मित करीत आहे. या बागेंतल्या आंबराईवर कायमचा वासंतिक मोहर डंवरून राहिला आहे आणि तिच्या दाट पालवींतून कोकिळांचे उत्कट कंपित स्वर सदाच उमटत आहेत. येथें करंजाचीं कांहीं झाडें आहेत. त्यांवर सुंदर निळसर फुलोरा फुलला आहे आणि त्यांचीं नितळ स्निग्ध पानें सकाळच्या कोंवळ्या उन्हांत चमकत आहेत. या बागेंत एक भुताटकीचें झाड आहे. तें झाड सायंकाळच्या अंधुक तांबूस संधिप्रकाशांत आपले ओबडधोबड हात हलवून मला नेहमीं भिववीत असतें. त्याच्या पलीकडे एक आवळीचें नि एक पेरूचें झाड आहे. या दोन झाडांचें आपापसांत कांहीं गुपित असावें असें मला वाटतें. कारण तीं दोन्ही झाडें इतरांना विसरून आपापसांतच एकसारखीं कांहीं कुजबुजत असतात आणि मधूनमधून त्यांचें हंसणें वाऱ्यावर तरंगतें. माझ्या या बागेंत

राजासारखा शोभणारा एक उंचच उंच भव्य झाड आहे. हा झाड कधींहि कुणाशीं बोलत नाहीं. आपलें सुंदर मस्तक अभिमानानें उन्नत करून हा सदैव ताठ उभा असतो. कसल्या तरी आत्यंतिक दुःखानें त्याचें अंतःकरण विद्ध झालें आहे. पण हें दुःख कोणाजवळहि बोलून दाखवण्याची त्याची तयारी नाहीं. कारण तें फार पवित्र आहे आणि तें सांगावें अशी पात्रता आसपासच्या दुसऱ्या कोणाहि झाडाची नाहीं असें या झाडाला वाटतें. अर्थात् हे सारे माझे कल्पनातरंग आहेत. खरें खोटें काय असेल कुणाला ठाऊक ! पण हा झाड मला सदा एकाकी आणि अलिप्त वाटतो एवढें मात्र खरें ! त्याच्याकडे पाहतांना माझ्या मनांत नेहमीं येतें, लोकापवादामुळें सीतादेवीला वनांत धाडल्यानंतर राजा रामचंद्र या झाडासारखाच उंच, एकाकी, अलिप्त आणि उदास राहिला असेल. माझ्या बागेंत आणखीहि कांहीं झाडें आहेत. हें एक झाड कसलें आहे कोणास ठाऊक ! मीं त्याचें नांव 'चिनी झाड' असें ठेवलें आहे. कारण चिनी चित्रांत जशीं झाडें दाखवलेलीं असतात तसेंच हें हुबेहूब आहे. विरळ रेखीव लांबट पानें, सडसडीत ताठ फांद्या आणि या साऱ्यांची मिळून बनलेली एक अत्यंत सुंदर चित्राकृति. हें दुसरें झाड रानजाईचें आहे. त्याला तीक्ष्ण कांटे आहेत आणि मादक सुगंधानें घमघमणारीं पांढरीं शुभ्र घोंसदार फुलें आहेत. हें केळीचें झाड बिचारें गळूनच गेलें आहे. मी त्याच्याकडे बघतें आणि मनांतल्या मनांत फार दुःखी होतें. कारण कांहीं केलें तरी हें झाड पुन्हां पालवायचें नाहीं हें मला ठाऊक आहे. या झाडाला म्हणे एका वाईट माणसाची नजर लागलेली आहे.

माझ्या मनांतल्या या बागेवरून मी जेव्हां नजर फिरवूं लागतें तेव्हां प्रत्येक झाडाचा इतिहास मला आठवतो. आणि त्याच्या अनुषंगानें माझें गतायुष्यहि मला आठवतें. वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळ्या ठिकाणांहून आणि वेगवेगळ्या रीतींनीं हीं झाडें माझ्या जीवनांत आलेलीं आहेत. त्यांच्या पानांवर माझें आयुष्य रेखलेलें आहे. त्यांचा इतिहास म्हणजे माझाच इतिहास आहे. म्हणून रिकाम्या वेळीं माझ्या मनांतल्या या बागेंतून हिंडायला मला फार आवडतें. मग या झाडाजवळ घडीभर उभें रहावें, त्या झाडावरचें एकादें फूल खुडून त्याचा वास घ्यावा, त्या तिसऱ्या एका झाडच्या पालवीवरून उगीचच हात फिरवावा असें माझें सारखें चालतें.

या बागेंतल्या झाडांपैकीं अगदी पहिल्यांदा माझी ओळख झाली ती या रानजाईच्या झाडाशीं. वृक्षसृष्टीचें आणि पुष्पसृष्टीचें लावण्य पहिल्यांदा घवघवीतपणें मला दिसलें तें याच झाडामुळें. तेव्हांपासून झाडाशीं आणि फुलांशीं माझी कायमची मैत्री जडली. हें रानजाईचें झाड प्रथम मीं पाहिलें तो क्षण मला अजूनहि स्पष्टपणें आठवतो. त्या क्षणाला पांढऱ्या शुभ्र नाजुक पाकळ्या आहेत. घमघमणारा सुवास आहे आणि बोचणारा तीक्ष्ण कांटाहि आहे. ती पहांटेची वेळ होती. वडिलांच्या नोकरीच्या निमित्तानें डांगमधल्या चिखलदा या गांवीं आम्हीं चाललों होतों. प्रवास बैलगाडीचा होता. उगवतीला नुकतेंच उजाडत होतें. अंधुक तांबूस प्रकाशांत शुभ्र प्रकाशाच्या धारा हळुहळू मिसळूं लागल्या होत्या. पांखरें किलबिलत होतीं. थंड उत्तेजक वारा सुटला होता. गाडीच्या गतीनें सर्वांगाला मजेदार हेलकावे बसत होते. अशा सुरेख वेळीं मला जाग आली. मी डोळे उघडले तों रस्त्याच्या दुतर्फा रानजाईचीं झाडें एकमेकांना दाटून उभीं असलेलीं मला दिसलीं. पांढऱ्या शुभ्र लखलखीत फुलांचे घोसच्या घोस त्यांवर लगडले होते आणि मनाला धुंद करणारा त्यांचा उत्कट सुवास हवेंत गच्च भरून राहिला होता. त्या सुगंधी वाऱ्याचे मी घोट घेतले. त्या फुलांचें रूप मीं अधाशीपणानें दोन्ही डोळ्यांत सांठवून ठेवलें, आणि त्याच क्षणीं माझ्या मनाच्या बागेंत रानजाईचें हें झाड उगवलें. त्यावरचे फुलांचे घोस अजूनहि जसेच्या तसे टवटवीत आहेत.

हें गुलाबाचें झाड आम्ही नाशिक जिल्ह्यांत नांदगांवला होतों तेव्हां आमच्या घराबाहेर होतें. गुलाबाचें झाड इतकें मोठें असूं शकतें हें त्या वेळींच मला प्रथम पाहावयास मिळालें. हें झाड पुरुषभर उंचीचें होतें आणि पानें कमी इतकीं फुलें त्यावर रोज उमलत असत. तो गुलाबहि अस्सल देशी होता. हल्लीं पहावयाला मिळतात तशीं नुसतींच दिखाऊ आणि बिनवासाचीं गुलाबाचीं फुलें तीं नव्हतीं. नूरजहाननें ज्या फुलांपासून गुलाबी अत्तराचा शोध लावला असेल त्याच राजगुलाबाच्या जातीचा हा गुलाब असला पाहिजे असें मला वाटे. हें झाड माझें फार आवडतें होतें. मात्र त्याच्याविषयीं मला भीतियुक्त आदर वाटत असे. कारण त्या झाडाचीं फुलें जितकीं मोहक तितके त्याचे कांटे तीक्ष्ण आणि बोचल्याबरोबर बोटांतून रक्त काढणारे असत. ' कांट्यावांचुनि गुलाब नाहीं हें धर हृदयीं साच ' ही केशव-

सुतांच्या कवितेंतील पंक्ति मी बऱ्याच दिवसांनीं वाचली. पण त्यांतलें सत्य माझ्या गुलाबाच्या झाडानें मला केव्हांच शिकविलें होतें. आम्हीं नांदगांव सोडलें तेव्हां या झाडाची व आपली मैत्री आतां संपली हा विचार मनांत येऊन माझ्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें; पण नंतर एके दिवशीं मी बघतें तों माझ्या मनांतच हें झाड आपलें कायमचें रहायला आलें आहे !

हें कडूलिंबाचें नि हें बाभळीचें झाड माझ्या आजोळीं होतें. या कडू-लिंबाच्या झाडाखालीं खेळण्यांत माझें बालपण गेलें. सडसडीत काड्यांना लाग-लेल्या याच्या लिंबोळ्यांची आम्ही आढी लावीत असूं. झाडाखालीं वीतवीत खळगे खणून त्यांत लिंबोळ्या ठेवायच्या आणि लिंबाचींच पानें त्यांवर घालून वर पुन्हां माती लोटून सारें सारखें करून ठेवायचें. कांहीं दिवसांनीं ही 'आढी' उलगडली कीं, पिकून पिवळ्या जर्द आणि मऊ झालेल्या लिंबोळ्यांनीं खळगा भरलेला दिसायचा. आणि त्या लिंबोळ्या आम्हांला आंब्याहून अधिक आवडत. त्या सोनेरी लिंबोळ्यांचा आम्ही व्यापारहि करीत असूं. पैशांऐवजीं दुधी पेन्सि-लीचे तुकडे, कोऱ्या कापडांवर येणारीं कागदीं रंगीत चित्रें, पोतीचे किंवा फुग्या चे मणी, सिगारेटच्या डब्यांतली चांदी—कांहीहि आम्हांला चालत असे. थंडीच्या दिवसांत या लिंबाच्या झाडावरून पिकलेलीं पिवळीं पानें भराभर खालीं गळून पडत तीं पानें बघतांना मनाला उगीचच उदासवाणें वाटायचें. पुढें मी जरा मोठी झालें आणि कविता वाचायचें मला वेड लागलें. तेव्हा आमच्या घराच्या मागल्या माडींत खिडकीशीं पडल्यापडल्या मी कविता वाची आणि समोर हें लिंबाचें झाड मला दिसत असे. वसंत ऋतूंत त्याच्या मोहराचा कडवट मधुर सुवास सर्वत्र दरवळून राही. या वासाची आणि कांहीं आवडत्या कवितांची माझ्या मनांत इतकी सांगड बसून गेली आहे कीं त्या कविता पुन्हां केव्हांहि वाचूं लागलें तरी कडूलिंबाच्या पिवळसर पांढऱ्या बालिश मोहराचा कडवट गोड सुवास माझ्याभोंवतीं पुन्हां दाटून येतो आणि मन धुंद होतें. कित्येकदां तासन् तास मी नुसतीच या झाडाकडे बघत राही आणि शब्दांत पकडून धर-ण्यास अशक्य अशा कांहीं अस्फुट संवेदना मनांत घोळवीत बसे. अशी या लिंबाची आणि माझी दोस्ती जमली होती. मध्यंतरीं मला कळलें कीं माझ्या आजोळचा हा जना लिंब आतां तोडून टाकला आहे. पण माझ्या मनांत मात्र तो अजूनहि आपल्या गर्द पालवीचा विस्तार सांभाळीत जसाच्या तसा उभाच आहे.

या लिंबाइतकीच वाड्याच्या दुसऱ्या कोपऱ्यांत उभी असलेली ती बाभळहि मला आवडत असे. हिरवें लुगडें आणि पिवळी चोळी घातलेल्या एकाद्या पोरसवदा मराठमोळा मुलीसारखी ती बाभळ मला वाटत असे. तिच्या काळ्याभोर खोडांत आणि वरच्या कोवळ्या हिरव्या पालवींत नि नाजुक परागमय पिवळ्या फुलांत एक मजेदार विसंगति वाटायची. लिंब माझा मित्र होता तशी ही बाभळ माझी मैत्रीण होती. न्हायच्या दिवशीं कानांतल्या कुड्या काढून ठेवलेल्या असत तेव्हां मी आणि माझी बहीण बाभळीचीं फुलें कानांत घालीत असूं. या गोंडेदार चिमुकल्या मखमली फुलांना कळे न कळेसा एक सूक्ष्म गंध असतो हें कितीजणांना ठाऊक आहे ? या बाभळीखालीं हिंडतांना माझ्या बालपणाचा केवढा तरी काळ गेलेला आहे. गेल्या कित्येक वर्षांत मी माझ्या आजोळीं गेलेली नाहीं. पण त्यामुळें माझ्या या आवडत्या बाभळीचा आणि माझा वियोग झाला आहे असें मात्र नाहीं. कारण ती मी आतां माझ्या मनाच्या बागेंतच मुळीं आणून ठेवली आहे, इतकेंच नव्हे तर कडूलिंबाशीं मी तिचें लग्नहि लावून दिलें आहे !

माझ्या मनाच्या बागेंतल्या प्रत्येक झाडामागें असा कांहीं इतिहास आहे. हें काजूचें झाड आम्हीं खर्डीला होतों तेव्हां घरामागच्या एका टेकाडावर उभें होतें. तें इतकें ठेंगणें होतें कीं मला त्यावर सहज चढून बसतां येई. या झाडामागून सकाळीं सूर्य उगवे तेव्हां सबंध झाडाची बाह्यरेषा उजळून झगझगूं लागे आणि झाडाच्या मस्तकावर सोन्याचा किरीट चढला आहे कीं काय असें वाटे. मी माझ्या आयुष्यांत पाहिलेलें हें काजूचें एकुलतें एक झाड. त्यानंतर पुन्हां काजूचें झाड बघायला मिळालें नाहीं. पण माझ्या मनांत तें अजूनहि जसेंच्या तसें उभें आहे. त्याचीं हिरवीं लाल पानें, पिवळसर सुगंधी मोहर, तुरटगोड चवीचीं फळें--केव्हांहि मी पुन्हां अनुभवूं शकतें. हें आवळीचें झाड मी नांदगांवला बघितलेलें तर हें पेरूचें झाड पुण्याला आमच्या वाड्यामागच्या बखळींत असलेलें. पण वास्तवसृष्टींत परस्परांपासून इतक्या दूर अंतरावर असणाऱ्या या दोन्ही झाडांची माझ्या मनाच्या बागेंत केवढी गट्टी जमली आहे पाहा. त्या दोघांना एकमेकांवांचून घडीभरसुद्धां चैन पडत नाहीं. मला वाटतें लिंबाच्या नि बाभळीच्या झाडांप्रमाणें या पेरूचें नि आवळीचें सुद्धां शेवटीं लग्न लावून द्यावें लागणार. उमद्या गाऱ्यागोमट्या पेरूच्या झाडाला सडसडीत ठेंगणी आणि लाजरी आवळी कशी छान वधू शोभेल !

ही करंजाचीं झाडें आजोळीं नदीवर जातांना मला रोज भेटत. हें भुता-

टकीचें झाड एका परक्या गांवीं दोन दिवस राहायला गेलें होतें तेव्हां संध्या-काळच्या कातरवेळीं एका पडक्या वाड्याजवळ मला दिसलें होतें. त्याची मला इतकी भीति वाटली होती म्हणून सांगूं ? मीं तेव्हां मनांत म्हटलें होतें कीं हें झाड पुन्हां कधीं सुद्धां भेटायला नको. पण मग तें माझ्या मनांत कसें अणि केव्हां येऊन राहिलें ? कांहीं समजत नाहीं, आणि आतां त्याला तेथून घाल-वून द्यायची पण सोय नाहीं. कारण खरें सांगूं ? मला त्याची भीति वाटत असली तरी मनांतल्या मनांत मला त्याचा लळा पण लागला आहे.

ही आंबराई माझ्या कॉलेजमधील जीवनांतली माझी मैत्रीण आहे.दुतर्फा आंब्याचीं गर्द झाडें असलेल्या वाटेनेंच मला कॉलेजला जावें लागे. त्या शांत निर्जन रस्त्यानें जातांना या आंबराईची मला मोठीच सोबत वाटे. परीक्षेचे दिवस जवळ आलेले असत. मनांत वेगवेगळ्या विषयांची उजळणी चालू असे. आंब्याच्या झाडांची थंड सावली आसमंतांत दाटलेली असे. सूर्याचें प्रखर ऊन हिरव्या पानांतून गाळून हिरवें आणि थंड होऊन येई. पिवळे कवडसे इतस्ततः उधळलेल्या सोन्याच्या मोहरांसारखे जमिनीवर विखुरलेले दिसत. त्या हिरव्या उन्हांतून, सोनेरी मोहरा तुडवीत मी रोज कॉलेजला जात असें. मोहराचा मंद वास मस्तकावर चवऱ्या ढाळीत असे. आणि कोकिळांचे उत्कट आलाप काळीज भेदून टाकीत असत. अर्धे सत्य, अर्धे स्वप्न वाटणारा तो अनुभव मी अजूनहि विसरलें नाहीं. कॉलेजचें जीवन केव्हांच संपलें पण ती आंबराई, तो मद सुवासानें दरवळणारा मोहर आणि कोकिळांचे ते भेदक आलाप मी माझ्या मनांत अद्यापिहि जपून ठेवले आहेत.

त्या माडाला, त्या 'चिनी' झाडाला अन् त्या जळलेल्या केळीलाहि असाच इतिहास आहे. पण तो मी येथें सांगणार नाहीं. माझ्या मनाच्या बागेंतल्या प्रत्येक झाडाला माझ्या जीवनांत त्याचें स्वतःचें असें एक विशिष्ट स्थान आहे. माझ्या भावसृष्टीची घडण करण्यांत या प्रत्येक झाडानें हात-भार लावला आहे. त्यांच्यांत आणि माझ्यांत केवळ आम्हांलाच कळणारें असें एक गूढ, अबोध, रहस्यमय नातें आहे. कित्येकदां तर त्यांच्यांत आणि माझ्यांत भिन्नताहि राहत नाहीं. कधीं मीच बाभळ होतें, मीच ती केळ होतें, उंच माड होऊन मी जगाकडे अलिप्तपणें पाहूं लागतें किंवा गुलाबाचें कांटेरी झाड होऊन आपल्या कांट्यांचीं बोच आपणच सोशीत मी गुलाबी स्मित करतें. माझ्या मनांतली ही बाग मला फार आवडते.

* * *

# १२ : : संशयात्मा विनश्यति

तशी मी कांहीं भगवद्गीतेची मोठीशी भाविक किंवा एकनिष्ठ वाचक नाहीं. पण एकादे दिवशीं कांहींतरी कारणानें मन उद्विग्न झालें किंवा कांहीं पारमार्थिक आश्वासनाची जिवाला तहान लागली म्हणजे भगवद्गीता हातांत घेऊन बसावयाची मला संवय आहे. मला वाटतें, माझ्या प्रमाणेंच इतरही अनेकांना ही संवय असेल. मोठ्या हौसेनें करायला घेतलेलें एकादें काम सर्वस्वी विफल झालें म्हणजे आपलें मन साहजिकच अत्यंत विषण्ण होतें. त्या विषण्णतेच्या क्षणीं 'कर्मण्येऽवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हें गीतेंतलें वचन कांहीं वेळापुरतें कां होईना पण आपलें सांत्वन करतें आणि आपल्या पोळलेल्या मनावर गार फुंकर घालतें, हें कांहीं खोटें नाहीं. आपण आपलीं संसारी व्यवहारीं माणसें असतों. गीतेंतलें निष्काम कर्मयोगाचें तत्त्वज्ञान कितीहि श्रेष्ठ असलें तरी आपल्यासारख्यांना तें कुठून आचरणांत आणतां येणार? तथापि, कधीं कधीं जिवाला झालेल्या जखमांवर तत्वज्ञानाची किंवा वेदान्ताची मलमपट्टी केली म्हणजे मनाला तेवढेंच बरें वाटतें. नाहीं तरी आपल्या जीवनांत गीतेसारख्या ग्रंथांचा आपल्याला दुसरा काय उपयोग होतो ? हा अर्थात् त्या ग्रंथाचा कमीपणा नाहीं. ही आपल्याच सामर्थ्याची उणीव आहे. पण त्याला इलाज काय ? वस्तुस्थिति जशी असेल तशी ती सांगितलीच पाहिजे.

हो, तर सांगावयाचें कारण असें कीं परवां अशीच सहज मी भगवद्गीता चाळीत होतें. पानामागून पानें उलटतांना त्यांतील एका वाक्याकडे झटकन् माझें चित्त वेधलें गेलें. 'संशयात्मा विनश्यति' हेंच तें गीतेंतलें वाक्य. आजवर कितीदां तरी तें वाक्य मीं पाहिलें–वाचलें असेल. तथापि परवां मात्र अचानक त्या वाक्यावर माझे डोळे खिळून राहिले. असें पुष्कळदां होतें, नाहीं कां ? हजारों वेळां एकादी गोष्ट पाहिलेली असावी, पण एका विशिष्ट क्षणींच तिचें खरें महत्व आपल्याला प्रतीत व्हावें, हा अनुभव अनेकांना आलेला असेल. निदान 'संशयात्मा विनश्यति' या वाक्याच्या बाबतींत मला तरी त्या दिवशीं असा अनुभव आला खरा. तें वाक्य डोळ्यांपुढें दिसतांच माझ्या मेंदूंत एकदम जणूं कांहीं एक अज्ञात कळ दावली गेली आणि माझ्या मनांत अगदीं लख्ख प्रकाश पडल्यासारखें मला वाटलें.

हातांतली गीता मी बाजूला ठेवून दिली आणि 'संशयात्मा विनश्यति' ह्या वाक्याचाच मी विचार करूं लागलें. मला वाटलें, किती लाख मोलाचें आहे वाक्य ! 'संशयात्मा विनश्यति,' 'संशयी–शंकेखोर माणूस नाश पावतो.' खरोखर, श्रीकृष्णानें अर्जुनाला अठरा अध्यायांची गीता सांगत बसण्याऐवजीं एवढें हें एकच वाक्य सांगितलें असतें तरीं पुष्कळ झालें असतें. इतक्या चिमुकल्या वाक्यांत एवढें सुंदर तत्वज्ञान आजवर कधींच कुठें गोंवलें गेलें नसेल !

गीतेंतला वेदान्तपर अर्थ राहूं द्या, अगदीं नेहमींच्या व्यावहारिक अर्थानें सुद्धां 'संशयात्मा विनश्यति' या सूत्राची सत्यता आपल्याला पावलोंपावलीं पटत असते. माझें स्वत:चेंच उदाहरण घ्या ना ! 'संशयात्मा विनश्यति'चें प्रत्यंतर मला आजवर कितीदांतरी आलेलें आहे. पहिल्यापासून माझा स्वभाव भारी संशयी, भारी शंकेखोर, तथापि या अशा स्वभावामुळें माझें आजवर इतकें नुकसान झालें आहे कीं कांहीं विचारूं नये. मला सगळ्यांत मोठा संशय हा स्वत:च्या कर्तृत्वाविषयीं वाटत असतो. अर्थात् स्वत:च्या हुशारीबद्दल वाजवीपेक्षां फाजील अभिमान बाळगण्यापेक्षां स्वत:बद्दल साशंक असणें हें केव्हांहि अधिक चांगलें. पण यामुळेंच कधीं कधीं आपला तोटाहि होतो. मला आठवतें, मी इंग्रजी चौथींत किंवा पांचवींत असतांना

शाळेंत एक निबंधाची चढाओढ ठेवली होती. विषय आयत्यावेळीं देणार होते. मला मनांतून कितीदां तरी वाटलें कीं आपण या चढाओढींत भाग घ्यावा. मैत्रिणींनींहि खूप आग्रह केला. पण ऐनवेळीं माझा हा संशयीपणा जागृत झाला. आपली हुषारी ती काय ? आपल्याला असें काय लिहितां येणार आहे ? चढाओढींत भाग घेऊन आपण भलतेंच कांहींतरी लिहिलें आणि परीक्षकांनीं आपली फजिती केली तर ? असे एक ना दोन–शेंकडों संशय माझ्या मनांत उभे राहून मला भेडसावूं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, मी कांहीं चढाओढींत भाग घेतला नाहीं. पुढें व्हावयाचें तेंच झालें. चढाओढीला ऐनवेळी जो विषय दिला गेला तो माझ्या आवडीचाच निघाला व आमच्या वर्गांतल्या एका मुलीला चढाओढींतलें पहिलें बक्षिस मिळालें. तिच्या यशाचा मला हेवा वाटला नाहीं. परंतु तिचा बक्षिसाचा निबंध वाचून पाहिल्यावर 'आपण याहून अधिक चांगला निबंध लिहिला असता' असें मात्र मला खरोखर अगदीं प्रामाणिकपणें वाटलें. पण आतां त्याचा काय उपयोग ? माझ्या शंकेखोरपणानेंच मी बक्षिसाला मुकलें होतें. 'संशयाला विनश्यति' हें कांहीं खोटें नाहीं.

माझें असें कितीदां तरी होतें. साधीं पातळें घ्यायला दुकानांत गेलें तरी शेंकडों संशय मला सतावूं लागतात. हें घ्यावें ? याचा रंग टिकेल कां ? त्याची किनार चुरेल कीं काय ? तें एक पातळ कांठपदराला बरें दिसतें, पण चार धुणीं झाल्यावर त्याचें पोत असेंच राहील कीं विरून जाईल ? या संशयांनीं माझी अशी विचित्र अवस्था होते कीं, वाटतें कीं दुकानांत जाणें नको नि तें पातळें घेणें नको. एकदां एका पातळावर माझें असें मन बसलें होतें कीं काय सांगूं ? त्याचा मंद अबोली रंग, त्याचे साफ विणलेले कांठ, त्याचें तलम पोत, सारें सारें कांहीं अगदीं माझ्या मनाजोगें होतें. पण कांठांचा रंग जाईल कीं काय असा संशय मला आला अन् म्हणून मी तें पातळ खरेदी केलें नाहीं. माझ्या बहिणीचेंहि त्याच पातळावर मन जडलें होतें. मी नाकारतांच तिनें झटकन् तें खरेदी करून टाकलें. पुढें काय झालें तें सांगायला नकोच. तें पातळ अतिशय सुंदर निघालें, त्याच्या कांठांचा रंग किंचित्‌हि कमी झाला नाहीं. उलट जसजशीं धुणीं होत गेलीं तसतसें त्या पातळाचें अंग व कांठपदर अधिकाधिक खुलूं लागले. दर खेपेला बहिणीनें

नेसलेलें तें 'माझें' पातळ मी पाही. आणि माझ्या हृदयांत खोल कुठेंतरी खुपल्यासारखें मला वाटें. 'संशयात्मा विनश्यति' हें खरें! केवळ माझ्या अति शंकेखोरपणामुळेंच त्या सुंदर वस्त्राला मी मुकलें नव्हतें काय?

अशी किती उदाहरणें सांगावींत? लहानपणीं मला मांजराचें फार वेड होतें. एकदां आमची भाटी व्याली व तिला तीनचार पिल्लें झालीं. त्या पिल्लांत एक पिल्लूं अतिशय रोडकें, मरतुकडें, घाणेरडें आणि किळसवाणें होतें, मला त्या पिल्लाची भारी चीड येई. माझ्या एका मैत्रिणीनें तें पिल्लूं मजजवळ मागितलें तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें. हें मरतुकडें पिल्लूं घेऊन ही काय करणार आहे कोण जाणें असें माझ्या मनांत आलें. तथापि तें पिल्लूं मीं तिला देऊन टाकलें. पुढें पांचसहा महिन्यांनें त्या मैत्रिणीकडे मी सहज गेलें असतांना एक शुभ्र, चपळ, गुटगुटित आणि चमकदार डोळ्यांचें मांजर तिच्या अंगणांत ऊन खात बसलेलें मीं पाहिलें. तें सुंदर मांजर पाहून माझें मन अगदीं लुब्ध झालें. मीं मैत्रिणीला विचारलें, 'कुठून आणलेंस ग हें मांजर? भारी देखणें आहे!'

माझी मैत्रिण मोठमोठ्यानें हंसूं लागली, तेव्हां मी विस्मयानें टकमक बघतच राहिलें. हंसण्याचा भर ओसरल्यावर ती मला म्हणाली, 'अग तुझ्याच तर भाटीचें पिल्लूं आहे हें! मीं आणलें नव्हतें कां तुमच्या घरून?'

'तें मरतुकडं पिल्लूं!' आश्चर्यानें थक्क होऊन मी उद्गारलें. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.

'हो, तेंच हें पिल्लूं!' त्या मांजराला उचलून प्रेमानें छातीशीं कवटाळीत माझी मैत्रिण म्हणाली, 'आतां बघ कसं छान झालंय्!'

मैत्रिणीच्या घरून परततांना माझ्या मनांत आलें, 'आपण कां बरें त्या लहानग्या पिल्लाचा एवढा रागराग करीत होतों! तें जगलें कीं नाहीं याबद्दल एवढा संशय आपल्याला कां वाटत होता? त्याच्या जीवनशक्तीवर भरंवसा ठेवून आपण त्याला प्रेमानें कां वाढवलें नाहीं? तसें आपण केलें असतें तर हें सुंदर मांजर आज आपल्याच घरीं खेळतांना आपल्याला दिसलें नसतें काय?'

अश्रद्धा हें जीवनांतलें सर्वांत मोठें पाप आहे. जे कुणावर, कशावरच श्रद्धा ठेवूं शकत नाहींत त्यांच्यासारखे अभागी तेच. "Faith can move

Mountains. श्रद्धेनें डोंगर उलथून पाडतां येतील. " असें बायबलांत वचन आहे. माणसाची कशावर तरी श्रद्धा पाहिजे. अत्यंत उत्कट, अव्यभिचारी अशी श्रद्धा पाहिजे. मग ती श्रद्धा स्वतःच्या कर्तृत्वावर असो, हाडामांसाच्या माणसावर असो कीं निराकार अशा एकाद्या तत्त्वावर असो. आजच्या या अश्रद्ध, संशयीपणाच्या काळांत माणसानें प्रथम काय शिकायला हवें असेल तर हें श्रद्धेचें तत्त्वज्ञान. आज आपली कुणावर श्रद्धाच उरलेली नाहीं. कुणावर विश्वासच राहिलेला नाहीं. प्रत्येकाचा आपल्याला संशय येतो. प्रत्येकाची आपल्याला भीति वाटते. आज आपली देवावर श्रद्धा नाहीं. माणसावर श्रद्धा नाहीं, शेजाऱ्यांवर श्रद्धा नाहीं, सरकारवर श्रद्धा नाहीं. भीति, संशय, अविश्वास, अश्रद्धा, यांनीं आज सारें वातावरण कोंदाटून गेलें आहे. पण याचवेळीं श्रद्धेचें तत्त्वज्ञान शिकण्याची आपणांस अत्यंत आवश्यकता आहे. कुणावरही, कशावरही पण आपण श्रद्धा ठेवली पाहिजे. श्रद्धेनें काटयांचीं फुलें होतात. श्रद्धेनें काळ्या ढगांतून चांदणें फुलतें. श्रद्धेनें वानराचा नर आणि नराचा नारायण होतो. संशयात्मा मात्र नाश पावतो. ज्याची कुणावरच श्रद्धा नाहीं, ज्याचा कशावरच विश्वास नाहीं, त्याची अवस्था शोचनीय होते. श्रद्धाहीन जीव हा त्रिशंकूप्रमाणें अन्तराळांतच तिष्ठत राहतो.

मला दोन माणसांची श्रद्धा अत्यंत आदरणीय वाटते. एक महात्मा गांधीं आणि दुसरा तानाजी मालुसरे. महात्माजींची अमूर्त ध्येयावर श्रद्धा होती. तानाजीची शिवाजी महाराजांसारख्या हाडामांसाच्या व्यक्तीवर श्रद्धा होती. पण दोघेहि उत्कट श्रद्धावन्त होते. दोघांनींहि आपआपल्या श्रद्धेमुळें मरणाला हंसत मिठी मारली. जगाच्या दृष्टीनें महात्माजी हे एक अत्यंत मोठे विचारवन्त तत्त्वज्ञ पुरुष असतील आणि तानाजी हा केवळ एक रांगडा अडाणी शिपाई गडी असेल. तथापि मला मात्र त्या दोघांचीहि श्रद्धा सारखीच कौतुकास्पद वाटते आणि दोघांच्याहि वीरमरणापुढें माझें मस्तक सारख्याच आदरानें नम्र होतें.

* * *

## १४ : : चित्रा

चित्रा ही माझी एक मत्रीण आहे. फार फार आवडती मैत्रीण आहे. सज्जनांचें सात पावलें बरोबर चालल्यानेंहि सख्य जुळतें असें म्हणतात. चित्रेची अन् माझी मैत्री ही अशीच अल्पावधींत जुळून आली. तिच्या घरापुढच्या अंगणापासून तों घराच्या पायऱ्यांपर्यंत आम्हीं दोघी हातांत हात अडकवून चालत गेलों. मी कांहीं प्रश्न विचारले. चित्रेनें त्यांचीं उत्तरें दिलीं. तिनें कांहीं प्रश्न विचारले. आणि मींहि त्यांचीं उत्तरें दिलीं. झालें. आमची मैत्री जुळली. या मैत्रीला भूतकाळ कांहींच नव्हता. भविष्यकाळ काय असेल तें सांगणें कठिण आहे. तरी पण आजच्या घटकेच्या या सुंदर स्नेहावर मी सन्तुष्ट आहें.

तसें म्हणाल तर चित्रेंत आणि माझ्यांत साम्य कांहींच नाहीं. ती आहे अवघी चार साडेचार वर्षांची. तेव्हां वयाच्या दृष्टीनें आम्हां दोघींत फारच मोठी तफावत आहे. समानशील आणि समव्यसनी माणसांची मैत्री जुळतें असें म्हणतात. परंतु चित्रा आणि मी समानशील नाहीं आणि समव्यसनीहि पण नाहीं. चित्रेचे आणि माझे आवडीचे विषय सर्वस्वी भिन्न आहेत. मला ज्या गोष्टींचें महत्त्व वाटतें त्या गोष्टी चित्रेला क:पदार्थ वाटतात. आणि तिच्या आवडीच्या ज्या वस्तू आहेत त्या मला हास्यास्पद वाटतात. पुस्तकें हें माझ्या दृष्टीनें वाचनाचें व करमणुकीचें एक साधन आहे. पण चित्रेला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१६२ ........ वि: निबंध.....
क्रमांक ..१३०५....... नों दि: ६.१२.६०..



पुस्तकांचें महत्त्व वाटतें तें वेगळ्याच कारणासाठी. घरकुलाच्या भिंती बनण्यापासून तों बाहुलीला निजावयाला बिछाना करून देण्यापर्यंत चित्रा पुस्तकांचे विविध उपयोग करीत असते. जाड आणि रंगीबेरंगी पुठ्ठ्यांचीं पुस्तकें तिला फार प्रिय आहेत आणि आपल्या कल्पकतेनुसार ग्रंथांना ती आणखी किती तरी भूमिका पार पाडावयास लावते. तेव्हां पुस्तक, ही वस्तु इतकी नाना तऱ्हांनीं वापरतां येणें शक्य असतां केवळ वाचनापुरताच त्यांचा उपयोग करून घेणाऱ्या मोठ्या माणसांच्या निर्बुद्धतेचें चित्रेस सखेद आश्चर्य वाटतें. आणि त्यांच्या कल्पनादारिद्र्याची तिला कींव येते.

जी गोष्ट पुस्तकांची तीच गोष्ट कपड्यांची. मोठ्या माणसांना कपड्यांचा एवढा हव्यास कां असावा हें चित्रेला विचार करून सुद्धां ध्यानांत येत नाहीं. ती स्वतः या बाबतींत अत्यंत अल्पसंतुष्ट आहे. कपड्यांचा तिला भारी कंटाळा आहे. अंगावर शक्य तो कमी कपडे असले म्हणजे चित्रेला आनंद होतो. आणि अंगावरचा एकूण एक कपडा काढून टाकतां आला म्हणजे तर तिच्या सुखाची परमावधि होते. अगदीं उघड्या अंगानें बागेंत जाऊन मांजरीसारखें ऊन खात बसणें हा चित्रेच्या दृष्टीनें सर्वांत उच्च प्रतीचा विलास आहे. चित्रेला माणसांपेक्षां पशुसृष्टीविषयीं अधिक आत्मीयता वाटते. गोठ्यांतल्या काळू म्हशीला साडी नेसावी लागत नाहीं, मोत्या कुत्र्याला कपडे करण्याची आवश्यकता भासत नाहीं अगर मनी मांजरीनें परकरपोलकें घातलें पाहिजे अशी तिच्यावर कुणी सक्ति करीत नाहीं. मग आपल्या मागेंचच ही झगा घालण्याची उपाधि कां हें चित्रेला कांहीं केल्या कळत नाहीं. या बाबतींत घरांतल्या वडील मंडळीशीं चित्रेचे सारखे मतभेद होत असल्यास त्यांत नवल नाहीं. चित्रेच्या अंगावर कपडे चढविणें हा तिच्या आईचा आणि ते कपडे संधि मिळतांच काढून टाकणें हा चित्रेचा नेहमीचा उद्योग होऊन बसला आहे.

आम्हांला महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी जशा चित्रेच्या खिजगणतींत नसतात. तसेंच तिला महत्त्वाच्या वाटणाऱ्या कांहीं गोष्टीचें मोल आम्हांला विचार करूनही कळूं शकत नाहीं. तिच्या जवळच्या वस्तुसंग्रहांत सिगारेटच्या डब्याचें एक मोडकें झांकण आहे. आणि सिल्युलाइडच्या दोन तुटक्या बांगड्या आहेत. या वस्तूंचा तिला काय उपयोग असावा हें माझ्या ध्यानांत

येत नाहीं. पण त्या वस्तूंवर चित्रेचें फार प्रेम आहे. त्या जरा दृष्टीआड झाल्या किंवा त्यांना कुणी हात लावला तरी चित्रा रडून रडून गोंधळ करते. तिच्या वस्तूसंग्रहाप्रमाणेंच तिचा शब्दसंग्रहसुद्धां अजब आहे. विशिष्ट वस्तूंना व विशिष्ट प्राण्यांना तिनें ठराविक नांवें दिलेलीं आहेत. आणि त्या त्या नांवांनींच त्यांना संबोधणें तिला आवडतें. घरांतल्या माणसांना संवयीमुळें तिचा हा शब्दकोश आतां ठाऊक झाला आहे, पण नवख्या व्यक्तींना मात्र त्यामुळें गोंधळांत पडल्या सारखें होतें. चित्रेच्या आजोबांना फुलझाडांचा षोक आहे. आणि आपल्या अंगणांत त्यांनीं एक लहानशीच पण आकर्षक फुलबाग तयार केली आहे. या फुलांना चित्रेनें आपलीं स्वःताचीं खास नांवें दिलीं आहेत. झेंडूच्या फुलांना ती ‘ गेन्दू ’ म्हणते. हिंदी भाषेंत झेंडूच्या फुलाना गेन्द म्हणतात. त्या शब्दाशीं चित्रेच्या ‘गेन्दू’ चें सादृश्य पाहून मला अतिशय नवल वाटलें. एके दिवशीं चित्रा बागेंत खेळत होती. खेळतां खेळतां ती अेकदम ओरडली, ‘ इथं मांजरांचं पिलूं आहे. ’ आणि ‘पिल्लू पिल्लू, मांजराचं पिल्लू ’ करीत ती टाळ्या वाजवूं लागली. आम्ही उत्सुकतेनें जवळ जाऊन बघतो तर काय, एक भला मोठा बेडूक तेथें बसला होता. ते पाहून चित्राची मावशी तिला रागावून म्हणाली, ‘ ए शहाणे, हें मांजराचं पिल्लूं काय ग ? हा तर बेडूक आहे !’ पण चित्रा गंभीरपणें म्हणाली ‘ बेढूक नाई, मांजराचं पिल्लूंच आहे तें. ’ मग कोणत्या तर्कशास्त्रानुसार तिनें त्या बेडकाला मांजराचें पिल्लूं ठरविलें तें तिचें तिलाच ठाऊक !

चित्रा ही कांहीं अंशीं बालक आणि कांहीं अंशीं स्त्री आहे. भांडखोरपणा, बोलकेपणा आणि विलक्षण जिज्ञासा हे स्त्री जातीचे गुण इतक्या अल्पवयांत सुद्धां चित्रेच्या ठायीं पूर्णत्वानें वास करीत आहेत. ती एकसारखी बडबडंत असते. कशानेंही आणि कुणापुढेंही तिची वाचा कुंठित होत नाहीं. केव्हांतरी अैकलेले वाक्‌–प्रचार अचूक उच्चारून ऐकणाराला कधीं कधीं ती अगदीं स्तिमित करून सोडते. स्त्रीजातीचा एक सहजस्वभाव जी वत्सलता तीही चित्रेच्या अंगीं भरपूर प्रमाणांत आहे. तिच्या या वात्सल्यगंगेंत तिच्या लाकडी बाहुलीपासून तो तिच्या आजोबापर्यन्त कुणीही अवगाह करावें. स्त्रियांची नटण्यामुरडण्याची आवड मात्र चित्रेच्या ठायीं अद्याप निर्माण झालेली दिसत नाहीं. कपड्याविषयीं तर ती अतिशय उदासीन असतेच, पण

स्वतःचे दुसरेही कांहीं सोपस्कार करून घेणें तिला फारसें रुचत नाहीं. तिचे केस आपले स्वैरपणें वाऱ्यावर भुरभुरत असतात. त्यांच्या वेण्या घातल्याच गेल्या पाहिजेत असा चित्रेचा आग्रह नसतो. तिला फुलें आवडतात. बागेंतल्या फुलांत तास न् तास खेळतांना ती अगदीं रमून जाते. पण केशभूषेचें एक साधन या दृष्टीनें फुलांचा विचार तिनें केलेला दिसत नाहीं. दुसऱ्यावर आपला शह ठेवून वागण्याचें स्त्रियांचे कसब चित्रेच्या अंगीं भरपूर आहे. आणि स्त्रियांचें कपट लाघवीपणा व मायाळीपणा तिच्या अंगीं भरपूर प्रमाणांत आहे. चित्रेची मोठी बहीण लाजाळू आहे आणि धाकटचा बहिणीला तर अद्याप बोलतांही येत नाहीं. तेव्हां चित्राच त्या दोघींवरही आपला शह ठेवून आहे. चित्रेला खाद्यपदार्थ अत्यंत प्रिय आहेत, आणि ते मिळावेत म्हणून कपट करायला ती मागें पुढें बघणार नाहीं. एकदां धाकटचा बहिणीला जवळ घेऊन 'माझा राजा' 'माझें पिल्लू' म्हणून ती कुरवाळीत असलेली पाहून मला मोठें कौतुक वाटलें. पण लौकरच माझ्या ध्यानांत आलें कीं बहिणीजवळचा करंजीचा तुकडा आपणाला मिळावा म्हणून चित्रेला प्रेमाचा हा अकल्पित उमाळा आलेला होता !

आमची दोघींची ओळख होतांच चित्रेनें मला आपल्या स्नेहाच्या कक्षेंत तात्काळ गोवून टाकलें. तिचे हृदय अतिशय उदार आहे. आणि आपल्या अंतःकरणांतील प्रेमभावनेचा वर्षाव ती जवळ येणाऱ्या सर्व व्यक्तींवर सारख्याच समभावानें आणि मुक्तहस्तानें करते. वस्तुतः चित्रेची आणि माझी सृष्टि या सर्वस्वी भिन्न आणि परस्परांपासून अत्यंत दूर आहेत. माझी सृष्टि खेदानें आणि विषण्णतेनें काळवंडलेली आहे. मनुष्य वयानें मोठा होऊं लागला म्हणजे हें असेंच होतें. बाळपणीं त्याच्या सभोंवतीं असलेल्या सुंदर आणि मुग्ध सृष्टीपासून तो दिवसेंदिवस दूर दूर जाऊं लागतो. नाना तऱ्हेच्या अडचणींनी आणि चिन्तानीं माझ्या सृष्टीची रुचिरता नष्ट करून टाकली आहे याउलट चित्रेची सृष्टि मात्र अगदीं टवटवीत आणि प्रफुल्ल अशी आहे. तेथें प्रसन्नतेच्या निळ्या आभाळांतून सुखाचें कोवळें ऊबदार ऊन पाझरत आहे. आनंदाचीं सुंदर फुलें चहूंकडे गजबजलीं आहेत, त्यावर तृप्तीचीं फुलपांखरें बागडत आहेत आणि समाधानाची कोंवळी हिरवळ सर्वत्र पसरली आहे. चित्रेच्या सृष्टींत जणूं सदैव एक मंगल महोत्सव

चालला आहे असें वाटतें. आणि या महोत्सवांतली सर्वांत महत्वाची व्यक्ति आपण आहोंत असा भाव चित्रेच्या मुखावर पसरून राहिलेला असतो. महागाई, काळा बाजार, आगामी युद्ध या आपणाला भयानक वाटणाऱ्या गोष्टी चित्रेच्या गांवींही नाहींत. चित्रा म्हणजे मूर्तरूप धारण केलेला प्रत्यक्ष आनंदच आहे. पूर्वीच्या काव्यांमधून सुंदर स्त्रिया जेथें जेथें पाऊल टाकतात तेथें तेथें भूमींतून सुद्धां कमळें उमलतात अशीं वर्णनें आढळतात. त्याचप्रमाणें छोटी चित्रा जेथें जेथें पदक्षेप करते तेथें तेथें आनंदाचीं सुंदर कमळें फुलतात आणि वातावरणांतले अणुरेणु उल्हासानें खदखदां हंसत सुटतात. सकाळच्या प्रहरीं आपल्या मधुर हास्यानें सर्वांचीं हृदयें पुलकित करीत घरभर वागडणाऱ्या चित्रेस पाहिलें कीं 'जगाचें आन्ध्य फेडीत। प्रियेचीं राउळें उघडीत। निघे जैसा भास्वत। प्रदक्षिणें.' या ज्ञानेश्वरांच्या ओवीचें मला स्मरण होतें. चित्रेच्या व्यक्तित्वांत अशी अनुपम जादू आहे.

चित्रेच्या रूपाचें वर्णन करावयाचें राहिलेंच. चित्रा ही नांवांप्रमाणें अक्षरशः चित्रासारखी आहे. तिचें चित्र जर काढायचें झालें तर अनेक लहान मोठ्या वर्तुळांचा उपयोग करून तें काढतां येईल असें मला वाटतें. चेहऱ्याचें वर्तुळ, डोळ्यांचीं दोन वर्तुळें, नकट्या नाकाचें वर्तुळ आणि वर्तुळाकार जिवणी. किंबहुना तिची सारी देहकृति एका लंब वर्तुळांत बसवून दाखवितां येईल. चित्रा सुंदर आहे कीं नाहीं हें मला ठरवितां येत नाहीं. तिचें रूप असें कांहीं आहे कीं जें पाहिल्यावर सुंदर–असुंदराचा विवेक करावयाचें माणसाला भानच राहूं नये. मनाला जें आल्हाद देतें तें खरें सौंदर्य अशी सौंदर्याची व्याख्या करतां येईल. त्याचप्रमाणें प्रतिक्षणीं जें नवता धारण करतें तें सुंदर, तें रमणीय असेंही एक कविवचन आहे सौंदर्याच्या या दोन्ही कसोट्यांना चित्रा पुरेपूर उतरते. तिचें रूप हें आल्हाददायक आहे तसेंच नवनवोन्मेषशाली आहे. चित्रा ही निसर्गाची एक सुंदर कलाकृति आहे. चित्रा हा निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार आहे. तिचा सतेज गोरेपणा, विपुल काळ्याभोर केंसांच्या दाट रेशमी लडींनीं आच्छादलेलें तिचें मस्तक, तिचे दुलदुलित हातपाय, गोबरे गाल, चमकदार वाटोळे डोळे, आणि हंसण्यासाठीं सदाच आतुर असलेल्या लहानशा लालुंग्या जिवणींतून डोकावणारे दुधासारखे शुभ्र दांत हें सारें कितीदांहि पाहिलें तरी मनाची तृप्ति म्हणून होत नाहीं.

अंगांत रेशमी झगा घातलेला असला तरी चित्रा मोहक दिसते आणि धुळीनें नखशिखान्त माखलेली असली तरी सुद्धां ती मोहकच दिसते. ती खदखदून हंसत असतां तिचें रूप मनोहर वाटावें यांत कांहींच नवल नाहीं. पण तिच्या दोन्ही गालांवरून आंसवांचे ओघळ वाहत असले आणि ओठांचा आकार रडण्यामुळें विकृत झालेला असला तरी त्यांतून देखील चित्राच्या रूपाचा एक नवाच मधुर प्रत्यय आल्यासारखें वाटतें. हा चमत्कार नव्हे काय ?

चित्रेचा आणि माझा सहवास एक आठवड्यापुरताच झाला. पण त्या अल्पावधींत चित्रेच्या सुंदर व्यक्तित्वानें मला भारून टाकलें. तिच्या स्वभावांतील सरळपणा व मोकळेपणा मला हृदयंगम वाटला आणि तिच्या बालीश लीलांनीं मला वेडावून टाकलें. चित्रा अद्याप अशा वयांत आहे कीं दंभ, स्वार्थ, कुत्सितता या दुर्गुणांचें तिला वारेंही लागलेलें नाहीं. ती अजून अशा एका अव्याजमधुर सृष्टींत वावरत आहे कीं जेथें दुःख, शोक, चिंता यांची पुसट सावलीहि पडलेली नाहीं. त्यामुळेंच चित्रा मला एवढी आकर्षक वाटतें. तिचें सान्निध्य हें मला एकाद्या सुंदर स्वप्नासारखें भासलें. आणि हें स्वप्न मी माझ्या अंतःकरणाच्या कोंपऱ्यात जपून ठेवलें आहे. चित्रा मला पुन्हां केव्हां भेटेल हें मला नक्की सांगतां येत नाहीं. पण जेव्हां ती मला भेटेल तेव्हां तिचें हें आजचें रमणीय बाळरूप मला पुन्हां दिसणार नाहीं. हें मला निश्चित ठाऊक आहे. कदाचित ती पुन्हां भेटेल त्यावेळीं आजच्याहून अधिक सुंदर व आकर्षक झालेली असेल. पण मग ती आजची चिमुकली चित्रा असणार नाहीं. ती कुणीतरी निराळीच चित्रा असेल. आणि ती चित्रा माझ्या परिचयाची असणार नाहीं. मलाहि या नव्या चित्रेंविषयीं एवढी आपुलकी वाटणार नाहीं. मध्यंतरीं गेलेल्या काळानें आम्हां दोघींत एक अनुल्लंघ्य अंतर निर्माण केलेलें असेल. परंतु आजच्या चित्रेची बालमूर्ति मी माझ्या अन्तःकरणावर रेखून ठेवली आहे ती मात्र काळाला कदापि रंग बदलतां येणार नाहीं. या सुंदर चित्रांतले दिवसगतीनें फिकें पडणार नाहींत किंवा याच्या रेषा काळाच्या ओघांत पुसट होऊन जाणार नाहींत.

चित्रेच्या सहवासांत मी अनेक गोष्टी शिकलें. तिच्या जाणीवेची कक्षा किती मर्यादित आहे आणि तिच्या जगाचे नियम किती साधे आहेत ! ज्या अनेक गोष्टींना आपण मोठीं माणसें निष्कारण अवास्तव महत्व देतों

आणि ज्या नाना तऱ्हेच्या संकटांची आपण उगीचच चिन्ता वाहतों त्या गोष्टी आणि तीं संकटें वस्तुतः किती अर्थशून्य आणि महत्वशून्य आहेत हें चित्रेनेंच मला दाखवून दिलें. खरें पाहतां जीवन तसें फारच साधें, सोपें आणि सरळ आहे. आपण आपल्या मनांतलीच भुतावळ उठवीत असतों आणि मग त्या भुतावळीचें भय बाळगून अर्धमेले होऊन जातों. पण एक मनःप्रसन्नता जवळ असली तर सारें जग अेकाद्या उमलत्या फुलासारखें सौंदर्यानें व सुगंधानें वहरून गेल्याप्रमाणें वाटतें. चित्रेनें आपल्या निष्पाप, निष्कपट आणि निश्चिन्त जीवनानें मला एक साधें तत्त्वज्ञान शिकविलें. माणसानें आपलें मन प्रसन्न ठेवलें तर जगांत त्याला फारशीं दुःखें भासत नाहींत, त्यांची झळ त्याला विशेष लागत नाहीं तेंच हें तत्वज्ञान !

चित्रेच्या घरून निघतांना मला फार अवघड वाटलें. जातांना चित्रेची भेट घेणें मी मुद्दामच टाळलें. मी तिच्या अंगणांतल्या बागेंतून बाहेरच्या रस्त्यावर पाऊल टाकलें तेव्हां गेल्या आठ दिवसांच्या सुंदर स्मृति अन्तःकरणांत दाटून येऊन मला गहिंवरल्यासारखें झालें. दोन पावलें पुढें टाकल्यावर मी पुन्हां मागें वळून पाहिलें. चित्रेच्या अंगणांतील बागेंत सुंदर सुंदर फुलें डोलत होतीं आणि त्या सर्व फुलांहून अधिक मोहक असलेलें तें मानवी फूल–चित्रा–बागेंत उभी होती. तिचें गोजिरें रूप डोळ्यांत आणि मनांत साठवून घेत मोठ्या कष्टानें मीं पुढें पाऊल टाकलें. आणि मला रे० टिळकांची एक ओळ आठवली—

विरह फुलांचा नाहि बरा !

* * *

## १५ : : गर्दीचीं सुखें

एकांताच्या सुखाबद्दल आतांपर्यंत इतक्या लोकांनीं इतकें लिहून अन् बोलून ठेवलें आहे कीं, गर्दीच्या सुखासंबंधीं कोणीतरी आवर्जून सांगावयाची वेळ आली आहे असें मला वाटतें. कवीपासून तो कारागिरापर्यंत, संतापासून तों संसारी पुरुषापर्यंत, आणि शास्त्रज्ञापासून तों शांतीचा शोध घेऊं पहाणाऱ्या साधकापर्यंत जो तो एकांताच्या मागें लागला आहे. कवीला त्याचें काव्य एकांतांत सुचतें. प्रेमिकांचें प्रेमकुजन एकांताखेरीज रंगू शकत नाहीं, मोक्ष मिळवूं पाहणारा विरक्त पुरुष पर्वताच्या एकांत गिरिकंदरांतच आपली साधना करतो. आणि काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्याला इन्कमटॅक्सच्या अधिकाऱ्याच्या डोळ्यांत धूळफेंक करण्यासाठीं खोटे हिशोब तयार करावयलाहि एकांताचीच आवश्यकता असते. अशा रीतीनें एकांताचें महात्म्य सर्वांनींच वाढवून ठेवलें आहे. त्यांतून आमच्या प्राचीन संतांनींहि आपल्या काव्यांतून एकांताची महति गायिल्यामुळें तर त्याला अतोनातच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. योगसाधना करण्यासाठीं कसें स्थळ अवश्य आहे याची मीमांसा करतांना ज्ञानेश्वर म्हणतात—

आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें
आणि जनाचेंनि पाथरवे । रुळेचिना ।।
पाणिलगें हंसे । दोनी चारी सारसें
कवणें एकें वेळे बैसे । तरी कोकिळही हो ।।

निरंतर नाहीं । तरी आलीं गेलीं कांहीं
होतु का मयूरेंहि । आम्हीं ना न म्हणो ।।

ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याचा आशय असा कीं योग साधना करणाऱ्या साधकानें या कार्यासाठीं अशी जागा शोधावी कीं जेथें लोकांची वर्दळ अजिबात असतां कामा नये. पाण्यांत हंस, सारस असेल तर चालतील. कोकिळाचें कूजन कोठें चाललें असेल तर त्यालाहि हरकत नाहीं. आणि अधून मधून मोर तेथें येतजात राहिले तर तेंहि कांहीं वाईट नाहीं. पण माणसें मात्र नकोत ! म्हणजे पहा, हंस, सारस, कोकिळ किंवा मोर यांचा साधकाला उपद्रव होत नाहीं. ते त्याचें एकाग्र मन विचलित करूं शकत नाहींत. पण तोच एखादा माणूस जर तेथें फिरकला तर मात्र साधकाच्या साधनेंत लगेच व्यत्यय येतो ! 'समता वर्तावी । अहंता सोडावी.। तेणेंचि पदवी । मोक्षमार्ग' अशी उदात्त शिकवण देणाऱ्या ज्ञानदेवांनींच माणसाला माणूस कटाक्षानें टाळावयास सांगावें ही केवढ्या आश्चर्याची गोष्ट आहे बरें ! आणि माणूसच माणसाचा तिटकारा करूं लागेल तर तो समतेनें वर्तत आहे असें कसें म्हणतां येईल ? शिवाय, जो इतरांपासून स्वत:ला अलिप्त ठेवतो. त्यांच्यापासून स्वत:ला कांहीं वेगळा मानतो. त्याची अहंता सांडेल कीं तिचें अधिकच पोषण होईल बरें ? पण हें सारें स्वतः ज्ञानेश्वरच सांगत आहेत, तेव्हां तें विश्वसनीय मानावयालाच हवें.

ज्ञानेश्वराप्रमाणेंच तुकारामांनीहि एकांतवासाचा गौरव केला आहे. 'विष्णुमयजग वैष्णवाचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ' असें समतेचें महान तत्त्वज्ञान सांगणारा श्रेष्ठ संत आपल्या आध्यात्मिक चिंतनासाठीं मात्र जनसंम्मर्दापासून दूर रहाण्याची शिफारस करतो. तुकाराम म्हणतात—

वृक्षवल्लि आम्हीं । सोयरी वनचरें
पक्षीही सुस्वरें । आळवीती
येणें सुखें वडे । एकांताचा वास
नाहीं गुणदोष । अंगां येत

'भेदाभेद अमंगळ' असल्याची ग्वाही देणाऱ्या तुकारामांनीं सुद्धां माणसापेक्षां वृक्षवल्लींचा नि पांखरांचा सहवास अधिक स्पृहणीय मानावाना ही गोष्ट त्यांच्या उदार हृदयाला खचितच साजेशी नाहीं. तथापि, ज्ञानेश्वर

तुकारामांसारख्या संतांनीं एकान्तवासाचें महत्व असें वाढवून ठेवलेलें असल्यामुळें सर्वसामान्य माणसालाहि एकान्त साधणें हीच गोष्ट सर्वांत श्रेष्ठ वाटूं लागली असल्यास नवल नाहीं.

मला मात्र हल्लीं एकान्तापेक्षां गर्दीचें महत्त्व जास्त वाटूं लागलें आहे. माणसापासून माणसाला दूर ठेवणारा आणि पुण्या इतकाच पापालाहि प्रोत्साहन देणारा एकान्त माणसाचा मित्र नसून तो त्याचा शत्रूच आहे असें म्हणावयाला हवें. आज आपण जीवनाच्या सर्व क्षेत्रांत समता प्रस्थापित झाली पाहिजे असें म्हणतों. राजेरजवाडे, सरदारदरकदार व भांडवलशाहा, यांच्या सत्तेचा काळ जाऊन आज लोकशाहीचा काळ सुरूं झाला आहे असें आपण प्रतिपादितों ! अशा या समतेच्या नि लोकशाहीच्या काळांत आपण गर्दीचा तिटकारा करणें, तिच्याकडे तुच्छतेनें बघणें योग्य आहे काय ? सर्व माणसें जर सारखीं, सर्व जर एकाच पातळीवरचीं, तर सर्वांनींच एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून सतत एकत्र राहिलें पाहिजे. एकत्र हंसलें पाहिजे, एकत्र रडलें पाहिजे. आणि एकत्र क्षुब्धहि झालें पाहिजे. ' गर्दीचें मानसशास्त्र ' ' सामाजिक मन ' असे वाक्प्रयोग हल्लीं पुष्कळ वेळां आपल्या ऐकण्यांत येतात. आणि हे वाक्प्रयोग कांहींशा तुच्छतेनें वापरले जातात. माणूस गर्दींत मिसळला म्हणजे बौद्धिक दृष्ट्या तो खालच्या पातळीवर येतो. त्याची नैतिक पातळीहि काहींशीं खालावते, त्याच्या आवडीनिवडी जास्त भावड्या व स्थूल होतात आणि त्यांचे रागद्वेषहि अधिक उथळ नि भडक होतात असा या वाक्प्रयोगामागील उपहासाचा नि तुच्छतेचा अर्थ आहे. तथापि मला स्वतःला गर्दीकडे इतक्या तुच्छतेनें पाहतां येत नाहीं. आणि जे लोक गर्दीकडे तुच्छतेनें बघत असतात ते लोकसुद्धां त्याक्षणीं गर्दीपासून दूर, एकीकडे उभे असतात म्हणूनच त्यांना ही तुच्छता दाखवितां येते असें मला वाटतें. हे लोक जर त्या गर्दींत येऊन सामील झाले तर गर्दीविषयीं तुच्छता न दर्शवितां तिजविषयीं ते प्रेम आणि आदरच दाखवितील यांत मला यत्किंचितहि शंका वाटत नाहीं.

एकान्तात माणूस जास्त चोखंदळ होऊं शकेल. त्याच्या आवडी निवडी अधिक सूक्ष्म, अधिक अभिरुचिपूर्ण असतील, आणि त्याची बौद्धिक व सांस्कृतिक पातळी जास्त वरची असेल हें सर्व मला मान्य आहे. पण एका-

न्तात माणूस जास्त भित्रा, जास्त कातडीबचावू जास्त तुसडा नि जास्त शिष्ट असतो हेंहि तितकेंच खरें. गर्दींत घुसल्यानंतर अपरिहार्यपणें अंगीं बाणणारें सौंदर्य, दिलखुलासपणा, निर्भरता, आणि कोणत्याहि भावनेच्या लाटेवर स्वत:ला बेदरकारपणें झोंकून देण्याची बेहोषी एकान्तांत बसलेल्या माणसाच्या अंगीं कधींच येणार नाहीं. त्यासाठीं माणसानें गर्दींतच मिसळावयाला हवें. तेथें तो लहान मुलाइतका निष्पाप, निरागस आणि मुग्ध बनतो. ज्या विनोदांना एकान्तांत तो नाकें मुरडतो त्यांचा गर्दींमध्यें तो पोटभर हंसून आस्वाद घेतो. जीं विधानें एकान्तांत त्याला कदाचित् पारखून-जोखून घ्यावीशीं वाटतील त्यांवर मनस्वी खूष होऊन तो बेफाम टाळ्या वाजवतो. गर्दींमध्येंच आणि बेहोषपणें छातीवर गोळ्या झेलून हंसत हंसत प्राणाचें विसर्जन करण्याइतका अनावर धुंदी माणसाला चढूं शकते तींहि गर्दींमध्येंच. गर्दीची नशाच कांहीं वेगळी असते. आणि ही नशा माणसाला इतकी चढते याचें कारण मला वाटतें माणसाच्या समाजप्रियतेंत सांपडेल. माणूस हा जन्मतःच समाजप्रिय प्राणी आहे. तो कळप करून राहणारा प्राणी आहे आणि म्हणूनच एकटेपणाच्या भिंती स्वतःभोवतीं उभारून राहण्यापेक्षां माणसांत मिळून राहणें हें त्याला अधिक आवडतें नि त्याच्या बाबतींत तें अधिक नैसर्गिकही आहे.

कोणी कबूल करो वा न करो, माणसाला एकटें रहावयाचें भय वाटतें ही गोष्ट अगदीं सत्य आहे. लहान मूल अंधारांत एकटें जावयास भितें. आणि घरांतहि त्याला एकटयाला ठेवून वडील माणसें बाहेर गेलीं तर त्याला तें सहन होत नाहीं. अगदीं लहान मूल पाळण्यांत टाकून आई घरकाम करीत असते. तिची हालचाल मुलाच्या कानांवर येत असते व तेवढ्या आधारावर तें निर्भयपणें, विश्वस्तपणें पाळण्यांत खेळत राहतें! पण आई जरा दूर गेली, तिचा पायरव कानीं येईनासा झाला कीं तें मूल रडूं लागतें, आक्रोश करूं लागतें, कासावीस होतें. बाल्यापासून एकटेपणाचें हें जें भय आपल्याला वाटत असतें तें मोठेपणीं देखील आपल्या रक्तात खोल कुठें तरी दडून बसलेलें असतें. आणि म्हणूनच वयानें वाढल्यानंतर सुद्धां आपण नेहमीं चार माणसांत वावरत राहतों. चार माणसें वागतील तसेंच आपलें वर्तन कटाक्षानें ठेवण्याचा प्रयत्न करतों. आणि त्या वेगळें आपल्या हातून कांहीं घडलें तर आपण मनांतून ओशाळून जातों.

११२५८



गर्दीबरोबर आपण असावें ही माणसांची एक अत्यंत नैसर्गिक अशी प्रवृत्ती आहे. त्याची ती एक अत्यंत मूलभूत अशी गरज आहे आणि म्हणूनच या प्रवृत्तीला किंवा या गरजेला बळी पडण्यांत कोणीही कमीपणा बाळगण्याचें कारण नाहीं. गर्दीतला मनुष्य हा अधिक वास्तव असतो. त्याचा खरा स्वभाव, त्याचें खरें स्वरूप गर्दीतच जास्त स्पष्टपणें प्रकट होतें. म्हणून आपलें सत्य स्वरूप जाणून घेण्यासाठीं देखील माणसानें गर्दीतच मिसळणें आवश्य आहे. एकान्तांत तो स्वत:विषयीं भलभलत्या अवास्तव कल्पना करतो. खोटीं स्वप्नें उभारतो. आणि स्वत:विषयींचा त्याचा दृष्टिकोनहि विकृत असतो. म्हणून स्वत:ला ओळखण्यासाठीं माणसानें गर्दीत मिसळलें पाहिजे.

माणूस कितीही अहंकारी असो. एकदां तो गर्दीत घुसला कीं त्यांच्या अहंकाराचा लवलेशहि शिल्लक राहणार नाहीं. आणि एका वेगळ्या अर्थानें त्याच्या अंगीं खऱ्याखुऱ्या माणुसकीचा उदय होईल. बाजारांतील गर्दी, दुकानांतील गर्दी, आगगाडींतील गर्दी कोणत्याहि गर्दीत तुम्ही मिसळा म्हणजे आपले रागद्वेष, विकार-विचार हर्ष खेद किती समान असतात. याचा तुम्हांला प्रत्यय येईल आणि इतरापासून स्वत:ला कोणी तरी वेगळें किंवा विशेष समजण्याचा मूर्खपणा तुम्ही कधींहि करणार नाहीं.

म्हणूनच श्रीमन्त माणसाची मला कींव येते. त्यांचें राहणें गर्दीपासून दूर असलेल्या निवान्त व एकान्त ठिकाणीं. त्यांचा प्रवास फर्स्टक्लासच्या निर्मनुष्य डब्यांतून. त्यांचीं मनोविनोदेनाचीं स्थानें सुद्धां जनसंम्मर्दापासून दूर. बिचाऱ्यांचा जनतासंपर्क कधीं घडतच नाहीं. माणसाचीं अंगें अंगाला घासून होणारा सामरस्याचा आनंद त्यांना कधीं मिळतच नाहीं. धुळीचा, घामाचा व श्वासाचा संमिश्र वास नाकांत घुसून ते कधीं थरारून जातच नाहींत आणि 'तीं माझीं मी त्यांचा एकच ओघ अम्हांतुनि वाहे' हा मानवतेच्या मूलभूत ऐक्याचा प्रत्यय त्यांना कधीं येतच नाहीं. अभागी बिचारे!

माझें मन अनेकदां अनेक गोष्टींनीं आनंदित होतें. पण त्यांतला एक अनुभव मला विशेष आनंदकारक वाटतो. माणसांची ठेंच गर्दी झाली आहे. सर्व बाजूंनीं अंग रेटलें जात आहे, श्वासांनीं हवा उष्ण झाली आहे, बघावें तिकडे चेहरेच चेहरे दिसत आहेत, अशा वेळीं माझें संकुचित मीपण

मी विसरून जातें. माझ्या व्यक्तित्वाचा लहानसा कोश फोडून मी सर्वत्र पसरलें आहें, विस्तार पावलें आहें असें मला वाटूं लागतें. मग सर्वांचे श्वास एक होतात. सर्वांचीं मनें एक होतात. सर्वांच्या हृदयाचें स्पन्दन एक होतें आणि सर्व मिळून एकाच शरीराचे अवयव आहेत असा कांहींसा भास मनाला होऊं लागतो. या भासांत मी विरघळून जातें. एका अनावर लाटे-वरतीं मी उंच उचलली जातें आणि एका विलक्षण आनंदानें माझें काळीज उचंबळून येतें.

'सहस्त्रशीर्षो पुरुषः सहस्त्रक्षः सहस्त्रपात्' या पुरुषसूक्तांतील विराट पुरुषाचें चित्र वर्णितांना कवीला आलेला अनुभव हाच असेल काय ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २६९६२ विः निबंध
क्रमांक १२०५ नोंः दिः ६।२।६०



आपण आरशांत डोकावून पहावें आणि आपला चेहराच आपल्याला तेथें दिसू नये, असा अनुभव आला तर माणूस किती भयभीत होईल नाहीं? पण या अनुभवापेक्षांहि अधिक भीतिदायक असा दुसरा एक अनुभव आहे. आपला चेहरा आरशांत पहायला जावें आणि त्याच्या जागीं दुसऱ्याच कुणाचा तरी चेहरा तेथें दिसावा हा तो अनुभव !

मला परवां असा अनुभव आला.

माझी एक मैत्रीण आणि मी कोणत्यातरी एका विषयावर वाद घालीत होतों. वाद खूप पेटला होता. आपापल्या बाजूचें समर्थन करण्यासाठीं आम्हीं दोघीहि आपापले मुद्दे जोरजोरानें पुढें मांडीत होतों. अन् प्रतिपक्षीयांचे मुद्दे खोडून टाकण्यासाठीं जिवाचा आटापिटा करीत होतों. येवढ्यांत काय झालें कुणास ठाऊक, वादांतली माझी बाजू सोडून मी माझ्या मैत्रिणीच्या बाजूचाच विचार करूं लागलें, आणि मग तिच्या मताचें समर्थन करणारे दोनतीन छान मुद्दे मला सुचले. खरेंच, किती बिनतोड मुद्दे होत ते. आणि ते मुद्दे जर तिनें मांडले असते; तर मला त्यांचें मुळींच खंडन करतां आलें नसतें. मी अगदीं निरुत्तर झालें असतें. आणि वादांत तिचा जय झाला असता. पण तिला ते मुद्दे सुचतच नव्हते. ते सुचले होते मला. माझा जीव हळहळूं लागला. इतके छान आणि बिनतोड मुद्दे केवळ तिला न सुचतां मला सुचले, म्हणून

ते वाया जावेत असें मला मुळींच वाटेना. त्या वादविवादांतला माझा जो वैयक्तिक भाग होता तो मी विसरून गेलें आणि एका व्यक्तिनिरपेक्ष तात्त्विक, उदात्त पातळीवरून त्या सर्व विषयाचा मी विचार करूं लागलें. तेव्हां मला असें वाटलें कीं हे मुद्दे आतां मांडलेच पाहिजेत. त्याशिवाय आपापल्या चैन पडावयाचें नाहीं. इतकेंच नव्हे तर ते मुद्दे लपवून ठेवण्यांत आपल्या सदसद्विवेक बुद्धीशीं आपण प्रतारणा केल्यासारखें होईल.

माझी मैत्रिण तावातावानें बोलत होती. तिची बाजू तिला कांहीं केल्या धड मांडतां येत नव्हती. ती शब्दांच्या जाळ्यांतच पुन्हा पुन्हां गुरफटत होती. आणि त्यांतून तिला बाहेर पडतां येत नव्हतें. दोऱ्याची गुंतागुंत व्हावी आणि त्याचें टोंक मात्र सांपडूं नये तशी तिची अवस्था झाली होती. मला तिची कींव आली आणि गंभीरपणें मीं तिला म्हटलें, " थांब. तुझा सारा गोंधळ उडाला आहे. आपण काय बोलतों आहोंत हेंच मुळीं तुला कळेनासें झालें आहे. अन् त्यामुळें अगदीं उघड उघड दिसणाऱ्या गोष्टी देखील तुझ्या ध्यानांत येत नाहींत. तुझी बाजू कशी बरोबर आहे हें मी तुला समजावून सांगतें. तुझ्या विधानाचें समर्थन करणारे किती बिनतोड मुद्दे मला सुचले आहेत पहा--"

आणि मी ते मुद्दे तिला सांगितले. त्यांचा बिनतोडपणा तिलाहि पटला. पण त्यामुळें खूष होण्याऐवजीं ती माझ्यावर चिडली मात्र. जें तिला सुचायला हवें होतें तें मला सुचलें याचाच तिला अतोनात राग आला. यांत आपली भयंकर फसवणूक झाली असें तिला वाटलें. आणि सर्वांत विशेष म्हणजे, तिच्या बाजूचे मुद्दे मी स्वत: मांडले यांत माझी जी व्यक्तिनिरपेक्ष उदात्त भावना होती ती तर तिला मुळींच समजूं शकली नाहीं. त्या कृत्या-मागचा गंभीर आशय तिच्या चिडलेल्या मनाला उमगला नाहीं. उलट तिचे मुद्दे मी तिला समजावून सांगण्यांत मी तिची कुचेष्टाच केली असें तिला वाटलें. " तुझा शहाणपणा नको आहे मला " येवढेंच म्हणून ताडकन् ती तेथून उठली आणि रागारागानें चालती झाली.

ती गेली त्या दिशेकडे मी हतबुद्ध होऊन बघत राहिलें. आमच्या वाद-विवादाचा शेवट अशा भांडणांत व्हावा हें मला बरें वाटलें नाहीं. पण त्याहिपेक्षां मला जास्त दुःख झालें तें माझ्या सद्हेतूचा असा विपर्यास व्हावा

याचें. जी गोष्ट मी अत्यंत गंभीर आणि उदात्त अशा भावनेनें केली त्यांत तिला आपली कुचेष्टाच दिसून यावी यापरता दैवदुर्विलास तो कोणता !

त्या मैत्रिणीशीं वाद घालतांना आज आला तो अनुभव मला नेहमींच येतो. कोणाशीं भांडत असतांना मला त्याचीच बाजू बरोबर वाटूं लागते. कोणाच्या वर्तनावर चार मंडळींत टीका होत असावी आणि मीहि माझ्या परीनें त्या टीकेला हातभार लावीत असलें तर त्याच क्षणीं टीकाविषय झालेल्या व्यक्तींच्या जागीं मला मीच दिसूं लागतें आणि मग त्या व्यक्तीवर टीका करण्यासाठीं वळवळत असलेली माझी जीभ तिचें समर्थन करण्यासाठीं सज्ज होते. चारचौघांत कोणी मूर्ख ठरविलें जाऊं लागलें तर त्या मूर्खपणाचीं एवढीं ठळक लक्षणें मला माझ्याच ठायीं दिसूं लागतात कीं त्यावर चाललेली टीका हा मला माझा स्वतचाच अपमान वाटूं लागतो आणि त्या मूर्ख-पणाच्या बाजूनें वाग्युद्ध खेळावयास मी सिद्ध होतें. यामुळें हल्लीं असें झालें आहे कीं मला कोणाशीं वादच घालतां येत नाहीं. कारण समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्याचें टोपण माझ्या चेहऱ्यावर केव्हां चढेल याचा नेमच राहिलेला नाहीं. आरशांत आपण चेहरा बघायला जावें आणि तेथें दुसऱ्याच कुणाचा तरी चेहरा दिसावा हा अनुभव मला हल्लीं इतका वरचेवर येऊं लागला आहे कीं आतां आरशांत बघायचीच मुळीं मला भीति वाटूं लागली आहे.

यामुळें आणखीहि एक असें झालें कीं माझ्या ठिकाणीं कसला आग्रह, अभिमान, त्वेष, अभिनिवेश आतां राहिला नाहीं. वेगवेगळे राजकीय पक्षोप-पक्ष, वाङ्मय, तत्त्वज्ञान, समाजकारण यांतल्या विविध मतप्रणाली प्रांता बद्दलची किंवा देशाबद्दलची अभिमानाची भावना हें सारें माझ्या वृत्तींतून अगदीं निपटून पुसून गेलें आहे. एका राजकीय पक्षाच्या बाजूनें बोलायला जावें तर दुसऱ्या पक्षाचा चांगुलपणा मला अत्यंत तीव्रतेनें जाणवूं लागतो. वाङ्मयांतील एका मतप्रणालीचा पाठपुरावा करावा तर त्याहून भिन्न प्रणा-लीचा अवलंब करणारांनीं किती सुंदर साहित्य निर्माण केलें आहे तें माझें मन मला सांगूं लागतें. आपल्या प्रान्ताबद्दल, आपल्या देशाबद्दल अहंकारानें, अभिमानानें बोलायला जावें तर इतर प्रान्त, इतर देश आपापलीं हृद्य वैशिष्टयें, आपली विविध सौंदर्यें घेऊन माझ्यापुढें अहमहमिकेनें दाटी करून उभे राहतात. अन् मग त्यांतल्या कोणालाहि वाईट कां म्हणावें, त्याचा

उपहास कसा व कां करावा तेंच मला मुळीं समजत नाहीं. विशेषत: देशांच्या बाबतींत तर माझी अशी कुचंबणा फारच होते. मी भारतांत जन्मलें म्हणून मी भारताचा अभिमान बाळगावा हें योग्यच आहे. परंतु आपण कोठें जन्मावें, कोणत्या कुळांत, कोणत्या प्रांतात, कोणत्या देशांत आपली उत्पत्ती व्हावी ही गोष्ट आपल्या मतावर मुळींच अवलंबून नसते. तो केवळ एक अपघात असतो. केवळ एक योगायोग असतो. आणि अशा एका अपघातावर किंवा योगायोगावर सर्व जन्मभरचा आपला अभिनिवेश, आपला अहंभाव अवलंबून असावा हें मला कसेसेंच वाटतें.

मी भारतांत जन्मलें तशी आफ्रिकेंत जन्मलें असतें तर ? असा विचार माझ्या मनांत येतो आणि आफ्रिकेंतलीं घनदाट अरण्यें माझ्या डोळ्यांपुढें उभीं राहतात. तेथील वन्य पानाफुलांचे आणि हिंस्र पशूंचे वास एकांतएक मिळून माझ्या नाकांत घुसतात. तेथील रानटी लोकांच्या नृत्यांतली लय माझ्या रक्तांत भिनते आणि त्यांच्या रानटी गायनवादनाचे सूर माझ्यांत कुठें तरी खोल दडलेल्या अश्मयुगीन मानवाला जाग आणूं लागतात. आणि तेवढ्यापुरती मी आफ्रिकनच होऊन जातें. मी अमेरिकेंत जन्मलें असतें तर ? त्या कल्पनेसरशीं निसर्गांतील अनेक प्रतिकूल गोष्टींशीं सामना देऊन तेथें प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या आरंभीच्या वसाहतींतल्या स्त्रीपुरुषांचें शूर, समरशील, धाडसी रक्त माझ्या नसांतून खेळूं लागतें. एब् लिंकन, जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं प्राणपणानें स्फुरविलेला मूलभूत मानवी स्वातंत्र्याचा महामंत्र माझ्याहि ओठांवर स्फुरण पावतो. विस्तृत गवताळ मैदानें आणि कांच, पोलाद व सीमेंट यांच्या बनविलेल्या गगनचुंबी इमारती, गायींचे मोठमोठाले कळप आणि अत्याधुनिक विलासयुक्त वसतिस्थानें, ब्लू जीन्स आणि हॅम्बर्गर्स यांचा एकच मजेदार गोंधळ माझ्या मनांत उडून जातो. आणि मी अमेरिकनच आहें असें मला वाटूं लागतें. मीं अमेरिका अद्याप पाहिली नाहीं. पण तिचें स्मरण होतांच तिचें हें संमिश्र चित्र माझ्या मन:पटलावर तात्काळ उमटतें. कोणत्याहि देशाच्या बाबतींत माझी हीच अवस्था होते. काश्मीरांतील बागांनीं उधळलेलें गुलाली वैभव आणि कोंकणांतल्या ब्राह्मणांच्या घरांत मध्यरात्रीं जागवली जाणारी गौर, बाली बेटांतली चांदण्या रात्रीं रंगणारीं नृत्यें आणि हवाई बेटांतले रसरशीत अननस

नि केळीं, नाईलच्या प्रवाहावर तरंगणारा हजार नौकांचा ताफा व जपान-मधल्या कागदी घरांतलें कोंपऱ्यांतल्या कांचेच्या पुष्पपात्रांतलें एकच एक सुंदर फूल–सारें मला माझेंच वाटतें नि·तीहि मला सर्वांची वाटते. जातपंथ, स्थलकाल, देशपरदेश साऱ्यांच्या मधल्या व्यवच्छेदक सीमारेषा गळून पड-तात आणि माझा आत्मा पंख पसरून केव्हांहि आणि कुठेंहि जाऊं शकतो. कोणाशींहि समरस होऊं शकतो.

—पण हें असें होतें याचा अर्थ तें मला आवडतें असें मात्र नाहीं. हल्लीं मला माझ्या चेहऱ्यावर फटकन् येऊन बसणाऱ्या या इतर चेहऱ्यांचा कंटाळा येऊं लागला आहे. बरावाईट कसा कां असेना, पण माझाच चेहरा मला हवा आहे. आणि भव्य, क्षुद्र असें कां असेना, माझेंच व्यक्तिमत्त्व मला पाहिजे आहे. सर्वांशीं सर्वत्र समरस होणाऱ्या माझ्या या मनानें मला खास माझें म्हणायला कांहींच ठेवलेलें नाहीं. अन् हें असें होणें कांहीं बरें नाहीं. जें सर्वांचेंच आहे तें कधींच कोणाचें असत नाहीं. जे सर्वत्र संचार करतें तें कधीं एका जागीं स्थिर असूं शकत नाहीं. म्हणून असाहि संभव आहे कीं सर्वां-चाच अभिमान बाळगणाऱ्या मला खरोखरी खरा अभिमान कुणाचाच नसेल. सर्वांचेंच प्रेम बाळगणाऱ्या मला खरोखरीं कुणाचेंच प्रेम वाटत नसेल आणि सर्वच चेहरे माझ्या चेहऱ्यावर सफाईनें 'फिट' बसतात. याचा अर्थ मला माझा स्वतःचा असा चेहराच कदाचित् नसेल. कारण अखेर सर्व गोष्टी सापेक्ष आहेत. स्वार्थाशिवाय परमार्थाला महत्त्व नाहीं. 'आपलें' या शब्दाचा खरा अर्थ प्रथम कळल्याखेरीज 'दुसऱ्याचें' याला अर्थ येऊं शकत नाहीं. मला माझीं दोन पावलें माझ्या संकुचित, चिमुकल्या जगांत प्रथम ठामपणें रोवल्याशिवाय पंख पसरून सर्व विश्वांत मुळीं भरारीच मारतां येणार नाहीं.

म्हणून माझ्या व्यक्तिनिरपेक्ष औदार्याचें मला हल्लीं भय वाटूं लागलें आहे. सर्वांशीं समरस होऊं शकणाऱ्या माझ्या मनाचा मला तिटकारा येऊं लागला आहे आणि वादविवादांत दुसऱ्यांचें समर्थन ज्यायोगें होईल असे मुद्दे मला सुचवावेत ही गोष्ट मला अभिमानाची न वाटतां शरमेची वाटते. बरें-वाईट कसे कां असेनांत पण माझेच आग्रह, माझेच अभिनिवेश, माझाच संकु-चितपणा, माझाच स्वार्थ मला आधीं हवा आहे. मग इतरांशीं मला समरस

होतां आलें तर चालेल. पण हा स्वार्थावांचून परमार्थ, ही व्यक्तित्वशून्य वसुधैवकुटुंबी वृत्ती, हें कोनेकोपरें नसलेलें, गुळगुळीत, आकारहीन, रंगरूप-हीन अस्तित्व याचा मला आतां वीट आला आहे.

—— होय. वसुधैवकुटुंबकम् वृत्तीचें लोक साधुपुरुष समजले जातात हें मला माहीत आहे. 'हें विश्वचि माझें घर ऐशी मति जयाची स्थिर' ही ज्ञानेश्वरांची ओवीहि माझ्या कानावरून गेली आहे. आणि 'आत्मवत् सर्व-भूतेषु यः पश्यति स पंडितः' हें गीतावाचनहि मला अपरिचित आहे असें नाहीं. पण या साधुपुरुषांशीं स्पर्धा करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. सर्व विश्वाशीं समरस होणें आणि विश्व हेंच आपलें घर मानणें ही गोष्ट आपल्या शरीराची खोळ टाकून जगांत हिंडण्याइतकी भयंकर आहे. आपला चेहरा काढून ठेवून सर्वत्र संचार करण्याइतकी अतर्क्य आणि अनाकलनीय आहे. आणि या दोन गोष्टी जितक्या असंभनीय आहेत तितकीच खरी विश्वकुटुंबी वृत्तीहि अशक्यप्राय आहे. जसा पांढरा रंग म्हणजे केवळ काळचा रंगाचा अभाव नव्हे तद्वतच स्वार्थाचा लोप म्हणजे वसुधैवकुटुंबी वृत्ति असेंहि नव्हे. उलट खरी वसुधैवकुटुंबी वृत्ति ती कीं जी स्वार्थावर अधिष्ठीत आहे. माझें मला कां प्रिय वाटतें हें ज्याला कळेल तोच दुसऱ्यांचे हर्षखेद, अभिनिवेश अभिमान जाणूं शकेल व त्याच्याशीं समरस होऊं शकेल. त्याच्याशीं सहिष्णुतेनें वागूं शकेल. पण त्यासाठीं आपले हर्षखेद, आपले अहंकार, आपले अभि-मान त्यानें प्रथम नीट जोपासले पाहिजेत.

म्हणूनच, यापुढें कोणाशीं वाद घालतांना त्याचे समर्थन करणारे मुद्दे मला सुचले तरी ते त्याला सांगावयाचा भरीस मी पडणार नाहीं. उलट माझी बाजू कितीहि चुकीची असली तरी प्राणपणानें तिचेंच समर्थन करीत राहाणार ! मग कोणी मला कांहीं म्हणो !

* * *

## १७ : : चाळिशीचा चेहरा

अमेरिकेचा एके काळचा अध्यक्ष अब्राहम लिंकन याच्याबद्दल एक मजेदार आख्यायिका सांगतात. लिंकनकडे एकदां एक माणूस नोकरी मागायला आला. या माणसाचें वय जवळ जवळ चाळीस वर्षांचें होतें. लिंकननें त्या माणसाला नोकरी देण्याचें नाकारलें. तो माणूस खट्टू होऊन तेथून निघून गेल्यावर लिंकनजवळ उभ्या असलेल्या लिंकनच्या मित्रानें त्याला विचारलें, ' ही जागा तर रिकामीच होती. मग त्या माणसाला ती तुम्ही कां बरें दिली नाहीं ?'

' खरं सांगू का ? मला त्या माणसाचा चेहरा आवडला नाहीं ! ' लिंकन उत्तरला.

' वा ! हें खूपच कारण आहे बुवा ! लिंकनचा मित्र चकित होऊन म्हणाला, ' आपल्या चेहऱ्याबद्दल माणूस थोडाच जबाबदार असूं शकतो ? '

' बाळपणीं नसेल कदाचित् '. लिंकन झटकन् म्हणाला, ' पण वयाची चाळीस वर्षे उलटल्यानंतर माणसाच्या चेहऱ्यावर जें स्वरूप येतें त्याबद्दल त्याचा तो जरूर जबाबदार असतो ! '

अब्राहम लिंकननें केलेलें हें विधान सकृद्दर्शनीं अपणाला विचित्र वाटतें, पण जरासा खोल विचार केला तर लिंकननें जें म्हटलें आहे त्यांत बरेंच तथ्य आहे असें आपणांस दिसून येईल. माणसाचा रंग, त्याच्या नाका-

डोळ्यांची ठेवण, त्याच्या जिवणीचें वळण, हें सारें जन्मतःच त्याला मिळालेलें असतें व त्यांत बदल करणें त्याच्या हातीं नसतें. पण माणसाचा चेहरा म्हणजे फक्त रंग, जिवणी, नाक, डोळे येवढेंच असतें का? नाहीं चेहऱ्यामध्यें यापेक्षांहि अधिक असें कांहींतरी असतें व हें 'कांहींतरी' हा माणसाच्या चेहऱ्याचा व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग असतो. नोकरी मागायला आलेल्या माणसाचा चेहरा आवडला नाहीं, असें जेव्हां लिंकननें म्हटलें, त्यावेळीं त्या माणसाच्या नाकडोळ्यांना उद्देशून तें विधान त्यानें खासच केलें नव्हतें. चेहऱ्यांतलें हें जें विशिष्ट 'कांहींतरी' असतें तेंच त्यावेळीं अभिप्रेत होतें. आणि प्रौढपणीं माणसाच्या चेहऱ्याबद्दल त्याचा तोच जबाबदार असतो, असें जें लिंकननें विधान केलें त्या विधानांतहि त्याला हेंच सूचित करावयाचें होतें.

माणसाचें वय जसजसें वाढत जातें. जगाचे बरेबाईट अनुभव जसजसे त्याला येत जातात, त्याची मानसिक, बौद्धिक, भावनात्मक वाढ जसजशी होते, तसतसा त्याच्या चर्येत विशिष्ट बद्दल होत जातो. नव्हे, तसा तो व्हावा हेंच सयुक्तिक असतें. माणसाच्या मुद्रेवर त्याच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा स्पष्ट ठसा उमटायला हवा. असा ठसा जर उमटत नसेल तर त्या प्रणाणांत त्याची वाढ अपुरी राहिली आहे असें म्हणावयाला कांहींहि हरकत नाहीं. काळाचीं पावलें आपल्या चर्येवर उमटायलाच हवींत. काळाशीं कोणी झगडूं शकत नाहीं. त्याची गति कोणी रोधूं शकत नाहीं. तेव्हां मग जाणाऱ्या यौवनाला आनंदानें निरोप देणें आणि येणाऱ्या प्रौढत्वाचें तितक्याच आनंदानें स्वागत करणें, ही एकच गोष्ट आपल्या हातीं राहते. हें सारें आपण केलें पाहिजे आणि तेंहि नाखुषीनें नव्हे, तर खुषीनें केलें पाहिजे.

आपल्याभोंवतीं असंख्य माणसें वावरत असतात. या असंख्य माणसांचे असंख्य चेहरे आपणाला दिसत असतात. या चेहऱ्यांतले कांहीं चेहरे सुख-दुःखांच्या अनुभूतींनीं समृद्ध झालेले दिसतात. गेलेल्या काळानें आपलीं चिन्हें या चेहऱ्यांवर उमटवून ठेवलेलीं असतात. या काळांचे आलेख डोळ्यांत आणि चेहऱ्यावरील लहानमोठ्या सुरकुत्यांत दिसून येतात. जे सौंदर्यात व ताजेपणांत कमी झालेलें असेल तें अनुभवाच्या संपन्नतेंत भरून निघालेलें असतें. या उलट कांहीं माणसांचें चेहरे मख्ख आणि रिकामे ( Vacant )

दिसतात. गेलेल्या काळाचा, घडलेल्या घटनांचा, भोगलेल्या सुखदु:खांचा कांहींहि ठसा तेथें उमटलेलाच नसतो. असे चेहरे. कौतुकापेक्षां सहानुभूतीलाच अधिक पात्र असतात, असें मला वाटतें.

काळाबरोबर बदलण्याचें कांहीं माणसांना भय वाटतें. आणि काळाबरोबर आपण मुळींच बदललों नाहीं. ह्या गोष्टीची ते प्रौढी मिरवितात. कांहीं स्त्रियांना आपला चेहरा सतत बालिश रहावा असें वाटतें. पण बालिश चेहरा हा बालिकेच्या ठायींच खुलून दिसेल. पस्तिस वर्षांच्या बाईला पंधरा वर्षांचा (?) चेहरा विसंगत दिसेल ही साधी गोष्ट त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. जगांत जर अत्यंत हास्यस्पद गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे बाल–चेहऱ्याची (Baby faced) प्रौढ स्त्री ही होय, असें मला वाटतें. आपलें तारुण्य चेहऱ्याच्या बालिशपणावर अवलंबून असत नाहीं, तर मनाच्या बालसुलभ वृत्तीवर तें अवलंबून असतें. यौवन ही दुर्मिळ आणि सुंदर वस्तु आहे. ते यौवन जास्तींत जास्त टिकवावेसें वाटणें हा मानवी मनाचा सहज धर्म आहे. आणि तें टिकविण्याची त्यानें खटपट करावी हेंहि अत्यंत स्वाभाविक आहे. पण हें यौवन टिकविण्याचा मार्ग चेहरा सतत बालकासारखा राखण्याचा प्रयत्न करणें हा मात्र खास नाहीं. जीवनाबद्दल ताजा, प्रसन्न दृष्टिकोन राखणें, मनाचें कुतूहल व जिज्ञासा सतत टिकविणें, नवनव्या विचारांचें आणि कल्पनांचें स्वागत करण्याची तयारी ठेवणें, हाच मनाचें व त्याबरोबर शरीराचेंहि यौवन राखण्याचा खरा उपाय आहे. आपण जसजसे प्रौढ होत जातों, तसतसें आपलें मन कोंझें, संकुचित आणि कडक होत जाण्याचा संभव असतो. हा कोंझेपणा व संकुचितपणा ज्यांच्या वृत्तीत आलेला आहे, त्यांचे चेहेरे ताजे आणि टवटवीत दिसले, तरी तीं माणसें वृद्धच झालीं आहेत असें म्हणायला हवें. त्यांची मानसिक वाढ खुरटलेली असते. ही वाढ खुरटूं न देणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. प्रौढपणाचें माणसांना इतकें भय का वाटावें हें मला कळत नाहीं. सौंदर्य कोवळेपणातच असतें असें थोडेंच आहे. प्रौढपणालाहि त्याचें असें एक वेगळें सौंदर्य आहेच कीं, षोडशवर्षीय बालिकेच्या रूपांत आणि हालचालींत जशी आकर्षकता असते, तशीच चारपांच मुलें झालेल्या आणि अर्धाअधिक संसार केलेल्या पुरन्ध्रीच्या डौलदार, संथ गतींतहि एक विशिष्ट तऱ्हेची मोहकता असते.

स्त्री–सौंदर्याच्या विविध कला असतात. आणि वेगवेगळ्या वयोमानाबरोबर त्या सौंदर्याचे भिन्न भिन्न अविष्कार प्रकट होत जातात. इतकेंच नव्हें तर, कोणाला हे विधान चमत्कारिक वाटेल कदाचित, पण वार्धक्याला देखील त्याचें असें एक विशिष्ट सौंदर्य असतें. सौंदर्याच्या या भिन्न भिन्न प्रकारांची ओळख पटण्याइतकी आपली रसिकता तीव्र किंवा सूक्ष्म नसते, आणि म्हणूनच सारें सौंदर्य कोवळ्या चेहऱ्यांतच सांठलेलें आहे असें आपल्याला वाटतें. बालिश चेहऱ्यासाठीं धडपडणाऱ्या स्त्रियांची धडपड या वेड्या समजुतींतूनच उद्भवलेली असते.

बदललेल्या काळाबरोबर आपल्या चेहऱ्यांत जसा बदल होत जायला हवा तसाच आपल्या मनांतहि तो व्हायला हवा 'दहा वर्षांपूर्वीं मी जशी होतें, तशीच मी आजहि आहें, असें जर मला कोणीं म्हटलें, तर मला तें 'कॉम्प्लिमेन्ट' वाटणार नाहीं. उलट तें अपमानकारक विधान वाटेल,' असें एका प्रसिद्ध चित्रतारकेनें उद्गार काढले आहेत, त्यांचें रहस्य हेंच आहे. काळाबरोबर माणसाचें मन बदलत जायलाच हवें. मात्र येथें 'बदल' या शब्दाचा अर्थ नीट समजावून घेणें जरूर आहे. बदल म्हणजे थिल्लरपणा नव्हे. कपडे बदलतों त्याप्रमाणें मतें आणि आवडीनिवडी बदलणें नव्हे. बदल याचा अर्थ उत्क्रान्ति; बदल याचा अर्थ विकास; बदल याचा अर्थ व्यक्तिमत्त्वाला जास्तींत जास्त पडणारे पैलू. माणसाच्या मूलभूत मनःप्रवृत्ति, त्याच्या निष्ठा, त्याच्या प्रेमाचीं, आदराचीं व अभिमानाचीं स्थानें हीं बदलत नाहींत. बदलतां कामाहि नयेत. त्याचा मूलभूत स्वभाव, त्याचे सद्गुण आणि त्याचे दुर्गुण हेहि फारसे बदलत नाहींत. पण मग कालाबरोबर माणसानें बदलायचें म्हणजे काय? काळाबरोबर बदलायचें याचा अर्थ स्वतःची अधिकाधिक ओळख पटवून घ्यायची आणि आपल्या वांट्याला जें बरेंवाईट व्यक्तिमत्व आलें असेल तें अधिकाधिक संपन्न व समृद्ध करून स्वतःच्या व समाजाच्या हितासाठीं तें कारणी लावण्याचा प्रयत्न करावयाचा. केवळ बदलासाठीं बदल करणें, लोकांना धक्के देण्यासाठीं आज एक तर उद्यां भलतेंच, असें कांहीं करणें म्हणजे बदल नव्हे. बदल म्हणजे हळूहळू पण निश्चित उत्क्रांत होत जाणें. विकसित होत जाणें!

आपल्या मनांत. आपल्या व्यक्तिमत्वांत असे बदल करीत जाणें हा एक अत्यंत रोमांचकारी अनुभव आहे. कित्येकदां हा अनुभव दुःखकारकहि असूं शकेल. कांहीं जुन्या कल्पना सोडून नव्या कल्पना घेतांना कधीं कधीं मरणप्राय दुःख होतें. कांहीं नवे बदल पत्करतांना अत्यंत संकोच वाटतो; पण हें दुःख किंवा हा संकोच पत्करूनहि व्यक्तिमत्व बदलणें अवश्य असतें. माधव ज्यूलियनांनीं आपल्या एका कवितेंत म्हटलें आहे, "कायदा पाळा गतीचा। काळ मार्गें लागला। थांबला तो संपला॥ धांवत्याला शक्ति येई आणि रस्ता सांपडे" हा काळाचा कायदा मोठा कठोर असतो. बदलत्या काळाबरोबर बदलण्याचें जे नाकारतात ते काळाच्या क्रूर पावलाखालीं जागच्याजागीं चिरडून नष्ट होतात. जगांत निभाव लागायला हवा असेल तर बदलत्या काळाबरोबर बदलणें हा एकच मार्ग आपल्यापुढें आहे. काळाबरोबर बदललें पाहिजे आणि या बदलाचीं चिन्हें जशीं मनांत तशीं मुद्रेवरहि अभिमानानें बाळगलीं पाहिजेत. समृद्ध व्यक्तिमत्वाची मुद्राहि समृद्ध आणि संपन्न दिसते. काळाशीं झगडलेल्या एकाद्या निरक्षर अडाणी वृद्धापासून तों महात्मा गांधी, जॉर्ज बर्नार्ड शॉ किंवा अण्णासाहेब कर्वे यांच्यासारख्या लोकप्रसिद्ध विभूतीपर्यंत सर्वांचे चेहरे पहावेत, किती संपन्न समृद्ध आणि सुंदर दिसतात ते !

ही संपन्नता आणि समृद्धता नोकरी मागण्यासाठीं आलेल्या त्या उमेदवाराच्या चेहऱ्यांत अब्राहम लिंकनला दिसून आली नाहीं. अन् म्हणूनच त्यानें त्याला नोकरी द्यायचें नाकारलें !

* * *

## १८ : : खेळ चालूं राहिलाच पाहिजे

संस्कृतमध्यें आयुष्याला ‘जीवन’ असा प्रतिशब्द आहे. आयुष्याला उद्देशून जीवन हा शब्द ज्यानें प्रथम वापरला तो माणूस मोठा रसिक आणि कल्पक असला पाहिजे यांत शंका नाहीं. पाण्यालाहि संस्कृतमध्यें ‘जीवन’ असेंच म्हणतात. मानवी आयुष्य हें पाण्यासारखेंच असतें. तसेंच अखंड वाढणारें, तसेंच गतिमान्, तसेंच पात्रानुरुप आकार बदलणारें. आपण आपल्या सोयीनुसार आयुष्याचें कालखंड पाडीत असतों. एका खंडाला आपण शैशव म्हणतों. एकाला आपण यौवन हें नांव देतों. तर एकाला आपण वार्धक्य या नावानें संबोधतों. पण जीवनाचे हे जे तुकडे कल्पिलेले असतात ते केवळ आपल्या सोयीसाठीं, प्रत्यक्ष जीवन असें तुकड्या तुकड्यांचें बनत नाहीं. इंद्रधनुष्याचे निरनिराळे रंग जसे एकमेकांत पार मिसळून गेलेले असतात त्याप्रमाणें मानवी जीविताच्या विविध अवस्था एकमेकांत गुरफटलेल्या असतात. शैशवावस्था संपण्यापूर्वींच यौवनच्या गुलाबी छटा प्रकटत असतात, आणि यौवनाचा ऐन बहर असतांनाच वार्धक्याची काळी छाया पडूं लागलेली असते. तें सलग असतें. आजचा दिवस घेतला तर त्याच्या मागेंपुढें ‘काल’ आणि ‘उद्यां’ हे दोघे भालदार चोपदारासारखें खडे राहिलेले असतात. चालू क्षण घेतला तर तो मागच्या क्षणांतून उमललेला असतो आणि पुढच्य क्षणांत विलीन होणार असतो. तात्पर्य, जीवनाला उद्देशून बोलतांना भूत-

काळ, भविष्यकाळ, यौवन, वार्धक्य, काल आणि आज, तो क्षण अन् क्षण असे त्याचे तुकडे पाडण्यांत कांहींच अर्थ नाहीं. जीवन हें एकत्र असतें.

अखंडता हें जसें जीवनाचें एक प्रमुख वैशिष्ट्य आहे त्याप्रमाणेंच सतत चालू रहाणें हें एक त्याचें दुसरें वैशिष्ट्य आहे. बादशहानें एकदां बिरबलला प्रश्न विचारला होता म्हणे– "क्षणभरहि न थांबतां रात्रंदिवस अखंड चालू राहणारी गोष्ट कोणती ?" त्यावर बिरबलनें उत्तर दिलें होतें कीं, 'अशी गोष्ट म्हणजे सावकाराचें व्याज' मला वाटते, बादशहाच्या प्रश्नाचा बिरबलनें 'मानवीजीवन' असें उत्तर दिलें असतें तरी तें तितकेंच समर्पक ठरलें असतें. मानवी आयुष्य सतत चालू राहतें. उन्ह असो, पाऊस असो, सुख असो, दुःख असो, दारिद्रय असो, ऐश्वर्य असो, यौवन असो कीं वार्धक्य असो जीवनाची गति कधीं थांबत नाहीं, काळ कोणासाठीं थांबत नाहीं असे आपण म्हणतों त्याचा अर्थ हाच.

आणि काळ कुणासाठीं थांबत नाहीं हेंच एकापरीनें बरें आहे. तसा तो थांबत असता तर माणसानें आपल्या सुखभोगाची मर्यादाहि कमालीची वाढवली असती आणि आपल्या दुःखांचेहि त्यानें फार चोचले केले असते. आणि परिस्थिति अशी आहे, कीं सुख असलें तरी त्याच्या उपभोगाची सीमा ठरलेली असते आणि दुःख असलें तरी तेंहि केव्हां ना केव्हां संपणारें असतें. म्हणून सुख भोगतांना माणूस म्हणतो, "हे सुखाचे दिवस हां हां म्हणतां संपणार आहेत बरें !" आणि दुःखानें पिडलेला असतांनाहि तो स्वतःला दिलासा देतो, "हेहि दिवस आज ना उद्यां निघून जातील. ते काय कायमचे राहणार आहेत थोडेच ?" सुखक्षणीं माणसांस गंभीर बनविणारी आणि दुःखक्षणीं त्याची निराशा नाहींशीं करून भावी काळाकडे त्याला आशेनें पहायला लावणारी अशी ही जीवनगति म्हणजे एक अद्‌भुत शक्ति आहे यांत शंका नाहीं.

जीवनाची अखंडिता आणि त्याची गतिमानता या दोन्ही गोष्टी ध्यानांत धरून आपण जगायला शिकलें पाहिजे. जीवित म्हणजे असंख्य क्षणांचा गुंफलेला एक हार आहे. यांतला कोणताहि एकच क्षण वेगळा करून तो आपण स्वतंत्रतः उपभोगूं असें माणसानें म्हणतां कामा नये. तसें त्याला करतांच येणार नाहीं. गेल्या क्षणीं आपण जें करीत असूं त्यांतून चालू क्षण

निर्माण होत असतो आणि चालू क्षणीं आपण ज करीत असूं त्यावर पुढल्या क्षणाचें भवितव्य अवलंबून असतें. मला पुष्कळदां असें वाटतें, कीं जीवनाच्या धाग्यातून एका क्षणांचा मणी सुटा करून घ्यावा आणि त्या एका क्षणाचाच मनसोक्त उपभोग घ्यावा. पण असें करतां येत नाहीं. प्रत्येक क्षण मागच्या क्षणाला जबाबदार असतो. जीवन जगतांना या गोष्टीची आपण जाणीव ठेवली तर मला वाटते आपली पुष्कळशीं दुःखें, पुष्कळसा पस्तावा कमी होईल.

कित्येक माणसें जीवनाबरोबर सारखीं भांडत असतात. मला आयुष्यांत अमुक गोष्ट अनुकूल असती तर मी असें केलें असतें. माझ्याजवळ अमुक पैसा असता तर मी अमकें कर्तृत्व गाजविलें असतें. मला अमुक संधि मिळाली असती तर मी अमूक अमूक गोष्टी करून दाखविल्या असत्या असें म्हणणारीं माणसें आपल्याला कितीदां तरी पहायला मिळतात. जीवनाबरोबर भांडणारीं माणसें ती हींच. अशा माणसांची मला करुणा वाटते. जीवित आहे तसा त्याचा स्वीकार करण्याची या लोकांची तयारी नसते. आणि मग हेंच नाहीं, तेंच नाहीं असें त्यांचें रडगाणें अखंड चालू राहतें. या उलट कांहीं माणसें अशीं असतात, कीं जीवनांतील अडचणींचा, संकटांचा, प्रतिकूल परिस्थितीचा ती आनंदानें स्वीकार करतात. इतकेंच नव्हे तर कधीं कधीं त्या अडचणींनाच ते अनकूल गोष्टींचें स्वरूप देतात. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ एडिसन हा बहिरा होता. पण या बहिरेपणाचा त्यानें मन अेकाग्र करण्याकडे उपयोग करून घेतला. जीवनाचा स्वीकार करणें असें जें मीं म्हटलें तें यालाच उद्देशून 'जीवना विरुद्ध' जगण्या ऐवजीं 'जीवनाबरोबर' जगायला माणसानें शिकलें पाहिजे. जीवित आहे हें असें आहे. एका विशिष्ट मर्यादेपर्यन्त मी तें बदलूं शकेल, पण त्याच्यापुढें तें मला बदलतां यायचें नाहीं. ठीक आहे. तर मग त्या मर्यादेपुढें जें जीवन असेल त्याचा मी स्वीकार करीन. आणि जीवनाच्या हातांत हात घालून आनंदानें मी पुढें जाईन. असें माणसानें म्हटलें पाहिजे. जीवनाकडे बघण्याची ही दृष्टि माणसानें एकदां पत्करली तर एरव्ही जें रुक्ष, निरर्थक आणि उजाड वाटत असतें त्यांनाहि सुखाचे आणि आनंदाचे अनपेक्षित निर्झर कितीदांतरी त्याला आढळून येतात.

लेस्ली कॅरन नांवाची एक नर्तकी आहे. 'बॅले' पद्धतीच्या नृत्यांत

तिनें असामान्य प्राविण्य मिळविलें आहे. आणि आतां तर चित्रसृष्टींतहि लेस्लीला पुष्कळ यश लाभलें आहे. तिचें वय अजून पंचविशीच्या आंतच आहे. इतक्या अल्पवयांत इतकें यश व इतकी कीर्ति लेस्लीला कशी मिळूं शकली ? त्याबाबत तिनें स्वतःच एके ठिकाणीं आपली कैफियत दिली आहे. लेस्ली दिसायला फारशी चांगली नाहीं. तिचे दांत खूप मोठे आहेत. या तिच्या वैगुण्याबद्दल लहानपणीं तिची फार कुचेष्टा होई. लेस्ली म्हणते, 'माझ्या कुरुपतेमुळें माझी वृत्ति एकलकोंडी बनली. मी चार माणसांत जायचें टाळूं लागलें स्वतःबद्दल पराकाष्टेचा हीनगंड मला वाटूं लागला. माझी ही वृत्ति वाढत गेली तर माझ्या स्वभावांत विकृति निर्माण होईल असें भय माझ्या आईला वाटूं लागलें आणि तिनें मला नृत्याच्या वर्गांत घातलें. मी नाच शिकूं लागलें तसतसें माझ्या ध्यानांत येऊं लागलें, कीं स्त्रीचें सौंदर्य म्हणजे केवळ तिच्या मुखाचें सौदर्य नाहीं. भरदार, रेखीव, चपळ बांधा हेंहि तिचें सौदर्य होऊं शकतें. लवलवणारे अवयव, चापल्ययुक्त डौलदार हावभाव, सुंदर मुखाइतकेंच स्त्रीला शोभा देतात. आणि हें देहसौदर्य नृत्यामुळें संपादन करणें कोणालाहि शक्य आहे. ही जाणीव मला झाली. तेव्हां मला खूप आनंद झाला. मी इर्ष्येनें नृत्य शिकूं लागलें. जसजशी मी नृत्यकलेंत प्रवीण होत चाललें तसतसें इतर कलांचेहि मला आकर्षण वाटूं लागलें. उत्तमोत्तम शिल्पकृति बघण्याचा मला नाद लागला. अभिजात कलावंतांनीं बसविलेले नाट्यप्रयोग मी पाहूं लागलें. नामवंत लेखकांचे ग्रंथ मी वाचूं लागलें आणि प्रख्यात चित्रकारांचीं चित्रें पाहून त्यांचें मर्म जाणून घेण्याचा मी प्रयत्न करूं लागलें. या साऱ्या गोष्टी करीत असतांना माझ्या कुरुपतेबद्दलचा माझा गण्ड केव्हां आणि कसा नाहींसा झाला हेंहि मला समजलें नाहीं. विविध कलांच्या रूपानें सौंदर्याची आणि आनंदाची एक शाश्वत सृष्टि माझ्यापुढें खुली झाली होती. या सृष्टींत मी मनमुराद विहार करीत होतें. हा विहार करतांना मला कळून आलें, कीं सुंदर मुखाइतकीच सुसंस्कृत, रसिक, अभिजात वृत्ति स्त्रीला सौंदर्य देऊं शकतें."

लेस्ली कॅरनचें हें आत्मनिवेदन म्हणजे आहे त्या परिस्थितींत धैर्यानें, आशावादीपणानें आणि चिकाटीनें स्वतःचा विकास करून घेणाऱ्या एका गुणी स्त्रीची उद्बोधक कहाणी आहे. जीवनाबरोबर जगायचें तें हें असें !

लेस्ली कॅरनवरून आठवण झाली. अभिनयाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या कलावन्तांचें एक मोठें सुंदर वाक्य प्रसिद्ध आहे. The Show must go on "खेळ चालू राहिलाच पाहिजे." हें तें वाक्य. नाटकाचा खेळ कधीं बंद पडतां कामा नये. अमुक दिवशीं, अमुक वेळीं तुमचें नाटक किंवा गाणें किंवा नृत्य व्हायचें असलें तर त्यावेळीं तुमच्या खाजगी जीवनांत वाटेल तो उत्पात झालेला असो, ठराविक घटकेला तुम्ही तुमच्या प्रेक्षकांपुढें उभें राहिलेंच पाहिजे आणि तुमची जी कला पाहण्यासाठीं ते तुमच्यापुढें जमलेले असतात त्याकलेचें दर्शन तुम्हीं त्यांना घडविलेंच पाहिजे. The Show must go on खेळ झालाच पाहिजे !

अभिनयाच्या क्षेत्रांतील लोकांपुरतेंच कशाला, मला वाटतें आपणां सर्वांनाच हें वाक्य उपयुक्त आहे. जीवन जगतांना ध्येयवाक्य म्हणून कोणतें वचन माणसानें पुढें ठेवलें पाहिजे, असें जर कुणी मला विचारलें तर मी हेंच वाक्य त्या व्यक्तीला सांगेन. या जगांत पुरुषाला आणि प्रत्येक स्त्रीला त्याचें किंवा तिचें असें कांहीं ठराविक काम वांटून दिलेलें आहे. हें काम करतांना आपलीं खाजगीं सुखदुःखें, विचार विकार, अडचणी, संकटें कांहींहि त्यांनीं आड येऊ देतां कामा नये. अडचणी येतात त्या यायच्याच. संकटें येतात तींहि यायचींच. पण त्या अडचणींना किंवा त्या संकटांना आपल्या ठरीव कर्तव्याआड आपण कधीहि येऊं देतां कामा नये.

भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं ज्या स्थितप्रज्ञ वृत्तीचें वर्णन केलें आहे तिचें स्वरूपहि मला वाटतें असेंच कांहींसें असेल. स्थितप्रज्ञ कोणाला म्हणावयाचें ? तर जो बाह्य सुखदु:खांमुळें आपली आन्तरिक शांति ढळूं देत नाहीं त्याला. पण त्याचा अर्थ बाह्य सुखदुःखांचा त्या माणसाच्या मनावर कांहीं परिणाम होत नसतो असा मात्र नाहीं. इतर सामान्य माणसांप्रमाणें स्थितप्रज्ञ माणसाच्या मनालाहि सुखदु:खांचीं आन्दोलनें मिळतच असतील. पण आपल्यासारख्या माणसांत आणि स्थितप्रज्ञांत फरक हा, कीं आपण येवढ्या तेवढ्या प्रतिकूल परिस्थितींतहि हातपाय गाळून बसतों आणि स्थितप्रज्ञ माणूस सुखाचा वा दु:खाचा कसलाहि प्रसंग जीवनांत आला तरी त्याचा तो आपल्या नियत कर्तव्यावर परिणाम होऊं देत नाहीं. लोकमान्य टिळकांची एक अशीच कथा सांगत नाहींत काय ? प्लेगच्या साथींत त्यांचा मुलगा-

मरण पावला. त्यावेळीं मुलाला स्मशानांत पोंचवून आल्यावर लगेच ते शांतपणें 'केसरी' चा लेख लिहायला बसले. पुत्रशोकाच्या दरियाचें एक घोंटांत आचमन घेऊन त्यांनीं जीवनांतली नित्यांचीं कर्तव्यें करायला प्रारंभ केला.

जीवनाच्या रंगभूमीवर आपल्या वाटयाला आलेल्या वेगवेगळया भूमिका पार पाडीत असतांना माणसानें एक गोष्ट ध्यानांत ठेवायला हवी. ती हीच, काय वाटेल तें झालें तरी खेळ चालू राहिला पाहिजे.

****

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम २६१६२ वि: निबंध
क्रमांक १२०६ नों: दि: ६।३।६०

## १९ : : असत्यपुराण

शेजारच्या विमलाबाई आपली नवी साडी नेसून ती मला दाखवायला जेव्हां आल्या तेव्हां माझी परिस्थिति मोठी चमत्कारिक झाली. सामान्यतः प्रत्येक स्त्रीचा आपल्या रूपाबद्दल गैरसमज असतो. ती स्वतःला ‘सुंदर’ च समजत असते. पण विमलाबाईंच्या बाबतींत हा गैरसमज अधिकच तीव्र आहे. स्वतःचा रंग, स्वतःचें रूप स्वतःचा ‘फॉर्म’ प्रत्येकच गोष्ट त्यांना विशेष चांगली वाटत असते. आणि मध्यम वय झालेलें असूनहि नटण्यामुरडण्याची त्यांची हौस एकाद्या षोडशीइतकी अजून ताजी अन् टवटवीत आहे. एवंगुणविशिष्ट विमलाबाई आपली नवी साडी नेसून ती मला दाखविण्यासाठीं आल्या आणि पूर्वीच्या ग्रंथांत म्हणत त्याप्रमाणें—मीं अगदीं धर्म—संकटांत पडलें. एकीकडे शेजारणीचें मन दुखविण्याचें पाप आणि दुसरीकडे स्वतःच्या मनाशीं प्रतारणा करण्याचें पाप अशा उभयविध पातकांच्या दरम्यान ‘ किं कुर्व किम कुर्वेति ’ अशी माझी अवस्था झाली.

विमलाबाई मजकडे आल्या होत्या त्या स्तुतीचा करभार उकळण्याकरतां, साडी आपणाला कशी शोभून दिसते याचें वर्णन माझ्या तोंडून ऐकण्याकरतां. पण खरें सांगायचें तर ती साडी त्यांना मुळींच खुलून दिसत नव्हती. विमलाबाईंचा वर्ण त्यांच्यामतें जरी गव्हाळ असला तरी खरें बोलायचें तर करवंदी आहे. त्या रंगाला साडीचा मंद गुलाबी रंग विशोभित दिसत

होता. साडीचे कांठपदर स्वतंत्रतः कितीहि आकर्षक असले तरी विमलाबाईंच्या स्थूल देहावर त्यांची शोभा विझून गेल्यासारखी वाटत होती. सर्वांत मौज अशी, कीं साडी दिसायला कितीहि चांगली दिसत असली तरी तिचा वाण तकलादू होता. ही साडी फार दिवस टिकेल वा धुण्याचा ताण तिला सोसेल असें मला वाटेना. तात्पर्य, साडी खरीदतांना व्यवहारदृष्टि आणि सौंदर्यदृष्टि हे दोन्ही डोळे झांकूनच विमलाबाईंनीं कार्यभाग पार पाडला होता हें अगदीं उघड दिसत होतें.

वेगवेगळ्या विचारांच्या भोवऱ्यांत माझें मन असें फिरत असतांना विमलाबाई मला हलवीत म्हणाल्या, " अहो, कांहीं तरी बोला ना ! साडी पाहून अगदीं दिपून गेल्यासारख्या दिसतां ! सांगा बरें कशी काय आहे साडी ? बाकी तुम्ही बोलला नाहीं तरी तुमच्या तोंडावरून कळलंच मला. झकास आहे कीं नाहीं आमची खरेदी ! "

माझें मौन माझ्या अवघडलेपणांतून निर्माण झालें होतें. विमलाबाईंना मात्र तें मौन दिपून गेल्याचें चिन्ह वाटलें ! मनुष्य स्वभावाची मला मोठी मौज वाटली. पण घडीनें घडी जात होती. आणि विमलाबाईंना कांहींतरी उत्तर देऊन त्यांची बोळवण केल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. म्हणून मी त्यांच्याकडे वळून चटकन् त्यांना म्हणाले, " ओळखलंत खरंच बाई ! मी दिपूनच गेलें आहे." आणि मग एक घटकाभर स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीचें मुस्कट पार दाबून टाकून विमलाबाईंच्या अचूक सौंदर्यदृष्टीची, त्यांच्या रसिकतेची त्यांच्या व्यवहार चातुर्याची आणि कपड्यांची योग्य पारख करणाऱ्या त्यांच्या जन्मजात हुषारीची मी भरपेट स्तुति केली. विमलाबाई खूष झाल्या. त्या माझ्या घरून गेल्या तेव्हां त्यांचा आनंद त्यांच्या डोळ्यांतून आणि गालांवरून नुसता निथळत होता जणूं कांहीं !

विमलाबाई गेल्या आणि माझें मन माझी निर्भत्सना करूं लागलें. मी खरें बोलायला पाहिजे होतें. मला जें वाटलें होतें तें मी अगदीं प्रामाणिकपणें विमलाबाईंना सांगायला पाहिजे होतें असें तें मला पुन्हां पुन्हां डिवचून सांगूं लागलें. त्या चोंबड्या आणि शिष्ट मनाची समजूत घालून त्याला गप्प बसवितांना माझ्या नाकीं नऊ आले.

——आणि मग, नेहमींप्रमाणें मनुष्यस्वभावांतल्या दुर्बलतेचा आणि विसंगतींचा मी विचार करूं लागलें. माणसांना सत्य केव्हांच नको असतें. म्हणतांना मात्र माणूस तुम्हांला म्हणत असतो, "हें पहा, मला तुमचें स्पष्ट मत हवंय. उगीच गुळमुळीतपणा नको." पण अशी माणसागणिक स्पष्ट मतें जर आपण देत सुटलों तर मला वाटतें, चौवीस तास संपायच्या आंत आपण आपल्या परिचयाच्या, स्नेहाच्या, नात्यांच्या एकूण एक माणसांशीं कायमचें वैर जोडून बसूं. 'बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहु मानिती लोक येणें तुम्हांला ' हा समर्थांचा उपदेश ऐकावयाला कितीहि गोड वाटत असला तरी तो प्रत्यक्षांत उतरविणें केवळ अव्यवहार्य नव्हे तर अशक्यहि आहे असेंच विचारांतीं कोणालाही समजून येईल. यासाठीं रोजच्या व्यवहारांत तरी पुष्कळसें खोटें बोलणें हेंच माणसाचें कर्तव्य आहे.

इंग्रजीमध्यें White lies असा एक शब्दप्रचार आहे. 'शुभ्र असत्यें' असें त्याचें मराठी रूपांतर करतां येईल. ज्या खोटें बोलण्यांत कोणाचें कांहीं नुकसान होत नाहीं झाला तर फायदाच होतो अशा असत्यवादाला 'शुभ्र असत्य, म्हणावयाला हरकत नव्हतीच. विमलाबाईंशीं मी जी प्रतारणा केली तिचीच गोष्ट पहा. त्या साडी घेऊन चुकल्या होत्या ! ( किंवा त्यांनीं चुकून साडी घेतली होती. कसेंहि म्हणा ! ) आतां त्या साडीला वाईट म्हणणें किंवा तिच्याबद्दलचें माझें खरेंखुरें मत त्यांना सांगणें या गोष्टीचा तादृशः फायदा काय होता ? तसें मत सांगून मी विमलाबाईंची कायमची नाराजी मात्र ओढवून घेतली असती. त्यांच्या माझ्या स्नेहसंबंधांतला गोडवा जाऊन तेथें कडवटपणा निर्माण झाला असता, आणि जिव्हाळ्याच्या एका स्थळाला मी कायमची मुकलें असतें. हें सारें टाळण्याचा मार्ग एकच होता. तो म्हणजे खोटें बोलणें. आणि म्हणूनच मी विमलाबाईंच्या साडीबद्दल आणि त्यांच्या निवडीबद्दल भले उद्गार काढले होते.

असें खोटें बोलण्याचा प्रसंग दिवसांतून दहा वेळां तरी माणसावर येतो. याचें एक कारण मोठें मजेदार आहे. माणूस हा स्वतः संतुष्ट मुळींच नसतो. आपली अमूक एक गोष्ट वाईट आहे, हें त्याला मनांतून खरोखरी ठाऊक असतें. आणि म्हणूनच ती तशी नाहीं हें आश्वासन त्याला दुसऱ्या कुणीतरी द्यायला हवें असतें. विमलाबाईंचा स्वतःच्या रूपाबद्दल गैरसमज आहे असें

जें मी म्हटलें तें कांहीं सर्वांशानें खरें नव्हे. आपलें रूप खरोखरी सामान्य आहे हें विमलाबाईंना मनांतल्या मनांत खोल खोल कुठेंतरी नक्कीच ठाऊक असलें पाहिजे. पण ती जाणीव त्यांना दुःसह होत असते. त्या सत्याच्या डोळ्याला डोळा भिडवून बघण्याची त्यांच्या ठिकाणीं ताकद नसते. आणि माझ्या तोंडून स्वतःच्या रूपाची, गुणांची स्तुति करवून घेतात. त्यांना माझ्याकडून हवें असतें, तें कौतुक नव्हे तर सांत्वन हवें असतें. आणि मी जेव्हां त्यांची स्तुति करतें, तेव्हां खरोखरी आंतल्या आंत असंतुष्ट आणि असुखी असलेल्या त्यांच्या मनावर सांत्वनाच्या त्या मलमाचें बोट मी फिरवीत असतें !

माणसांच्या स्वभावाची आणखीहि एक गंमत दिवसेंदिवस माझ्या ध्यानांत येऊं लागली आहे. देवानें वाघसिंहाना नख्या आणि सुळे दिले आहेत, तर विंचवाला त्यानें निदान नांगी देऊन ठेवली आहे आणि साध्या गरीब गाईला सुद्धां शिगें बहाल केलीं आहेत. सांगायचें तात्पर्य असें, कीं देव कोणालाहि कांहीं ना कांहीं आपलें देऊन ठेवीत असतो. पण आपल्याजवळ जें आहे तें जाणून त्याच्या विकासासाठीं धडपडत राहण्याऐवजीं वेगळीच कांहीं महत्त्वाकांक्षा बाळगून त्यापायीं कायमचें असुखी होणें हा माणसाच्या स्वभावाचा धर्म आहे. यामुळेंच देवानें ज्यांना कोमल आणि मधुर कंठ दिला आहे त्या रजनीबाईंनीं आपल्याला कविता करतां येतात असा आपला उगीचच गैरसमज करून घेतला आहे. शारीरिक खेळांत प्रवीण असलेले, धडधाकट सुंदर शरीरयष्टीचे रामभाऊ आपल्याला 'अध्यात्माचें अंग' आहे असें उगीच गृहीत धरून बसले आहेत आणि लेखनाची 'करीयर' ज्यांना उत्कृष्टपणें करतां येईल त्या बुद्धिमान, चलाख आणि सहृदय विसूतात्यांनीं लोकांनीं आपल्याला चित्रकार म्हणावें म्हणून गेलीं कित्येक वर्षे जीव तोडून अट्टाहास चालवला आहे. आतां या माणसांना काय म्हणावें ? या सर्व लोकांनीं एक खोटें पण सुंदर आणि मोहक स्वप्न अपल्या हृदयाशीं घट्ट धरून ठेवलें आहे. तें स्वप्नसृष्टींत उतरविण्यासाठीं त्यांचा अट्टाहास चालू आहे. आणि मग इतरांनींहि आपणाला तसेंच आश्वासन द्यावें असें त्यांना सारखें वाटत आहे. या माणसांना सत्य सांगून काय उपयोग ? झोंपीं गेलेल्याला जागें करतां येतें पण झोंपेंचे सोंग घेतलेल्या माणसाला जाग आणतां येत नाहीं. अशा अर्थाची एक म्हण आहे.

मला वाटतें त्याहीपेक्षां समर्पक म्हण अशी बनवतां येईल जो मुळांत फसला आहे त्याला शुद्धीवर आणणें सोपें आहे. पण जो माणूस जाणून बुजून स्वतःची फसवणूक करून घेत आहे त्याला शुद्धीवर आणणें महा कर्म कठीण आहे. म्हणूनच मी या सर्व माणसांशीं बिनदिक्कत खोटें बोलतें. रजनीबाई आपल्या कविता मला दाखवीत असतात, तेव्हां मनांतून मला सारखी ऊर्मि येत असते कीं तांब्यांचें नाहींतर माधव ज्यूलियनांचें एकादें मधुर गीत आपल्या मधुर कंठानें त्यांना गाऊन दाखवयाला सांगावें. पण तसें म्हणायचें धैर्य मला होत नाहीं आणि रजनीबाईच्या कवितांच्या साध्या गवती फुलांना टवटवीत गुलाबगेन्द म्हणून मी त्यांचा नसलेला सुगंध हुंगीत धुंद होऊन जातें. रामभाऊ माझें भविष्य वर्तवूं लागतात तेव्हां मी मुकाट्यानें मान डोलावून तें ऐकून घेतें आणि विसूतात्यांच्या 'मॉडर्न चित्रकले' त मूर्खपणा खेरीज दुसऱ्या कशाचाही प्रत्यय येत नसला तरी 'साध्या विषयांत मोठा आशय' गवसल्याच्या अविर्भावानें त्यांनीं कॅनव्हासवर केलेली रंगाची चिताड मी तासनतास निमूटपणें बघत बसतें.

येवढी सहनशीलता आणि सौजन्य या जगांत प्रत्येकानें दाखवायलाच हवी असें माझें स्पष्ट मत आहे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आणि समाजांत राहणाऱ्या प्रत्येकाचें समाजविषयीं कांहीं कर्तव्य असतें. आपल्या भोंवतालीं वावरणाऱ्या माणसांना सुखी ठेवणें, समाधानी ठेवणें, त्यांचा आत्मविश्वास जागृत करणें आणि त्यांच्यातला हीनगंड नाहींसा कसा होईल याची काळजी घेणें हें आपल्या सामजिक कर्तव्यापैकींच एक कर्तव्य आहे असें मला वाटतें. आणि हें कर्तव्य पाळण्यासाठीं अधून मधून आपण ( white lies ) चा किंवा 'शुभ्र निरुपद्रवी असत्यां' चा जर अवलंब केला तर त्यांत फारसें कांहीं बिघडतें असें निदान मला तरी मुळींच वाटत नाहीं.

मनुष्यप्राणी हा मुळांतच दुबळा आहे. असहाय्य आहे. सामान्य आहे. या जगांत कोणीहि सर्वगुणसंपन्न नाहीं. हीनगण्डाचें भूत प्रत्येकाच्या मानेवर बसून त्याला छळीत आहे. नेपोलियन आणि हिटलर यांच्यासारखे महापराक्रमी पुरुषदेखील स्वतःबद्दलच्या खऱ्या खोट्या हीनगण्डानें पछाडलेले होते आणि त्यांच्या उत्तुंग महत्त्वाकांक्षा ह्या हीनगण्डापोटींच निर्माण झाल्या होत्या असा एक समज आहे. नेपोलियन हिटलर सारख्यांची ही कथा, तर तुमच्या आमच्या सारख्या सामान्य लोकांबद्दल काय सांगावें! आपण

सारेच जण स्वतःच्या उणीवा जाणीत असतों. त्याबद्दल खन्त करीत असतों आणि त्या उणीवांसाठीं इतरांकडून सांत्वनाची अपेक्षा करीत असतों. हें सांत्वन करणें पाप नाहीं. उलट मोठें पुण्य आहे असें मला वाटतें. शिवाय माझ्या मदतीला मानसशास्त्र देखील धांवून येण्याचा बराचसा संभव आहे. असें म्हणतात, कीं एकाद्या माणसाच्या ठिकाणीं एकादा गुण नसला तरी सुद्धां तो त्याच्या ठिकाणीं आहेच असें त्याला इतरांनीं वरचेवर बजावलें किंवा त्याची त्यानेंच स्वतःला तशी वरचेवर जाणीव दिली तर कालान्तरानें तो गुण त्याच्या ठायीं निर्माण होण्याचा देखील संभव असतो. मानसशास्त्रज्ञ या गोष्टीला सूचन ( Suggestion ) असें म्हणतात. तर मग आपण देखील एकमेकांच्या असत्यानसत्या गुणांबद्दल एकमेकांचें कौतुक केलें तर त्यांत कुठें बिघडलें ? त्यांतूनही एकाद्याच्या किंवा एकादीच्या सद्सद्विवेक बुद्धीनें या खोटेपणाविरुद्ध फारच तक्रार केली तर त्यावर मजजवळ एक मोठा छान उपाय आहे. हा उपाय म्हणजे प्रत्यक्ष खोटें न बोलतां त्यांत कांहीं पर्याय, ही गोष्ट उदाहरणानें स्पष्ट करतां येईल म्हणून मी प्रत्यक्षच दोन उदाहरणें सांगतें. लीलाचें मूल काळें आहे. तेव्हां त्याच्या रंगाबद्दल कांहींही बोलण्याचें खुबीनें टाळून मी त्या मुलाच्या निरोगी प्रकृतीची आणि हंसतमुख चेहऱ्याची स्तुति करतें. लीलाचा मुलगा निरोगी आणि प्रसन्न असतो खराच. तेव्हां लीला खूष आणि मला खोटें न बोलण्याचें समाधान. त्याचप्रमाणें रजनीबाईंच्या कविता वाचतांना त्यांच्या अत्यंत रेखीव आणि वळणदार अक्षराची मी मनमुराद प्रशंसा करतें. रजनीबाई बिचाऱ्या तेवढ्यावर देखील खूष होतात. आणि मला असत्यवचनाचें पाप लागत नाहीं. !

सरतेशेवटीं एक गुपित सांगून टाकायलाच हवें. तें हें कीं, मी स्वतः देखील माणूसच आहें. मलाहि स्वतःबद्दल हीनगण्ड आहे. मी सुद्धां कांहीं सुंदर पण भ्रामक स्वप्नांचीं अण्डी मनाच्या घरट्यांत उबवींत बसलें आहें. आणि म्हणूनच मला देखील इतरांनीं माझ्याशीं अगदीं कडकडीत खरें बोलायला नको असतें. मग मला जें नको आहे तें इतरांना तरी कसें बरें हवेसें वाटत असेल ? आपल्यावरून जग ओळखावें असें कुणीसें म्हणून ठेवलेंच आहे ना ?

****

## २० : : पोटभरू माणूस चिरायु होवो

माझ्या परिचयाच्या एका माणसाला मी परवां सहज विचारलें, " अहो, तुम्ही आपले शर्ट, पॅन्टस् किंवा इतर कपडे कधीं तयार कपड्यांच्या दुकानांतून विकत घेतां कां ?"

माझा तो प्रश्न त्या माणसाला वेडगळच नव्हे तर कांहींसा अपमानकारकही वाटला असावा. तो एकदम उसळून मला म्हणाला, " छे छे ! मी तयार कपड्याच्या दुकानांतून कधींच कपडे खरेदी करीत नाहीं. ते कपडे नीट शिवलेले नसतात. शिवाय त्यांचा ' कट ' ही बरोबर नसतो. त्या कपड्यांत आपल्या मनाजोगा रंग किंवा ' डिझाइन ' सहसा मिळत नाहीं आणि येवढेंही असून ते कपडे आपण खरेदी केलेच तर ते अंगाला नीट बसतीलच असें नाहीं. तयार कपडे सहसा कधीं घेऊं नयेत. "

विचारान्तीं त्या माणसाचें म्हणणें मला पटलें. तयार कपडे थोड्या कमी श्रमांत मिळत असले तरी ते गैरसोईयीचे असणार यांत शंका नाहीं. त्या माणसाची गोष्ट कशाला, मला सुद्धां जर कोणी तयार पोलकीं अगर चोळ्या घ्या म्हटलें तर त्या मी घेणार नाहीं. शिप्याला दहां दहां वेळां सूचना देऊन आणि मापें देऊन सुद्धां त्यानें शिवलेल्या कपड्यांत आम्ही बायका दहा वेळां खोड्या काढतों, मग आयतीं पोलकीं किंवा चोळ्या आम्हाला आवडतील हें शक्यच नाहीं.

पण तयार कपड्यांच्या बाबतींत इतकी खळखळ करणारीं माणसें तयार मतें मात्र अगदीं सहजासहजीं पत्करतात हें आश्चर्य नव्हे काय? आपल्याला आपल्या मतांचा अतिशय अभिमान असतो. साध्या बोलण्यांत सुद्धां 'माझें असें मत आहे' 'माझें तसें मत आहे' असें आपण किती तावातावानें म्हणत असतों. 'माणसाला मिशा फुटण्याच्या आधीं त्याला मतें फुटतात.' असें गडकऱ्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. बायकांना मिशा फुटण्याची धास्ती नसते. पण मतें फुटण्याच्या बाबतींत मात्र त्या पुरुषांना केसभरहि हार जातील असें वाटत नाहीं. बायका काय किंवा पुरुष काय, मतांच्या बाबतींत सारखींच आग्रही असतात. पण गंमत हीं, कीं आपल्या मतापैकीं कित्येक मतें आपण 'आयतीं' घेतलेलीं असतात. कुणाच्या तरी तोंडून ऐकलेलीं, कुठल्या तरी पुस्तकांत वाचलेलीं किंवा पिढ्यान् पिढ्या चालत आलेलीं अशीं कांहीं 'मतें' आपण घेतों आणि मग तीं आपलींच मतें आहेत असें आपल्याला वाटूं लागतें. तीं मतें खरीं आहेत कीं नाहींत, त्यांत कांहीं ग्राह्यांश आहे कीं नाहीं, आपल्या विचारशक्तीच्या आणि आपल्या पूर्वानुभवाच्या कसावर घांसून पाहतां तीं बरोबर ठरतील कीं नाहीं, याची आपण कधीं फिकीरच करीत नाहीं. एकादे वेळीं मात्र एकादी घटना अशी घडते कीं ज्यामुळें आपण 'आपल्याच' म्हणून उराशीं अतिशय प्रेमानें कवटाळून धरलेल्या एकाद्या मताला जबर धक्का बसतो. मग आपण स्तिमित होतों. बावरून जातों. आपलें आवडतें मत आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति यांतली तफावत आपल्याला सहन होत नाहीं. पण वस्तुस्थिति तर आपण नाकारूं शकत नाहीं. अशा वेळीं आपलें मतच आपणाला सोडून द्यावें लागतें. आपण समंजस असूं तर तें मत आनंदानें सोडून देऊं. हट्टाग्रही असलों तर मोठ्या नाखुषीनें त्या मताचा त्याग करूं, पण कांहीं झालें तरी आवडतें मत सोडतांना आपल्याला ज्या यातना व्हायच्या त्या झाल्याखेरीज राहत नाहींतच.

इतरांच्या बाबतींत काय होत असेल तें असो, निदान मला तरी परवां एक असा विचित्र अनुभव आला. आणि त्या अनुभवामुळें माझें एक अतिशय आवडतें असें मत मला सोडावें लागलें. ज्या माणसाच्या डोळ्यांपुढें कांहीं उच्च किंवा उदात्त ध्येय नाहीं तो माणूस अगदीं कुचकामाचा असें माझें एक बाळपणा-

पासूनचें आवडतें मत होतें. माझेंच कशाला ? इतर कित्येकांचें तरी हें असेंच मत असेल याबद्दल मला शंका नाहीं. आपणाला सर्वांना बाळपणापासून अशीच शिकवण मिळालेली असते, कीं जे कोणी आपल्या डोळ्यांपुढें एकादें उदात्त ध्येय ठेवतील, त्या ध्येयाचा सतत पाठपुरावा करीत राहतील आणि त्या ध्येयावरून जिवाची कुरवंडी करण्याची सिद्धता ठेवतील ते खरे थोर. ज्याला कांहीं ध्येय नाहीं त्या माणसाला क्षुद्र लेखावयाचें, त्याच्याकडे तुच्छतेनें पहावयाचें ही आपली प्रवृत्ति होऊन बसलेली असते. केवळ पोटापाठीमागें लागलेल्या माणसाबद्दल आपल्याला फारसा आदर वाटत नाहीं. अशा माणसाचा अधिक्षेप करणारीं कितीतरीं सुभाषितें संस्कृ साहित्यांत आपणांस वाचावयास मिळतात. उदाहरणार्थ, हें एक सुभाषित पहा 'काकोऽपि जीवति चिराय बलिंच भुंक्ते' कावळा देखील दीर्घकाळ जगतो व बलि खाऊन स्वतःचें पोट भरतो. असा या सुभाषिताचा अर्थ आहे. याच अर्थाचें आणखीहि एक संस्कृत सुभाषित आहे. 'किन काकोऽपि कुरूते चंच्वा स्वोदरपूरणम्' हें तें सुभाषित. कावळादेखील आपलें पोट भरतोच कीं नाहीं असा या सुभाषिताचा अर्थ आहे. हीं दोन्हीही सुभाषितें केवळ स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबाचें पोटभरणाराचा धिक्कार करणारीं आहेत हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे. मराठी सत्तकवींनीं देखील सामान्य संसारी पोटभरू माणसाला 'पिंडपोषक' म्हणून त्याचा उपहास केलेला आहे. हें सारें मी वेळोवेळीं वाचलेलें आहे. आणि त्यामुळेंच ज्याच्या डोळ्यांपुढें कांहींतरी अत्यंत उदात्त ध्येय आहे तो माणूस नेवढा आदरणीय आणि जो कष्ट करून स्वतःचें व स्वतःच्या मुलाबाळांचें पोट भरण्यापलिकडे दुसरें कांहीं भव्यदिव्य स्वप्न पाहत नाहीं तो माणूस तिरस्करणीय असें एक समीकरण मी माझ्या मनाशीं तयार करून ठेवलेलें होतें.

पण माझें हें अत्यंत आवडतें मत परवां जबर धक्का बसून पार कोलमडून गेलें. मी एका ठिकाणीं पाहुणी म्हणून गेलें होतें. त्या ठिकाणीं मी एक आठवडाभर राहिलें असेन नसेन पण तेवढ्या अवधींत माझ्या मतांत जबरदस्त उलथापालथ झाली. जेथें राहिलें तेथलीं माणसें रात्रंदिवस आपल्या पोटापाण्याच्या उद्योगांत गढलेलीं असत. प्रामाणिकपणानें कष्ट करावेत, आपलें व आपल्या कुटुंबियांचें पोट भरावें यापेक्षा कोणतेंही उच्च ध्येय त्या माणसांच्या डोळ्यांपुढें नव्हतें. सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं थकून अंथ-

रणावर पाठ टेकीपर्यंन्त ती माणसें खरोखर उदरंभरणाचाच विचार करीत असत, पोट कसें भरावें हा एकच प्रश्न विराट स्वरूप धारण करून त्यांच्या डोळ्यापुढें उभा असे. तीं सारीं माणसें अशिक्षित होतीं. त्यांचे उच्चार ओबडधोबड होते. आचारविचार स्थूल स्वरूपाचे व सामान्यतः असंस्कृत होते. नागर डौल वा अभिजातता यांना त्यांच्या जीवनांत फारसें स्थान नव्हतें. साहित्य, संस्कृति, राजकारण अशा विषयांपासून तीं माणसें अगदीं अलिप्त होतीं. आणि त्यांतल्या एकाच्याहि डोळ्यांपुढें उदात्त वा अनुदात्त कसलेंच ध्येय नव्हतें. माझ्या पूर्वकल्पनेनुसार हीं सारीं माणसें मला फार सामान्य आणि तिरस्करणीय वाटावयाला हवीं होतीं. पण तशीं तीं मला वाटेनात. पोटासाठीं चाललेली त्यांची धडपड मला क्षुद्र न वाटतां आदरणीय वाटूं लागली. त्यांच्या त्या धडपडीमागें मला जीवनाबद्दलची अनिवार आसक्ति दिसूं लागली आणि त्यांच्या कष्टांत मला चिवटपणा आणि चिकाटी याचें प्रत्यंतर येऊं लागलें. ती माणसें कष्ट करीत होतीं. धडपडत होतीं. तडफडत होतीं पण जगत होती. आणि आपणांवर अवलंबून असणारांना जगवीत होतीं. त्यांना साहित्य नसेल, राजकारण उमगत नसेल, संस्कृतीशीं त्यांची तोंड-ओळखहि नसेल, पण विक्राळ, क्रूर आणि भयानक अशा जीवनाच्या डोळ्याला डोळा देऊन त्यांनीं त्याकडे पाहिलें होतें आणि 'जगावें कसें' ही सर्वांत अवघड कला त्यांनीं आत्मसात केली होती यांत शंका नाहीं.

त्या माणसांचें जीवन मी जवळून न्याहाळून पाहिलें आणि माझ्या मनांत आलें, या माणसांच्या जीवनांत एकादें उत्तम आणि उदात्त ध्येय जरी नसलें तरी त्याबद्दल त्यांना क्षुद्र वा तुच्छ लेखण्याचें कांहींच कारण नाहीं. तीं माणसें श्रमत होतीं आणि चिवटपणें जगत होतीं. आणि हीच गोष्ट खरी महत्त्वाची आहे. अखेर ध्येयांचा तरी उपयोग काय ? रोजचें जें सर्वसामान्य जीवन आहे तें जास्त समृद्ध व्हावें, संपन्न व्हावें, सफळ व्हावें यासाठींच ध्येयाची आवश्यकता असते ना ? ध्येयवादी लोकांना आपण थोर मानतों, त्यांना आदरणीय समजतों तें कां ? या अशा सर्वसामान्य माणसांच्या जिवितांत जास्त सुख निर्माण व्हावें, त्यांत रस उत्पन्न व्हावा म्हणूनच ध्येयवादी लोक आपल्या सर्वस्वाची कुरवंडी करतात ना ? मग सर्वसामान्य

लोकांना तुच्छ लेखतांना त्या ध्येयवादी जीवांचासुद्धां एकपरीनें आपण अवमानच करतों असें होत नाहीं का ?

शिवाय सर्वसामान्य माणसांना तरी तुच्छ लेखायचें तें कां म्हणून ? जे जगाचा बहुसंख्य अशा सामान्य आणि 'स्वभरणव्यापारमात्रोद्यत' म्हणजे स्वत:चें पोट भरण्याच्या उद्योगांतच सतत गढलेल्या लोकांनींच व्यापलेला आहे ना ? जगांत आतांपर्यंत अनेक थोर थोर राजवटी आणि विख्यात संस्कृति होऊन गेल्या. त्या राजवटी आणि त्या संस्कृति आतां काळघरांत गडप झाल्या. पण भूमीच्या उदरांत कोठें कोठें सांपडणारें त्या त्या संस्कृतींचे अवशेष जर आपण पाहूं गेलें तर आपल्याला काय दिसून येतें ? सामान्य माणसांचीं निवासस्थानें, त्यांच्या संसारांत वापरलीं जाणारीं भांडीं, त्यांचे अलंकार, त्यांची वस्त्रें, त्यांच्या आवडीनिवडीच्या अनेक वस्तु, त्यांच्या चैनीचीं आणि विलासांचीं, साधनें ही उत्खननांत आपल्याला सांपडतात. त्या वस्तूंकडे आपण कल्पनेच्या डोळ्यांनीं पाहूं लागलों तर त्या वस्तू वापरणारीं तीं सामान्य माणसें? त्यांचे विचार-विकार, त्यांचीं सुखदु:खें, त्यांचे हर्षविषाद थोडक्यांत म्हणजे त्यांचें सारें जीवन आपल्या डोळ्यांपुढें मूर्तिमन्त उभें राहतें आणि मनांत येतें, जग हें अशा सामान्य माणसांनींच बनवलें आहे. ध्येयवादी माणसांनीं जगाला कधीं फार वर उचललें आहे तर कधीं त्यांनीं त्याला फार अधोगतीलाही नेलें आहे. पण जगाला एका ठराविक पातळीवर स्थिर ठेवण्याचें कार्य जर कोणी करीत असेल तर तीं हीं सामान्य माणसेंच होत. त्यांच्या हास्यावर जग फुलत आहे, त्यांच्या अश्रुंनीं तें समृद्ध व सुपीक होत आहे आणि ज्यांचें कष्टाळू हात या जगाला जगवीत आहेत त्या सर्वसामान्य माणसांच्या डोळ्यांपुढें उच्च आणि उदात्त ध्येय नसलें तर नसो, त्यांचीं जगण्याची व जगवण्याची धडपड हेंच मुळीं एक फार मोठें ध्येय आहे. कारण जगणें आणि जगविणें याहून अधिक थोर असें काय असूं शकेल ?

इतरांचें मत कांहींही असो, निदान मी तरी केवळ पोटापाठीमागें लागलेल्या लोकांकडे यापुढें कधींच तुच्छतेनें वा उपेक्षेनें पाहणार नाहीं. सामान्य माणसाचा जयजयकार असो. पोटभरू माणूस चिरायु होवो !

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६१५२ वि: निबंध
क्रमांक १२०५ नों: दि: ६/२/६०

# २१ : : औषधांच्या बाटल्या

परवाची गोष्ट. कांहीं किरकोळ औषधें खरेदी करण्यासाठीं मी आमच्या घराजवळील एका केमिस्टच्या दुकानीं गेलें होतें. दुकानदार आमच्या चांगला ओळखीचा आहे. मला हव्या असलेल्या वस्तू काढून त्या एकत्र बांधताना, त्यांचें बिल तयार करतांना तो माझ्याशीं गप्पा मारीत होता. मीहि त्याच्याशीं बोलत होतें. पण खरें सांगायचें तर त्या बोलण्यांत माझें लक्ष नव्हतें. मी उभी होतें तेथें आजूबाजूला उंच उंच कपाटें होतीं. आणि त्यांच्या कांचेच्या तावदानाआड लहानमोठ्या औषधांच्या बाटल्यांची एकच गर्दी उसळलेली होती. कांहीं बाटल्या पुठ्ठ्यांच्या चौकोनी घरांत होत्या तर कांहीं नुसत्याच पातळ पांढऱ्या कागदांत गुंडाळलेल्या होत्या. पुठ्ठ्यांच्या डब्यांचे वेगवेगळे आकार होते आणि त्यांवर आंतील औषधाचीं लोकप्रिय किंवा तांत्रिक उच्चारदुर्लभ नांवें, त्यांचे रासायनिक घटक, त्यांचे उपयोग, चवी, ज्या रोगांवर तीं औषधं उपयुक्त आहेत त्यांचीं नांवें, औषधें घेण्याचें प्रमाण, अनुपान, वेळा--या सर्व गोष्टींची माहिती दिलेली होती. एकीकडे दुकानदाराशीं बोलतां बोलतां दुसरीकडे मी तीं सारीं औषधें, तीं सारीं खोकीं व सुटया बाटल्या मोठ्या कुतूहलानें व कांहींशा सभय आश्चर्यानें निरखित होतें. किती जाती व किती प्रकार होते त्या औषधांमध्यें ! कांहीं माशांचीं तेलें होतीं, कांहीं लिव्हरचे अर्क होते. कांहींमध्यें आयर्न व कॅल्शियम या

दोन्ही द्रव्यांचें मिश्रण होतें. कांहीं औषधांत थोडचाबहुत प्रमाणांत मद्यार्क मिसळलेला होता. कांहीं चवीला उग्र असल्याचा इषारा दिला होता तर कांहींची चव फार रुचकर असल्याचें आश्वासन दिलेलें होतें. कांहींचे रंग भीति वाटण्याजोगे होते. तर कांहींचे रंग अगदीं संध्यारागाचो किंवा तलम रेशमी वस्त्रांची आठवण करून देण्याइतके नयनसुखद होते. औषधांप्रमाणेंच बाटल्यांचे व पुठ्ठयांच्या खोक्यांचे आकारहि वैचित्र्यपूर्ण होते. इंजक्शनच्या टिचभर बाटल्यांपासून तों शक्तिवर्धकांच्या हातभार बाटल्यांपर्यंत सारे प्रकार तेथें खचून भरलेले होते. औषधांची ती अजब सृष्टि बघतांना माझी छाती दडपून गेली आणि विविध रोगांची नि त्यांच्या लक्षणांची माहिती वाचतांना माझें डोकें गरगरूं लागलें. एक विचित्र भय माझ्या मनांत निर्माण झालें. कांहीं वर्षांपूर्वीं एका प्रसिद्ध इंग्रजी लेखकाच्या पुस्तकांत मीं वाचलें होतें कीं, एक गृहस्थ डॉक्टराकडे गेला असतां तेथें तो वेगवेगळचा रोगांची माहिती देणारें पुस्तक वाचीत बसतो आणि ज्या ज्या रोगांचें वर्णन वाचावें तो तो रोग या ना त्या प्रमाणांत आपल्याला झाल्याची त्याला भावना होते. मीं ज्यावेळीं तें पुस्तक वाचलें होतें त्यावेळीं या वर्णनाचें मला हसूं आलें होतें पण त्याबरोबरच लेखकानें केवळ विनोदाखातर ही अतिशयोक्ति केली असावी असेंहि मीं स्वतःशीं म्हटलें होतें. आज माझ्या भोंवतीं उंच उंच कपाटांच्या काचेच्या तावदानाआडून मजकडे डोळे वटारून पाहणाऱ्या औषधांच्या बाटल्यांकडे नि खोक्यांकडे बघतांना मात्र त्या विनोदी लेखकाच्या लेखनांत यत्किंचित्‌हि अतिशयोक्ति नव्हती हें अकस्मात् मला पटलें. हीं सारीं औषधें पाहिलीं आणि त्यावर लिहिलेले निरनिराळचा रोगांचें वर्णन जर वाचलें तर धडधाकट निरोगी माणसालासुद्धां रुग्णशय्येवर पडल्यासारखें वाटेल. त्याच्या जिभेवर बऱ्यावाईट औषधांची कडवट चव रेंगाळत राहील आणि त्याच्या नाकांत औषधांचे उग्र दर्प भरून राहतील या गोष्टीची मला क्षणार्धात खात्री पटली. मला फार वेळ त्या दुकानांत बसवेना. आजपर्यंत कितीतरी वेळां या दुकानांत मी आलें असेन नि दुकानदाराशीं गप्पा मारीत मारीत कितीतरी वेळ इथें घालविला असेल. पण दुकानांतल्या औषधानीं आपलें अस्तित्व इतक्या परिणामकारक रीतीनें आजवर कधींच मला जाणवून दिलें नव्हतें. आज पहिल्यांदाच त्यांनीं मला भेडसावून सोडलें. आणि तें मात्र इतक्या तीव्रतेनें कीं मी ताबडतोब त्या दुकानाबाहेर पडलें.

मी केमिस्टच्या दुकानाबाहेर पडलें खरी पण दुकानांतलें वातावरण जणूं अजूनहि माझ्याभोंवतीं रेंगाळत होतें. माणसाला किती तऱ्हेचीं नि किती वाईट-वाईट दुखणीं होऊं शकतात याची जाणीव होऊन माझें मन अगदीं उदास होऊन गेलें. पण त्या उदासीनतेपेक्षांहि दुसरी एक गोष्ट मला अधिक तीव्रतेनें जाणवत होती. ती म्हणजे वेगवेगळीं औषधें किती आंधळ्या विश्वासानें नि श्रद्धेनें माणूस आपल्या घशाखालीं घालतो ही ! मला आठवलें, मी स्वतःच कितीदां डॉक्टर सांगतील तीं पेटंट औषधें नि शक्तिवर्धकें आठ आठ, दहा दहा रुपये देऊन केमिस्टकडून विकत आणलीं होतीं. आणि औषधें संपलीं कीं आपण रुग्णावस्थेच्या कष्टमय अवस्थेंतून अनामयतेच्या सुखाच्या स्वर्गांत तत्काळ प्रविष्ट होऊं; या भोळ्या श्रद्धेनें त्यांचे तिखट, तुरट, कडू घोट मुकाट्यानें घशाखालीं घातले होते ! माझीच गोष्ट कशाला, माझ्या ओळखीचे अनेक चांगले शिकलेसवरलेले लोकदेखील अगदीं अंधविश्वासानें औषधें आणतांना मीं पाहिलेले आहेत. त्यांची सारी बुद्धिमत्ता, सारा सुशिक्षित सावधपणा, सारा तर्कवाद आणि सारी चिकित्सा या एका गोष्टीपुढें जणूं क्लोरोफॉर्म दिल्यासारखी पार निपचित होऊन पडते. आजार ही गोष्टच मुळीं अशी आहे कीं माणूस तिच्यापुढें अगदीं हतबल होऊन जातो. मृत्यूची अग्रदूती असलेल्या रुग्णावस्थेसमोर माणसाचा सारा अभिमान, बुद्धीची सारी घमेंड लटपटते. 'आर्ता देवान्नमस्यन्ति' असें एक जुनें संस्कृत सुभाषित आहे. त्यांत थोडा फेरबदल करून दुखणाईत माणसें औषधापुढें नमतात असें एक नवें सुभाषित तयार करावयाला खरोखरी हरकत नाहीं. एरवीं कुठें कांहीं खायचें किंवा प्यायचें असेल तर आपली स्वच्छतेची, बऱ्यावाइटाची, शुद्धाशुद्धतेची सारी जाणीव कमालीची तीव्र होते, पण औषधांच्या बाबतींत मात्र आपण अशिक्षित माणसाहूनहि अधिक अंधश्रद्ध व उदार बनतों. वाटेल तीं औषधें आपण अक्षरशः डोळे मिटून पितों.

पण मला आश्चर्य वाटलें तें याहिपेक्षां एका निराळ्याच गोष्टीचें. विसावें शतक बुद्धिवादाचें आहे असें म्हणतात. माणूस दिवसेंदिवस जास्त चिकित्सक, जास्त संशयखोर मनोवृत्तीचा झाला आहे असें म्हणतात. पण मी जेव्हां आजूबाजूच्या जगांत नजर टाकतें तेव्हां मला तर माणसाच्या चिकि-

रसिकतेचा कुठेंच प्रत्यय येत नाहीं. जिकडे पहावें तिकडे अंधश्रद्धाच माजूं लागली आहे असें दिसतें. मिळेल तें औषध--मग तें शरीराचें असो, वा बुद्धीचें असो--तें डोळे मिटून घशाखालीं ओतण्याची प्रवृत्तीच वाढत चालली आहे असें दिसतें. आमच्या केमिस्टच्या दुकानाशेजारींच एक पुस्तकाचें दुकान आहे. केमिस्टकडे जशीं बाटल्यांतून निरनिराळीं औषधें भरून ठेवलेलीं आहेत तशींच पुस्तकांच्या दुकानत निरनिराळ्या पुस्तकांतून निरनिराळीं वैचारिक व भावनिक द्रव्यें भरून ठेविलेलीं आहेत. किती मतें, किती पंथ, साहित्य, राजकारण, तत्त्वज्ञान, संस्कृति--विविध विषयांवरील किती भिन्नभिन्न आणि परस्परविरोधी विचारधारा या पुस्तकांच्या बाटल्यांतून भरलेल्या असतात. आणि सामान्य वाचक हें सारें ज्ञान डोळे मिटून पीत असतो. 'डोळे मिटून' हें वर्णन तितकेंसें बरोबर नव्हे. कारण पुस्तकें वाचतांना आपले चर्मचक्षु उघडे असतात--असावे लागतात. पण आपले तर्काचे डोळे मात्र अशा वेळीं मिटलेले असतात. निरनिराळे ग्रंथकार निरनिराळ्या रीतीनें प्रथम आपणास गुंगी आणतात. कुणाची भाषा चांगली असते. कुणाची निवेदनाची शैली उत्तम असते. कुणाची प्रतिपादनाची पद्धति बिनतोड असते तर कुणी संदर्भाच्या नि अवतरणांच्या माऱ्यानें आपल्याला हतबल करून टाकतो. आणि या सर्व गोष्टींनीं भारले गेलेले आपण तो तो ग्रंथकार जें जें आपल्याला सांगत असेल तें तें निमूटपणें मान्य करतों. जें औषधांच्या तेंच पुस्तकांच्याहि बाबतींत घडतें. जसें प्रत्येक औषध तसें प्रत्येक पुस्तक गुणकारी वाटूं लागतें. जीवनांतल्या समस्या सोडविण्याच्या कामीं प्रत्येक पुस्तकाचा उपयोग होईल अशी खात्री पटूं लागते.

जें औषधाच्या विषयांत घडतें, जें पुस्तकाच्या विषयांत घडतें, तेंच राजकारणाच्या विषयांतहि घडतें. सामाजिक जीवनाची सुयोग्य घडी बसावी, प्रत्येकाला विकासाला वाव मिळावा, प्रत्येकाला पोटभर खायला नि अंगभर ल्यायला मिळावें असें सर्वांनाच वाटत असतें. सर्वसामान्य माणसाची भूक फारशी मोठी नसते. त्यांच्या अपेक्षा गगनाला गवसणी घालणाऱ्या नसतात. आपण प्रांजलपणें कष्ट केले तर त्याचा योग्य मोबदला आपल्याला मिळावा, आपल्या बायकामुलांसह आपल्याला सुखानें नांदतां यावें,

जीवनांतील साऱ्या निरुपद्रवी सुखांचा निर्मळ आस्वाद आपणांस घेतां यावा येवढेंच त्याचें माफक मागणें असतें. आणि प्रत्येक राजकीय पक्ष हें सारें त्याला द्यायला तयार असतो. निरनिराळ्या पक्षांचे नेते निरनिराळ्या व्यास-पीठांवर उभे राहून तारस्वरांत ओरडत असतात. पेटंट औषधांच्या दुकान-दारांप्रमाणें भडक रंगांत व भडक शब्दांत आपआपल्या पक्षरूपी औषधाची जाहिरात करीत असतात. समाजाच्या शरीराला जडलेला दुर्धर रोग फक्त आपल्याच औषधानें कसा बरा होऊं शकेल याचें रसभरित वर्णन करीत असतात. साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, सर्वोदयवाद, हिंदुत्ववाद–वेगवेगळ्या 'वादां' चे भाष्यकार चारी बाजूंना उभे राहून एकच कोलाहल करीत असतात. आणि गरीब बिचारा (Common Man) सर्वसामान्य माणूस–या कोलाहलाच्या मध्यभागीं भांबावून उभा असतो. त्याचें डोकें गरगरूं लागतें. त्याला कांहीं सुचेनासें होतें. आणि मग तो डोळे मिटून कुठल्यातरी एका राजकीय पक्षाचें पेटंट औषध घेऊन तें घशांत ओततो. नकळतच तो त्या पक्षाचा अनुयायी होतो. त्या विशिष्ट मतप्रणालीचा अभ्यास न करतांच तिज विषयीं आग्रहानें, अभिनिवेशानें, अट्टाहासानें बोलूं लागतो. दारू न पितांच तिचा कैफ चढावा तसें कांहींसें हें घडतें. मतभेद फोफावतात. भांडणें वाढतात. मनांत विखार आणि गैरसमज सांचत जातात. आणि रोगी मेला तरी औष-धाचा कारखाना सुखरूप राहावा तसे विविध पक्षांचे नेते आपल्या ठायीं मर्जेत असतात. सामान्य माणसें भांडून भांडून थकून जातात–आणि समाज-पुरुषाच्या अंगावरचा रोग तसाच कायम राहिलेला असतो.

मी जों जों विचार करूं लागलें तों तों अनेक औषधांच्या बाटल्या माझ्या मनःश्चक्षूपुढें नाचूं लागल्या. राजकारण, धर्मकारण, संस्कृति, तत्त्व-ज्ञान, साहित्य, मानसशास्त्र––विविध विचारांचीं औषधें त्यांतून भरलेलीं होतीं आणि बाटल्यांचे आकार...कांहीं बाटल्या पुस्तकांच्या आकारांच्या होत्या, कांहीं चित्रपटगृहासारख्या दिसत होत्या, कांहींचे आकार रेडिओच्या खोक्यासारखे होते. शेंकडों–हजारों रुग्णाईत माणसें आशाळभूतपणें या बाटल्यांभोंवतीं कोंडाळें करून उभीं होतीं. आणि हातीं येईल त्या बाटलीचें बूच उघडून डोळे मिटून त्या त्या बाटलींतलें औषध तीं निमूटपणें पीत होतीं–

मीं जोरानें मान हलविली आणि मनांतले हे चमत्कारिक विचार झटकून टाकले. केमिस्टच्या दुकानांत खरेदी केलेल्या किरकोळ औषधांच्या बाटल्या माझ्या हातांत होत्या. मी त्यांच्याकडे निरखून पाहूं लागलें. क्षणभर असा विचित्र विचार माझ्या मनांत आला कीं त्या बाटल्या तशाच रस्त्याच्या कडेला असलेल्या फूटपाथवर आपटून फोडून टाकाव्यात आणि खुशाल मोकळ्या हातांनीं घरीं जावें. पण भररस्त्यांत असें कुणी करतें का ? शिवाय त्या बाटल्या मला फुकट थोड्याच मिळाल्या होत्या ? पैसे पडले होते ना त्यांना ? मीं माझ्या बाटल्या संभाळून घरीं आणल्या !

* * *

मराठी ... ठा... स्वकप्रत.
अनुक्रम ३६९६२ ... विः निबंध ...
क्रमांक ...१२०५... नोंः दिः ...६।२।६८

REFBK-0010257

90246